
महाराष्ट्राचे शिल्पकार

# कृष्णराव पांडुरंग भालेकर



डॉ. विलास पाटील

साहित्य आणि संस्कृती मंडळ
महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

महाराष्ट्राचे शिल्पकार

# कृष्णराव पांडुरंग भालेकर

डॉ. विलास पाटील

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

वाय ७८०-१

▸▸ **महाराष्ट्राचे शिल्पकार कृष्णराव पांडुरंग भालेकर**

▸▸ **प्रथमावृत्ती : २०१६**

▸▸ **प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे, महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

ď **प्रकाशकाधीन**

▸▸ **मुद्रक :**

व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर ४१६ ००३.

▸▸ **किंमत : रु. ९६.००**

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

**रा. रा. शरदचंद्र पवार**

**रा. रा. गणेशराव दुधगावकर**

**रा. रा. नाना पाटेकर**

**रा. रा. हरी नरके**

न्हायी न्हायी न्हायी न्हायी अितं आत्मा
न्हायी पर्मात्मा न्हायी न्हायी
मरन मरन नुस्ती पोकळी
जागा गा मोक्ळी न्हायीचीच
दुक्ख अेक खरं भोय अेक सत्य
आबाळ आसत्य आता अितं

# अध्यक्षांचे मनोगत

दीडशे वर्षे भारतावर ब्रिटिशांचे राज्य होते. परकीय सत्तेची गुलामगिरी आणि पारतंत्र्याचे जोखड झुगारून मातृभूमीत मुक्त करण्याचे काम अनेक देशप्रेमी समाजपुरुषांनी केले. देशभरातील सामान्य जनता या स्वातंत्र्यलढ्यात क्रांतिकारकांच्या पाठीमागे उभी राहिली. त्याचबरोबर रूढी-परंपरा, अंधश्रद्धा आणि अज्ञानात मश्गूल असलेल्या समाजाने शिकले पाहिजे. शिक्षण हेच प्रगती आणि परिवर्तनाचं मुख्य साधन आहे. उच्चवर्गीय समाज वर्षानुवर्षे अशिक्षित बहुजनांवर अन्याय करत होता. धर्माच्या नावाने होणाऱ्या पिळवणूक-अत्याचारातून बहुजन समाजाची मुक्तता करणे व त्यांना हक्काची जाणीव करून देण्यासाठी महात्मा जोतिबा फुले यांनी २३ सप्टेंबर, १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजाचे सामाजिक न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. समाजातील विषमता नष्ट करणे व तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहोचविणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते.


कृष्णराव पांडुरंग भालेकर आणि जोतिबा फुले यांची भेट १८६८ साली झाली. जोतिबांचे समाज जागरणाचे काम बघून कृष्णरावही पुढे सत्यशोधक चळवळीचे सभासद झाले. कृष्णराव यांचे वडील पांडुरंग हे पक्के वारकरी होते. वडलांचा वारसा कृष्णरावांनी विस्तारित करून अधिक समृद्ध केला. हे स्वतंत्र विचारांचे सत्यशोधकी परंपरेचे खंदे प्रसारक, एक कार्यकर्ता, चौकस पत्रकार, उत्तम गायक, चांगले अभिनेते, कवी-लेखक आणि प्रभावी वक्ते या विविध भूमिकेतून त्यांनी आयुष्यभर फार मोठे कार्य केले.

इ.स. १८८८ साली लिहिलेल्या 'बळीबा पाटील' कादंबरी प्रस्तावनेत ते म्हणतात, "शेतकऱ्यांस सहजरित्या मार्ग सुचून आपली सुधारणा करून घेता यावी, हाच उद्देश बागळून या पुस्तकाची रचना करण्यात आली आहे. खेड्यातील लोक व त्यांचे पुढारी (पाटील) यांनी आपल्या गावाची व्यवस्था सर्वानुमते कशी

ठेवावी, हे ह्यात चांगले दाखविले आहे.'' कृष्णराव भालेकर यांनी सतत आग्रह धरला. शिक्षणाशिवाय पर्याय नाही. शेतकरी, कारागीर यांनी आपल्या कौशल्यानुसार नवीन कामे शोधली पाहिजेत. अहंकार, दुसऱ्या संबंधी द्वेष याला फाटा दिला पाहिजे.

सत्यशोधक कार्यकर्ते असलेले कृष्णराव भालेकर ईश्वर मानायचे; परंतु ते पारंपरिक पद्धती करत नसत. पूजा-अर्चात अडकले नव्हते. परमेश्वराची अचाट शक्ती आहे. तो जगन्नियंता आहे. निसर्गशक्ती ही त्याची विविध रूपे आहेत. दीनदुबळ्यांवर दया करणारा आहे, असा त्यांचा विश्वास होता. समाज अज्ञान, अंधश्रद्धा या अंधाराने वेढलेला आहे. हा अंधार विद्येच्या मदतीने दूर केला पाहिजे आणि अंधश्रद्धा आमच्या प्रगतीस अडसर आहे. ती शिक्षणाने दूर करूया, असे ते लिहिण्यातून, बोलण्यातून आयुष्यभर सांगत आले.

कृष्णराव यांनी शेतकऱ्यांच्या मुलांसाठी सुशिक्षण मराठी शिक्षण परिषद, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा डिप्रेस्ड क्लास, गंगाराम भाऊ म्हस्के यांचे डेक्कन मराठा असोसिएशन अशा जनकल्याणाच्या संस्थांना मदत केली. असे कर्ते समाजसुधारक, प्रबोधन करणारे साहित्यिक, शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी आयुष्यभर धडपड करणाऱ्या या महाराष्ट्राच्या शिल्पकाराचे चरित्र महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने प्रकाशित केले जात आहे.



**बाबा भांड**

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

दिनांक : १२ ऑक्टोबर, २०१६

# मनोगत

सत्यशोधक समाज आणि त्याचे कार्य हा महाराष्ट्रातील तमाम जनतेच्या आस्थेचा आणि अभिमानाचा विषय. महात्मा जोतीबा फुले यांनी स्थापन केलेल्या या समाजाचे धडाडीचे कार्यकर्ते उत्कृष्ट वक्ते, साहित्यिक आणि खंदे प्रचारक तसेच परखड समालोचक म्हणजेच सत्यशोधक रा. रा. कृष्णराव पांडुरंग भालेकर.

साहित्य संस्कृती मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष प्रा. रतनलाल सोनाग्रा यांनी महाराष्ट्राचे शिल्पकार योजने अंतर्गत कृष्णराव पांडुरंग भालेकर यांचे चरित्र लिहिण्याची संधी देऊन मला भालेकरांच्या जीवन आणि कार्याचा अभ्यास करण्याचा योग प्राप्त करून दिला. तसेच हा ग्रंथ लिहिण्याची प्रेरणा मला मंडळाचे माजी अध्यक्ष प्राचार्य रा. रं. बोराडे यांनी दिली. मला सतत वाङ्मयीन प्रेरणा देणारे महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष रा. रा. बाबा भांड यांचे हा ग्रंथ लिहिताना मोलाचे सहकार्य लाभले.

रा. रा. कृष्णराव भालेकरांचे चरित्र मोजक्या शब्दात लिहिणे हे एक माझ्यासाठी आव्हानच होते. मागे विद्यापीठाने अभ्यासक्रमात भालेकरांची 'बळीबा पाटील' ही कादंबरी ठेवल्यामुळे, विद्यार्थ्यांना महाविद्यालयात ही कादंबरी शिकवल्यामुळे मला भालेकरांनी लिहिलेल्या इतर वाङ्मयाचीही गोडी लागली. तिचे रूपांतर अभ्यासासाठी करून देऊन रा. रा. कृष्णराव भालेकरांचे चरित्र लिहिण्याची जबाबदारी माझ्यावर सोपवल्याबद्दल मी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे मन:पूर्वक आभार मानतो.

या ग्रंथाच्या कामी आमच्या ज्ञानोपासक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश सदावर्ते, उपप्राचार्य डॉ. संजीवन कदम, ग्रंथपाल प्रा. किशनराव ठमके तसेच डॉ. प्रभाकर हरकळ, प्रा. इंद्रजित भालेराव, रा. श्री. रेणू पाचपोर, डॉ. रामेश्वर रोकडे, डॉ. सुरेश सावंत, डॉ. संतोष जाधव यांच्या प्रेरणेमुळेच हे काम माझ्या हातून झाले.

महात्मा फुले समता प्रतिष्ठानाने प्रकाशित केलेल्या प्रा. सीताराम रायकर यांनी मेहनतीने संपादित केलेल्या ‘कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मय’ या ग्रंथाचा प्रस्तुत चरित्र ग्रंथासाठी खूप उपयोग झाला, हे मी कृतज्ञतापूर्वक नमूद करतो.

कृष्णराव भालेकरांचे पणतू उत्तमराव पाटील (तरवडी, जि. अहमदनगर) आणि उत्तमरावांचे चिरंजीव श्री. यशवंतराव पाटील यांनी कृष्णराव पांडुरंग भालेकर यांच्या वंशावळी संदर्भात मोलाची माहिती दिली. तसेच सौ. सुनीता पाटील यांच्या सहकार्यामुळे हा ग्रंथ मी अनेक वादळांना तोंड देत पूर्ण करू शकलो.

जिंतूर **विलास शेषराव पाटील**

दिनांक : २६ जाने. २०१६

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | | पा. नं. |
|---|---|---|---|
| * | अध्यक्षांचे मनोगत | | |
| * | मनोगत | | |
| १. | उपोद्‌घात | ... | १ |
| २. | कविता, पोवाडे, अभंग, लावण्या आणि इतर | ... | १५ |
| ३. | पंचखेळ | ... | ५८ |
| ४. | कादंबऱ्या | ... | ६६ |
| ५. | प्रायोगिक नाट्यात्म 'शास्त्राधार' | ... | ८६ |
| ६. | भाषणे-व्याख्यानातून वैचारिकतेचे दर्शन | ... | ९० |
| ७. | भालेकर लिखाण आणि अग्रलेख | ... | ९५ |
| ८. | पत्रव्यवहारातून लेखकमन-तळमळीचा कार्यकर्ता | ... | १०१ |
| ९. | लेख, जाहिराती, टिपणे वगैरे संकीर्ण लिखाण | ... | १०९ |
| १०. | कृष्णराव भालेकरांची भाषाशैली | ... | ११८ |
| ११. | रा. रा. कृष्णराव भालेकरांचा जीवनपट | ... | १२८ |
| १२. | वंशावळ | ... | १३७ |

# १

# उपोद्‌घात

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी सन १८१८ मध्ये इंग्रज सैनिकांनी पेशव्यांचा खडकी येथील लढाईत पराभव केला. पेशवाईचा अंत झाला आणि इंग्रजांचे राज्य भारतात सुरू झाले. इंग्रजी राजवट आणि आपल्या भारत देशाचा चेहरामोहरा या संदर्भात आपले मत नोंदवताना डॉ. नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात :--

"एकोणिसावे शतक हे संपूर्ण भारतीय इतिहासात आणि समाजाच्या जडणघडणीत महत्त्वाचे ठरावे. इंग्रजी राजवट या देशात जसजशी स्थिरावत गेली, तसतसा या देशाचा चेहरामोहरा बदलत गेला. विशेषत: सामाजिक जीवनाच्या संदर्भात हे शतक अधिक महत्त्वाचे ठरते. १९ व्या शतकापूर्वीचे सामाजिक जीवन आणि १९ व्या शतकातील सामाजिक जीवन असा तुलनात्मक अभ्यास केला तर त्यात जमीनअस्मानाचा फरक जाणवेल; केवळ सामाजिक जीवनच नाही, तर धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक अशा सर्व पातळ्यांवर भारतीय जीवन बदलत गेले. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी आपल्या धर्मातील मानवतेचा उदो उदो करावयास प्रारंभ केला, त्याच्या आधारे धर्मप्रसारही सुरू केला. मोठ्या प्रमाणात धर्मांतर होऊ लागले. पुष्कळदा गोरगरीब माणसे पैशांच्या मोहाने धर्म बदलतात असे दिसते. पण येथे हिंदू समाजातील उच्चवर्णीयांनाही ख्रिश्चन धर्माची भुरळ पडल्याचे दिसते. रेव्ह. टिळक, नेहमीया गोरे यासारखी ठळक उदाहरणे याचीच निदर्शक आहेत. याचा परिणाम येथील धर्ममार्तंडांवर झाला आणि प्रस्थापित धर्माचा विचार ते करू लागले. यातूनच नवे नवे संप्रदाय उदयाला येऊ लागले. प्रार्थनासमाज, ब्रह्मोसमाज, परमहंस सभा, आर्यसमाज इ. समाज हे याच बाबीचे निदर्शक आहेत. थोड्या वेगळ्या अर्थाने म. फुले

यांचा सार्वजनिक सत्यधर्म याचाही निर्देश याच मालिकेत करावा लागतो. हे वेगवेगळे संप्रदाय जसे उदयाला आले तसे पारंपरिक सनातनीही जागे होऊन धर्मातल्या सर्व दोषांसह आपल्याच धर्माची बाजू मांडू लागले. असे असले तरी ज्या धर्माची, धर्मातल्या चांगल्या-वाईटाची कधीच चर्चा होत नव्हती, ती सुरू झाली. ही या शतकातील एक महत्त्वाची गोष्ट आहे. धर्मजीवनात जसा परिवर्तन व्हायला प्रारंभ झाला, तसेच या देशातील लोकांमध्ये राजकीय जाणिवाही निर्माण होऊ लागल्या, एकूण देशावर परकीय सत्ता असू नये असे लोकांना वाटू लागले आणि सांस्कृतिक जीवन तर केवढे बदलून गेले ! वाङ्मय आणि इतर कलाही बदलत गेल्या.''[१]

या सर्व गोष्टी इंग्रजांनी भारतात नवी शिक्षण पद्धती सुरू केल्यामुळे होऊ लागल्या. इंग्रजांच्या प्रशासन पद्धतीमुळे आणि शैक्षणिक धोरणामुळे १९ व्या शतकात कसे बदल होत गेले. भारतातील नागर आणि खेड्यातील बदल तसेच बहुजनांचे प्रश्न आणि यातून म. फुले यांचे नेतृत्व कसे उदयाला आले यासंदर्भात आपले विस्ताराने मत मांडताना डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात :--

''समाजाला प्रश्न जाणवायला लागले की, प्रस्थापित व्यवस्थेच्या बदलाची प्रक्रिया सुरू होत असते आणि सामाजिक, राजकीय, धार्मिक बदल हे एकाएकी वा एकट्या-दुकट्याच्या एखाद्याच प्रयत्नाने होणे शक्य नसते. यात बराचसा काळ जाण्याची शक्यता असते. म्हणून इंग्रजांच्या प्रशासन पद्धतीमुळे, शैक्षणिक धोरणामुळे ही प्रक्रिया सुरू झाली हे महत्त्वाचे आहे. असे मानणारी मंडळी आपापल्या वैचारिक धोरणानुसार जाणवणाऱ्या समाजहिताच्या धोरणानुसार, समाज संघटित करण्याचे प्रयत्न करू लागली. कारण नव्या प्रश्नांची सोडवणूक करावयाची असेल, परिस्थितीचे, काळाचे आव्हान स्वीकारावयाचे असेल तर संघटनांशिवाय पर्याय नसतो. यातूनच एका नव्या समाजाची पुनर्बांधणी होत असते. हे लक्षात घेऊन काही समाजधुरीणांनी नवे विचार नवी मूल्ये जनसामान्यांपर्यंत प्रसृत करण्याच्या दृष्टीने प्रयत्न चालविले होते. यात बराचसा भाग हा परकीय राजसत्तेला विरोध करण्याचा होता आणि हे साहजिकच होते. परंतु काळाचा विचार करून जे नवे विचार नवी दृष्टी या सत्तेने आणली होती ती स्वीकारून समाजांतर्गत बदल घडवून

१. (संपा) नागनाथ कोतापल्ले 'स्त्री पुरूष तुलना' (श्रीमती ताराबाई शिंदे लिखित) पृष्ठ ५, ६.

आणण्याचीही गरज होती आणि तसे प्रयत्नही ही मंडळी करीत होती. परंतु असे प्रयत्न करणाऱ्यांमध्ये उच्चवर्णीय ब्राह्मण समाजातील मंडळीच अधिक्याने व अग्रभागी होती. शिवाय ही मंडळी नागर भागातली होती. परिणामतः यांच्या प्रयत्नांचा व धोरणांचाही काही एक मर्यादित आवाका निर्माण झालेला होता.

आपला देश खेड्यांचा आहे. म्हणून या देशातील बहुसंख्य जनता ही खेड्यातून राहणारी आहे. या खेड्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. आणि शेतीला पूरक असे व्यवसाय तेथे चालतात. या खेड्यांतील जनतेपर्यंत या नागर भागात निर्माण झालेल्या समाजसुधारणा करणाऱ्या संघटनांचे कार्य पोहचत नव्हते. त्यांच्यासाठी आवश्यक अशा गोष्टींचा अंतर्भावही फारसा या संघटनांच्या ध्येयधोरणात नव्हता. म्हणून राजकीय गुलामगिरीबरोबरच सामाजिक गुलामगिरीत पिचणारा असा निम्नस्तरातील समाज फार मोठ्या संख्येने होता. राजकीय सत्तेपेक्षा दैनंदिन जीवनात जाणवणारी उच्चवर्णीय ब्राह्मण समाजाची गुलामगिरी हीच त्यांच्या दृष्टीने अधिक क्लेशदायी होती. म्हणून या बहुसंख्य खेड्यापाड्यांमधून राहणाऱ्या, कष्टणाऱ्या, पिळल्या जाणाऱ्या अज्ञानी व दरिद्री समाजाचा विचार होणे गरजेचे होते.

ही गरज म. जोतीबा फुल्यांनी ओळखली. त्यांनी परधर्मचक्र व अंतर्गत दुर्दशा यांच्या गुंत्यात अडकलेल्या समाजाला सार्वजनिक सत्यधर्माची जोड देण्याचे कार्य सुरू केले. या देशातील समाजाला धर्मभेद, जातिभेद, स्त्री-पुरुष भेद, पुरोहितशाही, अंधश्रद्धा, अनिष्ट परंपरा व रुढी यामधून मुक्त करून समता, ऐक्य, बंधुत्व, विज्ञान आणि आस्तिकवाद ह्यावर आधारलेली धर्मनीती शिकवून नवी समाजरचना करण्याचे ठरविले. या उद्देशानेच त्यांनी आपल्या समविचारी मंडळींना घेऊन २४ सप्टेंबर, १८७३ या रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.''[२] सत्यशोधक समाजाच्या अत्यंत महत्त्वाच्या कार्यकर्त्यांपैकी एक धडाडीचे कार्यकर्ते उत्कृष्ट वक्ते, साहित्यिक आणि प्रचारक म्हणजे सावित्रीबाई फुले यांचे चुलत बंधू **कृष्णराव पांडुरंग भालेकर** हे होत.

कृष्णराव भालेकर यांचा **जन्म १८५०** साली पुण्याजवळील भांबुर्डे अर्थात आताचे शिवाजीनगर येथे झाला. त्यांच्या आईचे नाव रुक्मीबाई असे होते. कृष्णरावाच्या

२. (संपा) डॉ. वासुदेव मुलाटे 'बळीबा पाटील' (कृष्णराव भालेकरकृत) पृष्ठ ७, ८.

मुलाने (कै. मुकुंदराव पाटील) त्यांचे एक अपूर्ण असे चरित्र लिहिले आहे. यावरून कृष्णरावांचा जन्म १८५० सालच्या एका पौर्णिमेच्या रात्री झाला. त्यांच्या जन्माबद्दल आज एवढीच माहिती मिळते. जन्मतारीख आणि महिन्याचा उल्लेख सापडत नाही. कृष्णरावांचे नातू डॉ. रामचंद्र मुकुंदराव पाटील यांच्याकडील हस्तलिखित वंशावळीवरून कृष्णरावाचे आजोबा राणोजी भालेकर यांना एकूण पाच मुले झाली. पैकी वयाने सर्वात मोठा पांडुरंग तर लहान मुलगा म्हणजे गोपाळ नंतर पांडुरंगरावांना चार मुली आणि दोन मुले झाली. रामचंद्र ऊर्फ भय्यासाहेब हे कृष्णरावांचे मोठे बंधू. कृष्णरावांना रामचंद्र आणि मुकुंदराव अशी दोन मुलं तर अनुसयाबाई आणि विठाबाई अशा मुली होत्या. कृष्णरावांचे सर्वात लहान चुलते गोपाळराव यांची मुलगी सावित्रीबाई ही कृष्णरावांची चुलत बहीण होती. (ती पुढे सावित्रीबाई जोतीराव फुले या नावाने महाराष्ट्रभर ओळखली जाऊ लागली).

कृष्णरावांचे आजोबा राणोजी भालेकर हे उत्कृष्ट शेतकरी म्हणून नावारूपास आलेले होते. कालांतराने पांडुरंगराव हे पुणे जिल्हा न्यायालयाच्या कार्यालयात कारकून म्हणून कामाला लागले. नंतर त्यांनी तळेगाव ढमढेरे येथे रजिस्ट्रार (निबंधक) म्हणूनही काम केले.

कृष्णराव चार महिन्याचे होते तेव्हा त्यांची आई वारली. त्यांचे ईयत्ता दुसरीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण तळेगाव ढमढेरे आणि नंतर पुणे येथे (१८६४ ते ६८ या काळात पुण्यातील रविवार पेठेतील मिशन स्कूलमध्ये) झाले. १८६६ साली पांडुरंगरावांचे निधन झाले. नंतर वडील बंधू रामचंद्रराव यांनी पुढील शिक्षणासाठी दोन वर्षापर्यंत कृष्णरावांना मदत केली. पुढे १८६८ मध्ये आर्थिक ओढाताण भासायला लागली तेव्हा डिस्ट्रिक्ट जज्ज कोर्टात कृष्णरावांना इंग्रजी ऑफिसात नोकरी करावी लागली.

कृष्णराव भालेकरांनी भांबुर्ड्यास विठोबाच्या मंदिरात एक लहानशी लायब्ररी स्थापन केली. तसेच 'हितोपदेशक भजन समाज' या नावाची संस्था स्थापून त्यात ते स्वतः अभंग आणि पदे रचून भजन करायला लागले. कृष्णराव भालेकर यांनी १८६८ मध्ये फत्तेगीर बाबाच्या वाड्याच्या मैदानात फार्स बसवून लोकांचे प्रबोधन घडवून आणले. त्यांच्या कार्याची वार्ता ऐकून महात्मा जोतीबा फुले भांबुर्ड्यास आले तेव्हा भालेकरांनी जोतीबा

फुले यांचे भाषण गावातील मंडळींसमोर ठेवले. फुले यांनी नंतर त्यांना सत्यशोधक मंडळाच्या होणाऱ्या बैठकांमध्ये येण्यास सांगितले.

याच काळात कृष्णराव प्रसिद्ध साधू जंगली महाराज यांच्या सान्निध्यात आले. जंगली महाराजांना त्यांनी आपले गुरू केले पण "जंगली महाराजांचे वेदांती शिष्य जातिभेद पाळतात हे दिसून आल्यामुळे आणि नुसत्या वेदांताच्या आत्मानंदात मग्न असणे हा जनसेवेचा मार्गच नव्हे अशी त्यांची खात्री झाल्यामुळे ते आपल्या भजनी मेळ्यासह सत्यशोधक समाजात येऊन मिळाले."[३]

कृष्णराव भालेकर यांची शरीरयष्टी एकदम मजबूत होती. यामुळे ते निर्भय स्वभावाचे झाले. "गोऱ्यापान शरीराच्या कृष्णरावांना पांढरी वस्त्रे फार आवडत. डोक्याला पांढरा रुमाल, अंगात पांढरा सदरा, पांढरा कोट व धोतर, गळ्याभोवती पांढरे उपरणे असा त्यांचा पोशाख असे. व्यायाम व कुस्तीमुळे त्यांचे शरीर सुदृढ होते. त्यांच्या अंगावरच्या स्वच्छ, निर्मळ वस्त्रांप्रमाणेच त्यांचे मनही स्वच्छ व निर्मळ होते तसेच विलक्षण खंबीरही होते. ते उत्तम वक्तेही होते या सर्वांमुळे त्यांची छाप कुणावरही पडे. ते बुद्धिमान होते पण व्यवहारकुशल नव्हते."[४]

कृष्णराव भालेकर हे सत्यशोधक समाजातील क्रियाशील कार्यकर्ते आणि प्रचारक होते. त्यांनी पुण्यातील वेगवेगळ्या पेठात त्यात्या वारी भाषणे केली. १८७४ साली त्यांनी डिस्ट्रिक्ट जज्ज कोर्टातील कारकुनाची नोकरी सोडली आणि खडकी येथे बॅरकच्या कॉंट्रॅक्टरच्या पोटकंत्राटदाराजवळ कारकुनी सुरू केली. नंतर महात्मा जोतीबा फुले यांनी आपल्या 'पूना कमर्शिअल अँड कॉंट्रॅक्टिंग कंपनी' त भालेकरांना भागीदार करून घेतले. अशा प्रकारे पोटापाण्याची व्यवस्था झाल्यामुळे भालेकरांनी आपले पूर्ण लक्ष सत्यशोधक समाजाच्या कार्याकडे वळवले.

स्वामी दयानंद सरस्वती यांच्या भाषणाचा कार्यक्रम कृष्णराव भालेकरांनी १८७५ साली भांबुर्डा येथील धर्मशाळेत घडवून आणला. मुंबईच्या व्यंकू बाळाजी कालेकर

---

३. सीताराम रायकर (सेवा) 'कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मय' पृष्ठ ५ (प्रस्तावना).

४. डॉ. वासुदेव मुलाटे (संपा) कृष्णराव भालेकरकृत 'बळीबा पाटील' पृष्ठ ९ (प्रस्तावना).

आणि रामय्या व्यंकय्या अय्यावारू या तेलगू मित्रांनी जोतीबा आणि सत्यशोधक समाजाच्या कार्याला हातभार म्हणून बाराशे रुपयांचा छापखाना पाठवला. नंतर या छापखान्यावरून फुले आणि भालेकर यांच्यात मतभेद निर्माण झाले. शेवटी फुल्यांनी छापखाना परत मुंबईस पाठवला. याबद्दल 'कृष्णराव भालेकर समग्र वाङमय' या ग्रंथाचे संपादक सीताराम रायकर म्हणतात "केवळ जोतीरावांमुळे आपल्याला छापखाना मिळाला नाही व वर्तमानपत्र काढता आले नाही याचे दु:ख त्यांच्या मनात शेवटपर्यंत राहिले. एक प्रकारे हा आपल्यावर दाखवलेला अविश्वासच आहे असे त्यांना वाटले असणार."[५]

या प्रकारामुळे भालेकर निराश होऊन स्वस्थ बसले नाहीत. त्यांनी आपल्या थोरल्या बंधूच्या मदतीने कर्ज काढून जानेवारी १८७७ पासून 'दीनबंधू' सुरू केले. आणि 'दीनबंधू' हे ब्राह्मणेतर चळवळीचे पहिले पत्र ठरले. 'दीनबंधू' १८७९ पर्यंत चालले. या काळात कृष्णरावांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. प्रतिकूल परिस्थिती असतानाही 'दीनबंधू' ने सत्यशोधक समाजाचा अत्यंत हिरिरीने आणि नेटाने प्रसार आणि प्रचार केला. फुले यांच्या बरोबरचे आपले मतभेद बाजुला ठेवून त्यांनी, मालाकार चिपळूणकरांनी जोतीबांवर केलेल्या टीकेला तोडीस तोड उत्तर दिले. 'दीनबंधू' तून कृष्णरावांनी शेतकरी आणि कामगारांची बाजू मांडली. "सावकार, भिक्षुक, कुलकर्णी आणि इतर सरकारी नोकर हे लहान शेतकऱ्यांचे अतिशय मोठे शत्रू आणि शोषक आहेत ही भालेकरांची पक्की धारणा होती. लहान शेतकरी सुसंघटित होऊन स्वावलंबी बनतील तरच ते सावकाराच्या आणि दारिद्र्याच्या कचाट्यातून सुटतील हे मत त्यांनी पुनः पुन्हा आग्रहाने मांडले."[६]

१८७९ मध्ये कृष्णरावांनी पुण्यात एका थिएटरमध्ये स्त्रियांच्या निबंधवाचनाचा कार्यक्रम घेतला. तसेच १८८० साली बारामती तालुक्यातील स्वामीची चिंचोली येथे शेतकऱ्यांची एक प्रचंड सभा घेतली. सभेत कृष्णरावांनी शेतसारा, कर्ज, जंगलत्रास, सक्तीचे शिक्षण या विषयावरील ठराव पास करून घेतले. काही काळ त्यांनी बारामती

५. सीताराम रायकर (संपा) पूर्वोक्त, पृष्ठ ८, ९ (प्रस्तावना).

६. कित्ता, पृष्ठ १०.

येथे शेतीही केली. 'दीनबंधू' पायी त्यांच्यावर कर्जाचा बोजा वाढला आणि परत ते गुत्तेदारी कामाकडे वळले. १८८१ ते ८३ पर्यंत भालेकरांना निरा कॅनॉल विरवाडी येथे हेडवर्कवर सब ओव्हरसिअरचे काम मिळाले.

कृष्णराव भालेकर हे नुसतेच बोलके सुधारक नव्हते ते कर्ते सुधारकही होते. खेड्यापाड्यातील शेतकऱ्यांची मुले अनेक कारणामुळे शाळेत जाऊ शकत नाहीत. या दृष्टीने तालुक्याच्या प्रत्येक ठिकाणी एकतरी बोर्डिंग काढावे अशी त्यांची कल्पना होती. १८ नोव्हेंबर १८८४ रोजी पुण्यात कसबा पेठ येथ 'सुशिक्षण गृहाची कृष्णरावांनी स्थापना' केली. पुढे या सुशिक्षण गृहावरूनही फुले आणि भालेकर यांच्यात वाद निर्माण झाला.

कृष्णराव भालेकरांनी १८८४ मध्ये 'दीनबंधू' सार्वजनिक सभा ब्राह्मणेतर चळवळीला चालना देण्यासाठी स्थापन केली. "सार्वजनिक सभा उच्चवर्णीयांनी उच्चवर्णीयांचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी निर्माण केलेली होती. ती गरीब शेतकऱ्यांचे गाऱ्हाणे मांडत नाही किंवा मांडू शकणार नाही. कोट्यवधी शेतकऱ्यांचे, मजुरांचे प्रतिनिधित्व ती करत नाही. या मुद्यांवर भालेकर व त्यांचे सहकारी यांनी सार्वजनिक सभेवर टीकास्त्र सोडले."[७] 'दीनबंधू' सार्वजनिक सभेच्या सभासदांनी स्वदेशी मालाचा वापर आणि प्रसार करावा असे भालेकर यांचे मत होते.

सत्यशोधक समाजाच्या कार्याला मरगळ आलेली होती. ती दूर करावी म्हणून १८८५ साली गुढीपाडव्याच्या रोजी कृष्णरावांनी समाजाच्या झेंड्याची पुणे शहरातून मिरवणूक काढली. मिरवणूकीचे रूपांतर शेवटी सभेत झाले आणि त्यात रामय्या व्यंकय्या अय्यावारू व रावबहाद्दूर महादेव गोविंद रानडे यांची भाषणे झाली.

कृष्णराव भालेकरांनी डेक्कन मराठा असोसिएशनच्या कामात भाग घेतला ही बाब, तसेच भालेकरांनी ताराबाई शिंदे आणि पंडिता रमाबाई यांच्या विरोधी घेतलेली भूमिका महात्मा फुले यांना आवडली नाही. याच काळात म्हणजे १८८५ ला जोतीबा वांगणी येथे गेले होते तेव्हा भालेकरांच्या खाजगी आयुष्याबद्दल काही प्रवाद त्यांच्या कानी आले

७. कित्ता, पृ. १३.

यावरून त्यांच्यात दुरावा निर्माण झाला आणि तो वाढतच गेला. मतभेदानंतरही कृष्णरावांनी सत्यशोधक समाजाचे कार्य चालूच ठेवले. समाजमताच्या अधिक प्रसारासाठी जुन्या मंडईजवळ जाहीर भाषणे द्यावीत असे डॉक्टर गावडे, तरवडे आणि भालेकर यांनी ठरवले. भालेकरांचे तरुण भाचे गणपत सखाराम पाटील आक्रमकपणे भाषणे देत असत.

कृष्णराव भालेकर यांनी १८८७-८९ साली मुंबईच्या तान्सा तलावाच्या कामापैकी एका बांधकामाचे पोटकंत्राट घेतले होते. तलावाचे पाणी सोडण्याच्या समारंभासाठी गव्हर्नर आले होते. तेव्हा भालेकरांनी एक आकर्षक कमान उभारून वर “मुंबईतल्या लोकांची तहान हा भागवील पण कोट्यावधी अज्ञानी जनांची ज्ञानतृष्णा तुम्ही कशी शमविणार आहात ? अशा अर्थाचा इंग्रजीतून मजकूर लिहिला.”[८] नंतर १८८९ मध्ये प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या पुणे भेटीच्या वेळी कृष्णरावांनी आपल्या फ्री स्कूलातल्या विद्यार्थ्यांना उभे करून त्यांच्याजवळ एक मोठा बोर्ड लावला. वर इंग्रजीत पुढीलप्रमाणे मजकूर लिहलेला होता. Tell our grandmama we are happy nation but Nineteen Crorers are without education. (आपल्या आजीला म्हणजेच इंग्लंडच्या राणीला सांगा की, आम्ही सुखी राष्ट्र आहोत पण एकोणीस कोटी लोक शिक्षणापासून वंचित आहेत.)

पुढे १८८९ ला अलाहाबाद येथे भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनावेळी ‘दीनबंधू’ सार्वजनिक सभेच्या वतीने पुण्याला खूप मोठी सभा घेऊन त्यात ‘एकंदर लोकसंख्येपैकी शेकडा नव्याण्णव लोकांस राष्ट्रीय सभा म्हणजे काय ? हे जर माहीत नाही तर ह्या सभेस राष्ट्रीय सभा, राष्ट्राकडून निवडलेली व राष्ट्रास मान्य असलेली असे मुळीच म्हणता येणार नाही' हा एक आणि दोन असे तीन ठराव कृष्णराव भालेकर यांनी पास करून घेतले. तर नंतर पुन्हा १८९५ साली राष्ट्रीय सभेच्या मंडपासमोर २२ फूट उंचीचा शेतकऱ्याचा कापडी पुतळा उभा करून त्याच्या हातातील लाल फलकावर out of our Nineteen Crorest are there Nineteen to explain our griev-ances ? (एकोणीस कोटी जनतेपैकी आमचे गाऱ्हाणे मांडण्यासाठी १९ लोक तरी आहेत का ?) असा राष्ट्रीय सभेला कृष्णरावांनी सवाल केला. यामुळे सभेत मोठीच

८. कित्ता, पृ. १६

खळबळ उडाली. या सर्व घटनांमधून कृष्णरावांमधील कल्पक आणि चळवळ्या कार्यकर्त्याचे दर्शन घडते. ते उत्कृष्ट प्रचारक तसेच शत्रूच्या मर्मावर बोट ठेवून त्याचे लक्ष आपल्या मागण्यांकडे वेधून घेणारे समाजसुधारकही होते. त्यांनी आपल्या सभेच्या वतीने शिक्षण सक्तीचे आणि सार्वत्रिक असावे असा प्रचार केला. कृष्णरावांनी सहकाऱ्यांच्या मदतीने १८८८ मध्ये 'दीनबंधू फ्री स्कूल' सुरू केले. नंतर त्यांना काही काळानंतर आर्थिक अडचणीमुळे ते बंद करावे लागले.

'दीनबंधू' बंद पडले तरी वर्तमानपत्र काढण्याची कृष्णरावांमधील जिद्द कायमच होती. भालेकर आणि त्यांचा भाचा गणपत सखाराम पाटील यांनी १८८८ मध्ये 'दीनमित्र' हे मासिकपत्र सुरू केले. यासाठी कृष्णरावांनी आपल्याकडील सर्व पैसा दिला. काही काळानंतर या मासिकाचा खप वाढेनासा झाला.

याच काळात जेथे 'दीनमित्र' छापले जायचे त्या छापखान्याचे मालक नारायण अंबाजी तसेच कृष्णरावांचे सहकारी (नवलकर, भाचा गणपत स. पाटील) यांनी मिळून 'अंबालहरी' हे इंग्रजी-मराठी साप्ताहिक सुरू केले. 'अंबालहरी' भरभराटीला आले. पण मर्यादित वर्गणीदार 'दीनमित्र' आणि 'अंबालहरी' मध्ये विभागले गेल्यामुळे सुरुवातीला 'दीनमित्र' आणि मग काही काळानंतर 'अंबालहरी' बंद पडले. "अशा प्रकारे 'दीनबंधू फ्री स्कूल' बंद पडले. दीनमित्र, अंबालहरी बंद पडले आणि या सर्व पडझडीचा परिणाम म्हणून 'दिनबंधू' सार्वजनिक सभाही बंद पडली. भालेकरांच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा कालखंड येथे संपला."[९]

कृष्णरावांनी आपला भाचा गणपत पाटील मरण पावल्यामुळे, बहिणीचे दुःख कमी करावे म्हणून आपल्या मुलाला तिच्या सुनेच्या मांडीवर दत्तक म्हणून दिले. पाक्षिक 'शेतकऱ्याचा कैवारी' चे माजी संपादक नारायण मेघाजी लोखंडे यांनी ५००० रुपये किंमतीचा छापखाना तसेच वर २०० रुपये रोख दिल्यामुळे कृष्णरावांच्या संपादकत्वाखाली १८९३ पासून 'शेतकऱ्याचा कैवारी' नव्या रूपात सुरू झाले. ब्राह्मणेत्तर चळवळीतील हे पत्र दोन वर्ष चालले आणि शेवटी आर्थिक अडचणीमुळे बंद पडले.

'........ कैवारी' बंद पडला तरी कृष्णराव निराश झाले नाहीत. शेतकऱ्यांबद्दलचे त्यांचे कार्य चालूच होते. १८९५-९६ मध्ये त्यांनी शेतकऱ्यांच्या गाड्या सरकारकडून

९. कित्ता, पृ. १६

कशा धरल्या जातात, याचे चित्र छापून त्याच्या हजारो प्रती वाटल्या. तसेच १८९६ मध्ये शेतकरी मीठ-जंगल व रानटी जनांवरामुळे कसा टेकीस आला हे दाखवणारे चित्र छापून वाटले. पुढे १८९८ मध्ये भालेकर हे सीताराम लक्ष्मण कॉंट्रक्टरच्या पुण्यातील इस्टेटीची देखरेख करण्याचे काम सोडून मनमाड गोदावरी व्हॅली रेल्वेच्या कामाकडे गेले. "मनमाड येथे त्यांनी कंत्राट नोकरी केली. १९०० साली काही काळ निझाम स्टेट फॅमिन रिलीफच्या कामावर सब-ओव्हरसिअरचे काम केले. १९०१ मध्ये ते आपल्या मुलाकडे तरवडी येथे आले व सुमारे वर्षभर तेथे राहून १९०२ मध्ये जबलपूर गोंदिया रेल्वेच्या कामाकडे गेले. जबलपूरला असताना जंगल खात्याकडून जंगल घेऊन लाकडाचा धंदा त्यांनी केला."[१०] अशा प्रकारे भालेकरांना उतारवयात पोटासाठी वेगवेगळी कामे करावी लागली. याबद्दल सीताराम रायकर म्हणतात, "उतारवयात कराव्या लागणाऱ्या भटकंतीमुळे, आर्थिक अनिश्चिततेमुळे कधी कधी ते खचून जात व निराशेचे उद्‌गार त्यांचे तोंडून बाहेर पडत."[११]

कृष्णराव भालेकर हे गंगाराम बुवा म्हस्के यांच्या 'डेक्कन मराठा असोसिएशन' मध्ये सामील झाले होते. पण पुढे हे असोसिएशन केवळ मराठा वर्गातील विद्यार्थ्यांचेच हित पाहते याचा अनुभव आल्यानंतर त्यामधून ते बाहेर पडले.

कृष्णराव भालेकर हे सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते तसेच उत्कृष्ट असे प्रचारकही होते. आयुष्यात अनेक अडचणी निर्माण झाल्या पण त्यांनी समाजाचे काम सोडून दिले नाही. उतारवयात कृष्णराव वऱ्हाडातील अनेक केंद्रामध्ये सत्यशोधक समाजाचा प्रसार करत फिरले. वऱ्हाडातील जबलपूर येथे असताना करजगाव येथे कार्य केले. शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी ते सतत झटले. शेतकऱ्यांसाठी जमिनी नांगरून देणाऱ्या विहिरी खोदून देणाऱ्या मंडळी पाहिजेत अशी आवाहने केली. भालेकर शेतकऱ्यांना कारखान्यातून मजबूत नांगर घ्यावा असे सुचवतात. कृष्णरावांनी विहिरीतून पाणी काढण्याच्या पंपाचा शोध लावला आणि १९०४ च्या जुलैमध्ये अमरावती जिल्ह्यातील बेसुरा येथे यशवंतराव देशमुखांच्या मदतीने पाणी काढण्याच्या त्या नवीन यंत्राचे प्रयोग केले.

---

१०. कित्ता, पृ. २२.

११. कित्ता, पृ. २२.

१९०७ च्या सुमारास कृष्णरावांना आर्थिक तंगीमुळे अहमदनगरच्या थिएटरमध्ये नोकरी करावी लागली. अशा परिस्थितीतही कृष्णरावांचे वाचन, लेखन आणि पत्रव्यवहाराचे कार्य चालूच होते. 'मराठा शिक्षण परिषद' स्थापन करण्याबाबत त्यांनी ब्राह्मणेतर पुढाऱ्यांशी पत्रव्यवहार केला. 'माळी शिक्षण परिषद' भरवण्यासाठी पुणे, मुंबई आणि नगर येथे व्याख्याने दिली. भालेकर महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांच्या सहवासात १९०८ च्या सुमारास आले आणि त्यांनी 'डिप्रेस्ड क्लासेस' मिशनचे काम वऱ्हाडात केले. आणि शेवटी काही काळानंतर मतभेद झाल्याने मिशनच्या कामाचा राजीनाम दिला. याच काळात वऱ्हाडातील सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांच्या मदतीने 'सत्यप्रकाश' हे पत्र काढण्याचा कृष्णरावांनी प्रयत्न केला पण तो सफल झाला नाही. "ख्रिस्ती मिशनरी त्यांना प्रेस काढून देण्यास तयार होते. पण भालेकरांनी धर्मांतर केले पाहिजे अशी त्यांची अट होती. अगदी निराशेच्या क्षणी ही अट स्वीकारून, जर ख्रिस्ती झाल्याने आपल्या शत्तूंवर तोफगोळा सोडता येत असेल तर धर्मांतर करावे असेही त्यांच्या मनात येऊन गेले असावे असे त्यांच्या पत्रांवरून वाटते. तथापि भालेकर कधीही ख्रिश्चन झाले नाहीत. आयुष्यभर हालअपेष्टा सोसून सत्यशोधक समाजाचा पक्ष त्यांनी स्वीकारला होता. तो अशा रीतीने सोडून देणे शक्य नव्हते. शेतकऱ्यांना त्यांच्या प्रश्नांविषयक सल्ला देणारी उपदेशक मंडळी काढावी असेही त्यांच्या मनात होते. पण ती कल्पना प्रत्यक्षात येऊ शकली नाही."[१२]

कृष्णराव यांनी १९०९ मध्ये पुणे, मुंबई आणि नगर येथील माळी जातीतील काही प्रतिष्ठितांच्या भेटी घेऊन माळी शिक्षण परिषद घेण्याचे ठरवले. माळी समाजात शिक्षणाचे प्रमाण मुळीच नाही. समाजाची स्थिती हलाखीची आहे. इतर समाजाप्रमाणे आपल्या समाजाचीही एखादी सभा किंवा परिषद भरवणे आवश्यक आहे असे त्यांना वाटत होते. याच काळात मुलगा मुकुंदराव याच्या साहाय्याने 'दीनमित्र' पुन्हा सुरू करण्याचे कृष्णरावांनी ठरविले. छापखान्याचे साहित्य मागवले पण छापखाना उभा राहण्यापूर्वीच म्हणजे **०७ मे, १९१० रोजी कृष्णराव पांडुरंग भालेकर यांचे निधन झाले.** नंतर कृष्णरावांशिवाय माळी परिषद भरली. आपल्या मुलाकडे कृष्णरावांनी 'दीनमित्र' बारा वर्षे तरी चालवावे

१२. कित्ता, पृष्ठ २५.

अशी अंतिम ईच्छा व्यक्त केली पण त्यांच्या मुलाने कोणत्याही अडचणीला न जुमानता 'दीनमित्र' चाळीस वर्षापेक्षा जास्त काळ चालवून, आपल्या वडलांची अर्थात सत्यशोधक समाजाच्या एका तळमळीच्या कार्यकर्त्याची अंतिम ईच्छा पूर्ण केली. कार्यकर्ता आणि प्रचारक या दोन्हीही भूमिका कृष्णरावांमध्ये एकरूप झालेल्या होत्या. "कृष्णराव भालेकर बुद्धिमान होते पण व्यवहारी नव्हते. त्यांची आर्थिक स्थिती लहानपणापासून फार चांगली अशी कधीच नव्हती. समाजकार्याला वाहून घेतलेले असल्यामुळे आर्थिक विवंचना कायम असे. ज्या समाजातून ते आले व समाजासाठी त्यांनी एवढे कष्ट सोसले तो समाज त्यांना आर्थिक साहाय्य करण्यात तत्पर नव्हता. भालेकरांना याचे अनेकदा वैषम्य वाटे"[१३] असे कृष्णराव पांडुरंग भालेकर यांच्या कार्याचे मूल्यमापन करताना सीताराम रायकर म्हणतात. इतर जातीत संस्थानिक राजे जन्माला आले आणि त्यांनी सत्यशोधकांना राजाश्रय दिला तसा राजाश्रय कृष्णराव भालेकरांना मिळाला नाही.

"जन्मभर त्यांना कंत्राटी कामे करून उदरनिर्वाह करावा लागला. या आर्थिक विवंचनेचा परिणामही त्यांच्या स्वभावावर निश्चित झालेला असणार. भालेकरांचा जीवनपट पाहिला तर आर्थिक दुरवस्थेमुळे त्यांना बऱ्याच वेळा माघार घ्यावी लागली असे दिसते."[१४]

समाजकार्याबरोबरच उल्लेखनीय आणि लक्षणीय अशी साहित्य निर्मिती भालेकरांनी केलेली आहे. ते उत्कृष्ट असे कवी आणि कादंबरीकार होते. त्यांनी हितोपदेश नावाचे भजनी अभंग लिहिले. काही पदे शेतकऱ्यांचे मधुर गायन (शेतकऱ्यावरील कविता) काही उपदेशपर लावण्या 'श्रीखंड' (कवितेतील नवा प्रयोग) तसेच अनेक पोवाडे लिहिले. यातून शेतकरी, मजूर, कामगार आणि बहुजन समाजाचे प्रबोधन व्हावे, त्यांना सत्य परिस्थितीचे आकलन व्हावे असा उपदेश त्यांनी केलेला आहे. भालेकरांनी 'बळीबा पाटील आणि १८७७ चा दुष्काळ' तसेच 'बळीबा पाटील' या कादंबऱ्या लिहिल्या.

कृष्णरावांनी 'पंचखेळ' या नावाचा एक गंजिफाचा खेळ शोधून काढला. हा खेळ कसा खेळावा याबद्दल त्यांनी पुस्तिकाही लिहिली. या खेळातून त्यांच्यातील कल्पकता आणि प्रायोगिकता दिसून येते. कृष्णराव भालेकर हे कर्ते समाजसुधारक होते. त्यांनी

---

१३. कित्ता, पृष्ठ २९.

१४. कित्ता, पृष्ठ २९.

शेतकऱ्यांसाठी 'शेतकऱ्यांनो डोळे उघडा' हे व्याख्यान दिले. कृष्णरावांची अनेक भाषणे, लेख, संकीर्ण लिखाण तसेच त्यांचा बराचसा पत्रव्यवहार आज उपलब्ध आहे.

भालेकरांमधील कार्यकर्ता, समाजाचे प्रबोधन करणारा साहित्यिक आणि शेतकऱ्यांविषयी, तसेच सर्वहारा निराश्रित हिंदूंविषयी तळमळ कृष्णरावांच्या मनात कायम होती यात शंका नाही. महात्मा फुले आणि कृष्णराव भालेकर यांची तुलना अप्रस्तुत होईल असे सांगून सीताराम रायकर म्हणतात, "म. फुले हे क्रांतिकारी विचारांचे जनक होते. शतकानुशतके शूद्र अतिशूद्र म्हणून त्यांना अवहेलनापूर्वक धिक्कारण्यात आले अशा शूद्रातिशूद्र समाजाला, 'हो, आम्ही शूद्रातिशूद्रच आहोत, ते आमचे भूषण आहे, कारण राबणारे शूद्रातिशूद्र हेच बरे या देशाचे मालक आहेत' असे शूद्रांना अभिमानाने म्हणता येईल अशा प्रकारची मनोभूमिका त्यांनी शूद्रातिशूद्रांमध्ये निर्माण केली. म. फुल्यांचे मन चिंतनशील व सार्वजनिक सत्यधर्मांमध्ये मांडलेली एक आदर्श जीवनव्यवस्था कल्पू शकणारे मन होते. भालेकरांची मनोरचना अशी नव्हती. ते खंदे प्रचारक होते. म. फुल्यांच्या विचारांनी प्रभावित झाल्यावर त्यांनी सतत सत्यशोधक समाजाचे विचार लोकांत प्रसृत करण्याचा प्रयत्न केला व त्या विचारांच्या अनुरोधाने गरीब शेतकरी, मजूर यांच्या उन्नतीसाठी ते सतत झटले. स्त्रियांबाबतच्या भूमिकेवरून म. फुले व भालेकर यांच्यात मतभेद होते असे म्हटले जाते. हे फक्त भालेकरांच्या पंडित रमाबाई आणि ताराबाई यांच्याविषयक मतांपुरते खरे असावे. १८८९ साली भालेकरांनी स्त्रियांचा निबंध वाचनाचा कार्यक्रम घडवून आणला किंवा मोफत व सक्तीचे शिक्षण फक्त मुलांना द्यावे असे म्हटले नाही यावरून त्यांची स्त्री शिक्षणाबाबत भूमिका भिन्न होती असे वाटत नाही. पण याबाबत जो काही मतभेद होता तो बाजूला ठेवला तर इतर बहुतेक मुद्यांवर त्या दोघांत एकमत होते असेच दिसते. फरक केवळ स्वभाव वैशिष्ट्यातून निर्माण होणाऱ्या कार्यपद्धतीमध्ये आणि कंगोऱ्यांपुरताच होता. भालेकर आणि फुले यांच्या लिखाणाबाबत एक गोष्ट ध्यानात घ्यायला हवी. भालेकरांचे बहुतेक लिखाण स्फुट स्वरूपाचे आहे. काही वेळा ते प्रासंगिक असले तरी बहुतेकवेळा शेतकरी, मजूर यांच्या प्रश्नाविषयी त्यांच्यातील अज्ञान दूर व्हावे, मद्यपानासारख्या घातुक सवयी त्यांनी टाकाव्या याविषयी

आहे. भालेकर हे खऱ्या अर्थाने पँफ्लेटिअर होते आणि अशा प्रकारच्या लिखाणाला आवश्यक असणारा जोश, आवेश, धारदारपणा, सोपेपणा, थोडक्या शब्दांत आपला मुद्दा प्रभावीपणे मांडणे, दुसऱ्याच्या मुद्यांवर अचूक प्रहार करणे हे सर्व गुण त्यांच्या लिखाणात आढळतात. सर्वच प्रचारक कार्यकर्त्यांच्या लिखाणात दिसून येणारी पुनरुक्ती येथेही आहे, पण विषय जरी एक असला तरी तो नानाप्रकारे मांडण्यात भालेकर तरबेज आहेत.''[१५]

अशा प्रकारे कृष्णराव भालेकरांचे वेगळेपण सीताराम रायकर समर्थपणे मांडतात.

●●●

१५. कित्ता, पृष्ठ २७.

# २

# कविता, पोवाडे, अभंग, लावण्या आणि इतर

मानवी भावभावनांच्या आविष्कारासाठी साहित्यिकांना सर्वात जवळचा वाङ्मय प्रकार म्हणून कविता विशेष आवडीचा आणि जवळचा वाटतो. कृष्णराव पांडुरंग भालेकर हे कर्ते समाजसुधारक आणि साहित्यिक होते. समाजप्रबोधनाचे साधन म्हणून ते साहित्याकडे पाहतात. ललित वाङ्मयात गद्य लिखाणाबरोबरच त्यांनी पद्य लिखाण केलेले आहे. मराठी कवितेच्या इतिहासात भालेकरांची कविता कोठे आहे आणि ती कशी आहे हे पाहणे महत्त्वाचे वाटते.

साधारणतः भारतात १८१८ नंतर इंग्रजी अंमल सुरू झाला आणि भारतात आधुनिक युगाची सुरुवात झाली. इंग्रजी शिक्षणातून भारतीय विद्यार्थ्यांना नवदृष्टी मिळाली. पारतंत्र्यातील जीवन, १८५७ च्या असफल बंडाची पार्श्वभूमी यामुळे भारतीयात पराभूत मानसिकता निर्माण झाली. या सर्व बाबींचा मराठी साहित्यावर परिणाम झालेला असा हा काळ होता.

आपल्याकडे संस्कृत तसेच पाश्चात्य काव्यशास्त्राच्याच अंगाने मराठी कवितेचा विचार आणि अभ्यास केला गेला. यामुळे मूळ मराठी देशी समर्थ आणि सशक्त साहित्यिक दुर्लक्षित केले गेले. मराठीतील पूर्वग्रहदूषित समीक्षकांनी आधुनिक मराठी कवितेचे जनकत्व केशवसुतांना बहाल करताना केशवसुतांच्या ही अगोदरपासून देशी जाणिवेतून कविता लिहिणाऱ्या सावित्रीबाई फुले, महात्मा जोतीराव फुले आणि कृष्णराव पांडुरंग भालेकर यांच्या कवितेकडे दुर्लक्ष केलेले आहे.

केशवसुतांच्याही अगोदर ३० वर्षापूर्वी काव्यलेखनाला सुरुवात करणाऱ्या सावित्रीबाई फुले यांच्याबद्दल कृ. प. देशपांडे म्हणतात, 'त्यांच्या काव्यरचनेचा काळ केशवसुतांच्यापेक्षा तीस वर्षांनी आधी आहे. म्हणूनच त्यांची कविता महत्त्वाची आहे असे नाही तर केशवसुतांनी जे विषय आपल्या काव्यासाठी वापरले, ज्या प्रकारची आत्मपर कविता लिहिली, निसर्गवर्णनपर कविता लिहिली, सामाजिक जाण दाखविली, काव्यविषयक विचार मांडले आणि स्वातंत्र्याची प्रीती व्यक्त केली, त्याच धर्तीवर सावित्रीबाईंच्याही काही कविता आहेत.'

('महात्मा फुले गौरवग्रंथ' संपा : हरी नरके / य. दि. फडके, खंड पहिला, पृष्ठ ४६३)

तात्पर्य सावित्रीबाई फुले यांनी काव्यविषक, आत्मपर, निसर्गवर्णनपर, सामाजिक, बोधपर, प्रार्थनापर आणि स्फुट कविता लिहिलेल्या आहेत. विशेष म्हणजे अभंग, ओवी या छंदात तसेच मुक्तछंद म्हणता येईल अशा प्रकारच्या कवितेत बोलीभाषेला स्थान देत सावित्रीबाईंनी कविता लिहिलेल्या आहेत. त्यामुळे आधुनिक मराठी कवितेच्या जननी सावित्रीबाई फुले तर आधुनिक मराठी देशी साहित्याचे जनक महात्मा जोतिबा फुले हे ठरतात. याबद्दल डॉ. आनंद यादव म्हणतात,

'अर्थसंकोच न करता मूलार्थाने, 'मराठी साहित्य' हा शब्दप्रयोग स्वीकारला तर आधुनिक देशी मराठी साहित्याचे ते (महात्मा फुले) आद्यजनक ठरतात. कारण नव्या, आधुनिक समाजाच्या घडणीची व्यापक पातळीवरची सामाजिक जाणीव, त्यांच्या वाङ्मय-कृतींतूनच प्रथम दिसून येते.'

देशी मराठी साहित्य तसेच ग्रामीण साहित्य याबद्दल महात्मा फुले यांचे कार्य-कर्तृत्त्व निर्देशित करताना डॉ. यादव पुढे म्हणतात :--

'महात्मा फुले यांचे हे यश विष्णुशास्त्री चिपळूणकर, हरिभाऊ आपटे, केशवसुत आणि अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्यापेक्षा कालिकदृष्ट्या कितीतरी अगोदरचे आणि गुणवत्तेच्या दृष्टीने कितीतरी वेगवेगळ्या प्रकारचे आहे. या साहित्यिकांच्या तुलनेने

महात्मा जोतीराव फुले यांची साहित्यधारा अधिक देशी, अधिक व्यापक, अधिक मानवतावादी आणि अधिक आधुनिकही आहे. या दृष्टीनेही ते 'आधुनिक देशी मराठी साहित्याचे आद्य जनक ठरतात आणि या देशाची लोकसंस्कृती ही प्राकृतांची, ग्रामीणांची असल्याने ते ग्रामीण साहित्याचे आद्य जनक ठरतात.'

(म. फुले गौरवग्रंथ-पृष्ठ ६१४)

आधुनिक मराठी कवितेच्या देशीवादाची पार्श्वभूमी सावित्रीबाई फुले यांच्या कवितेने तयार केली. त्यांच्या एका कवितेत नेटिव्ह, इंडियन हे शब्द आलेले आहेत. यावरून आधुनिक मराठी कवितेला एक सशक्त परंपरा सुरुवातीपासूनच लाभलेली होती असे आपणास निर्विवादपणे म्हणता येईल. सावित्रीबाई फुले महात्मा जोतिबा फुले आणि कृष्णराव भालेकर अशी आपल्याला आधुनिक मराठी कवितेची काव्यधारा निर्देशित करता येईल. फुले दांपत्य आणि भालेकर हे तिघेही कर्ते सुधारक. समाजसुधारणेसाठी साहित्य निर्मिती आणि प्रत्यक्ष कृती हे तिघांचेही ध्येय आणि उद्दिष्ट. महात्मा फुले यांनी 'छत्रपती शिवाजी राजे भोसले' हा पोवाडा सन १८६९ मध्ये प्रकाशित केला. हा पोवाडा म्हणजे आधुनिक मराठी कवितेतील पहिली दीर्घ कविता असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. शैलीचे वेगवेगळे प्रकार बोलीभाषेतील शब्दांचा वापर आणि समग्र मराठी संस्कृतीला कवेत घेण्याची ताकद यामुळे मराठी कवितेत शिवाजी महाराजांवरील हा पवाडा सर्वांगांनी महत्त्वपूर्ण ठरणारा आहे.

महात्मा जोतिबा फुले यांचे एकूण कार्य आणि सत्यशोधक समाजाचे तत्त्वज्ञान यांचा प्रभाव कृष्णराव भालेकरांच्या कार्यावर आणि साहित्यावर आहे. हे भालेकर प्रामाणिकपणे मान्यही करतात. तरीही त्यांची कविता आपले स्वत:चे सत्त्व आणि अस्तित्व स्वतंत्रपणे जपणारी कविता आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

म. फुले, कृष्णराव भालेकर आणि नारायण मेघाजी लोखंडे ज्या बहुजन समाजात परिवर्तन घडवून आणू पाहत होते त्या समाजात 'लेखन आणि वाचन' संस्कृती नुकतीच रुजू पाहत होती. हा संपूर्ण समाज मौखिक (लोकगीते, लोककथा) वाङ्मय परंपरेवर

पोसलेला होता. इंग्रजांच्या राजवटीमुळे महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार झाला. अभ्यासक्रमातील पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिके आणि नियतकालिके प्रथम मराठीत बहुजन समाजातील मुलांना पाहायला वाचायला मिळू लागली. ही पुस्तके जिथे छापतात त्या छापखान्याची ओळख झाली. हळूहळू हा बहुजन समाज मौखिक परंपरेकडून लिखित परंपरेकडे शिक्षणामुळे ओढला गेला. त्यांच्यात आपणही लिहू शकतो आणि लिहिलेले छापले जाऊ शकते, असा आत्मविश्वास आला. वर्तमानपत्रांमुळे समाजाचे संघटन मजबूत करता येते. लोकांमध्ये प्रबोधन घडवून आणता येते याचा प्रत्यय कृष्णराव भालेकरांना आला.

वैचारिक मंथन घडवून आणण्याचे कार्य पद्यातून करणे आवश्यक आहे. कारण लोक एकत्र येतात तेव्हा, मनोरंजनातून त्यांचे प्रबोधन केले जाऊ शकते असे भालेकरांना वाटत होते म्हणून त्यांनी पोवाडे, लावण्या, अभंग असे सर्वमान्य रचना प्रकार (काव्याचे) लिहिण्यास प्राधान्य दिले. भालेकरांना छापखान्याची मुद्रणसंस्कृती फारच महत्त्वाची वाटली म्हणून त्यांनी जन्मभर मासिके आणि वृत्तपत्रांना महत्त्व दिले. मुद्रणामुळे आपले साहित्य टिकून राहणार याची शाश्वती झाल्यामुळे भालेकर नंतर लिखित वाङ्मयाला महत्त्व देताना दिसून येतात.

**पोवाडे--**

कृष्णराव भालेकर यांनी आमचे कारागीर, पूर्वीची व सांप्रतची स्थिती, कलगीतुरा, शिवशक्ती द्वैताद्वैत वगैरे विषयावर वादविवाद करणारांस विनंती, तसेच लोकल फंडाचा पोवाडा, राघू गाडीवानाचा पोवाडा, दक्षिणेतील सन १८७७ च्या भयंकर दुष्काळावरील पोवाडा तसेच 'कलियुगाचे भय' ही पोवाडसदृश्य कविता आणि असे अनेक पोवाडे लिहिलेले आहेत.

'आमचे कारागीर' या पोवाड्याची सुरुवात शाहीर कृष्णराव भालेकर अतिशय बहारदारपणे करतात,

अडाणपणाने देश बुडाला कारागिरी थकली ।।
संपत्ती अज्ञपणे मुकली ।। धृ ।।

पहा आमचे साळी कोष्टी कष्ट करुनी मरती ।।
कशाने डोके व्हावे वरती ।। १।।

बायका पोरांशी सक्त मजुरी सदोदीत करती ।
होईना पोटाची भरती ।। २ ।।

प्रपंचाचा खर्च भागेना सर्वकाळ झुरती ।। ३ ।।

मोठ्या नेटे धीर धरती ।

धन विद्या आणि पुढाऱ्याची नाही कृपा पुरती ।।
काळजीमध्ये बुद्धी मुरती ।। ४ ।।

(सीताराम रायकर 'कृष्णराव भालेकर समग्र वाङमय' पृ. १)

या पोवाड्यात परदेशी कारागीर कामगारांबद्दल कृष्णराव भालेकर म्हणतात :--

परदेशाचे साळी कोष्टी गिरण्या उभारिती ।
खर्ची कोट्यावधी सुरती ।। ५ ।।

कापूस पिंजून सूत काती विणी यंत्रावरती ।
छिटे पहा यंत्र चितारीती ।। ६ ।।

(पृ. १)

या पोवाड्यात नंतर भारतीय माग, गोरे (इंग्रज) लोक, भारतीय लोहारांतील विद्येची कमतरता तसेच इंग्रजी लोहार, भारतीय शेतकऱ्याची तत्कालीन स्थिती याबद्दलचे वास्तव वर्णन आलेले आहे.

तसेच आमचे लोहार घिसाडी पुरे चलाख मेहनती ।
परंतु विद्येची कमती ।। १ ।।

इंग्रजी लोहार पहा यंत्राने यंत्रे घडिती ।
कशा यंत्राने धातु आटिती ।। २ ।।

कसे अचाट कारखाने चालता भूमी थरथरती ।
पहा हो चक्रे कशी फिरती ।। ३ ।।

(पृ. २)

अशा प्रकारे कृष्णराव भालेकरांनी आपल्या काव्यातून भारतीय आणि इंग्रजी लोहारांची तुलना केलेली आहे.

शेतकरी-कारागीर तसेच आलुते बलुतेदार यांच्याबद्दल भालेकर म्हणतात,

शेतकऱ्याची पहा स्थिती जशीच्या तशी ।
शेतकी सुधारते कशी ।। १ ।।

गोऱ्या शेतकऱ्यांची हत्यारे आणि ग्रंथराशी ।
कळेना काळ्या कुणब्याशी ।। २ ।।

रंगारी आणि मोची आमचे नका म्हणू आळशी ।
रसायन शास्त्र ना त्यांशी ।। ३ ।।

तसेच कासार कुंभार नाही विद्या कोणाशी ।
विचारी रीत वडिलांशी ।। ४ ।।

राजे रजवाडे देती देणग्या तमासगिराशी ।
जाणिना कारागिराशी ।। ५ ।।

भोजने घालुनी खर्ची द्रव्य असंख्य देवळांशी ।
जकाती झाल्या भोळ्यांशी ।। ६ ।।

(पृ. २)

याच पोवाड्यात शेवटी--

करा ग्रंथ मराठीमध्ये ।
भालेकर वदे छापा लवलाही हो वि. ।। पै ।।

(मिळवट) कारागिराशी विद्या नाही गोष्ट मोठी चुकली ।
संपत्ती अडाणपणे मुकली हो ।। धृ. ४ ।। (पृ. २३)

असे म्हणतात तेव्हा त्यांना आपल्या मराठी देशी भाषेतून ग्रंथलेखन हवे तेव्हाच इथला शेतकरी, कारागीर सुज्ञ होईल असे सुचवायचे आहे.

'पूर्वीची व सांप्रतची स्थिती' या पोवाड्यात इंग्रजी तसेच भारतीय माणसांची तुलना केलेली आहे. भारतीयांवर इंग्रजी अंमल केव्हा सुरू झाला हे सांगताना भालेकर म्हणतात,

आठराशे आठरा साली । इंग्रजी झाली । खालसा केली ।
गेली पेशवाई । अति पाप ना पुण्याई । कशी मजा ।। धृ ।।

मऱ्हाठशाई बुडाली कशी ।
पुण्याचे द्वेषी । पापाच्या राशी ।
खेळ पोरांचा धिंगाना चाले चोरांचा ।
कशी मजा ।। १ ।।

पहा इंग्रजाची जूट । नाही कधी फूट ।
करूनी कूट । नाही घोटाळा ।
नाही आळस ना कंटाळा ।। क. ।। २ ।।

इकडे जातीभेदामुळे । धर्माचे खुळे
यजमान लुळे । द्वेष आपसात ।
एकी नाही बंधुबंधूत ।। क. ।। ३ ।।

(पृ. ३)

या पोवाड्यात भालेकर पुढे आर्य लोक आणि मोगलांचे वर्णन करतात. नंतर इंग्रजांनी कायदे करून बंड आणि जुलूम जबरदस्ती हटविली असे सांगून कृष्णराव भालेकर म्हणतात,

इकडे राजा असो की नबाब
असेना दाब । नाही जबाब ।
सांडणीस्वार जासुदा खर्चही फार ।। क. चाल ।।

उफराटे टांगी बिनधोक ।। क ।।
फोडी पाठ चिंचेचा फोक ।
मिरच्याची धुरी खालून ।। क. १० ।।

लुटमाट हक्क बोलून ।
राखेचा तोबरा तोंडा ।। क. ।।
डोईवर देऊनी धोंडा ।
नाजूक जागी चापूनी ।। क. ।।
नेई माल गळा चेपूनी ।
मारकूट चोऱ्या वाढे भ्रांती ।। क. ।।

(पृ. ४)

इंग्रजांची आधुनिकता आणि भारतीयांची पारंपरिकता या तुलनेत भारतीय खूप मागे आहेत हे सांगताना भालेकर म्हणतात--

'इकडे शोधी सुंदर स्त्रिया ।
नग्न त्या प्रिया ।
करूनी क्रिया कित्ता प्रजेशी ।
नाही भ्याले जनलज्जेशी ।। क. ८ ।।

तारायंत्रा नको क्षण एक ।
बातमी चोख । घ्यावी बिनधोक ।
नाणी टाका साळी ।
गिरण्यांनी सारिले साळी ।। क. ९ ।।

इकडे शर्ती नाचगाण्याच्या ।
हेले मेंढ्याच्या । हरण चित्त्याच्या ।
रंगी रंगदारी ।
चोंबड्यास मिळे सरदारी ।। क. १० ।।'

(पृ. ५)

तत्कालीन परिस्थितीचे सडेतोड वर्णन अगदी जोशपूर्ण भाषेत कोणाचीही भीडभाड न ठेवता कृष्णराव भालेकरांनी वरील पोवाड्यात केलेले आहे.

'कलगीतुरा-शिवशक्ती-द्वैताद्वैत वगैरे विषयांवर वादविवाद करणारांस विनंती' चार चौकाचा साध्या चालीवर म्हणता येईल असा भालेकरांनी लिहिलेला एक देशी पोवाडा म्हणून याचा उल्लेख करता येईल.

'शिवशक्तीचा शोध लावूनी शिकला गायाला ।
नका हो सोडू न्यायाला ।। धृ ।।

शिवशक्तीची नावे ठेविली कोणी कोणाची ।
शंका दूर करा आमची ।। १ ।।'

(पृ. ५)

या पोवाड्यातून कृष्णराव भालेकरांनी सर्वसामान्य गरीब दीनदुबळ्या लोकांचे प्रबोधन केलेले आहे.

कलगीतुरा छंद गाता भेदिक लावण्याचा ।
तुम्हाला शौक गाण्याचा ।। १ ।।

तुणतुणे तंबुरी ढोलकी ताल नाचण्याचा ।
जणू का अंमली प्राण्यांचा ।। २ ।।

वेदांति नास्तिक कुटिती काथ्या ब्रह्माचा ।
द्वैताद्वैत मताचा ।। ३ ।।

ऐसे गारुड भारूड बकता आनंद क्षणाचा ।
क्षणिक लाभ स्वप्नाचा ।। ४ ।।

(पृ. ६)

या पोवाड्याच्या शेवटी चौक ४ मध्ये कृष्णराव भालेकर दीनदलित आणि शेतकऱ्यांना उद्देशून म्हणतात--

नाही कोणाशी लाभ मनाचा ।
हट्ट पुरविता कशाला कंठ सुकविता ।। ७ ।।

(चाल) आता करावा विचार पुरता ।
व्यर्थ वाद घालीत बसता ।
दुःख डोही काहो बुडता ।
पशुसारखी पोटे भरता ।
जन्म गेला झुरता मुरता ।
ज्ञानाचे फळ हे का म्हणता ! ।

देश बुडाला याच करता । (मिळवट)
भालेकर हा दास दिनांचा सिद्ध साह्याला ।। धृ. ४ ।।

(पृ. ६, ७)

अशी शाहीर कृष्णराव भालेकरांनी आपली कार्यकर्त्याची, बहुजन समाजातील जनतेला साह्यकारी भूमिका स्पष्ट केलेली आहे.

'राघू गाडीवानाचा पोवाडा' तसेच कृष्णराव भालेकरांनी छापलेल्या चित्राबद्दल सीताराम रायकर म्हणतात--

"शेतकऱ्यांच्या गाड्या सरकारी वेठीस धरल्यामुळे त्यांची कशी दैना उडते याचे उत्कृष्ट वर्णन भालेकरांनी राघू गाडीवनाचा पोवाडा लिहून केले होतेच, पण १८९५-९६ मध्ये त्यांनी गाड्या कशा धरल्या जातात, त्याचे चित्र छापून त्याच्या हजारो प्रती वाटल्या. या प्रकारामुळे भालेकरांवर पोलीस खाते रुष्ट झाले असल्यास नवल नाही."

(सीताराम रायकर : कित्ता पृ. २१ प्रस्तावना)

या पोवाड्याचे निवेदन कृष्णराव भालेकरांनी राघू गाडीवानाच्या म्हाताऱ्या आईकडून आत्मनिवेदनात्मक पद्धतीने केलेले आहे. यामुळे हा पोवाडा पात्रानुसार परकाया प्रदेश

करणारा नाट्यातील स्वगताप्रमाणे ठरला. म्हातारी म्हणते, माझा मुलगा राघू कडब्याची गाडी विकाया गेला. रस्त्यात त्याला शिपायाने अडवले शिपाई चिरिमिरी मागतो. राघूने दिलेले तीन आणे घेऊन शिपाई दारू पितो. नंतर पुन्हा पुढे दुसरा शिपाई राघूची गाडी पकडतो. हे प्रकरण मामलेदाराकडं जातं आन मग शिपाई माझ्या राघूला मारतात.

तोंडघाशी गचांडूनी ।
म्हणती "चल बे रसी पकडूनी" ।।५।।

चिखलवाळू चढवढूनी ।
बसती मटमटा बैल मुरडूनी ।।६।।

(पृ. ७)

अशा प्रकारे शेतकऱ्यांच्या जिवलग जित्रापांनासुद्धा त्रास सहन करावा लागतो. पुढे राघू गाडीवानाची म्हातारी आई म्हणते--

अम्मलदार खरे बेदरदी ।।बा.।। २।।
कोण राजांशी देईल वर्दी ।।बा.।। ३।।
टाळा हे मानव पारधी ।।बा.।। ४।।

(पृ. ७)

असे ती 'तीन विसाचे (६०) वर' वय असलेली गरीब म्हातारी शेतकरी आई म्हणते.

या पोवाड्याचा शेवट राघूचे बैल सरकारकडेच अडवून ठेवले जातात आणि मग राघू, शिपाई गाढ झोपल्याचे पाहून घरी पळून येतो. तेव्हापर्यंत घरात सर्व बेहाल झालेले असतात. राघू गाडीवानाची म्हातारी आई म्हणते--

घरी बायको मुले आई अस्थी उरले ।
राघू पाहता घाबरले ।।४।।

पेरणीवाचून शेत बुडाले सावकार उठले ।
सर्व जप्तीने घेरले ।।५।।

(पृ. ८)

या पोवाड्याच्या शेवटी म्हातारी आई इंग्लंडची महाराणी व्हिक्टोरियाला उद्देशून म्हणते--

व्हिक्टोरिया महाराणी ।।बा.।।१।।
ये गे एकदा हिंदुस्थानी ।।बा.।।२।।

काय केले तुझ्या कायद्यांनी ।
आहे आमची धुळधाणी ।।३।।

(पृ. ८)

पोवाडा समाप्त करताना शाहीर कृष्णराव भालेकर म्हणतात--

म्हणे भालेकर दाद लावाना
उपाय दिसता ।।४।।बा।।

(पृ. ८)

कृष्णराव पांडुरंग भालेकरांनी 'लोकल फंडाचा पोवाडा' हा पोवाडा 'लोकल फंडाकरिता शेतकऱ्याचे गाणे' या शीर्षकाने त्याला एक प्रस्तावना लिहून ३० नोव्हेंबर, १८९३ ला 'शेतकऱ्याचा कैवारी' मध्ये प्रकाशित केला. प्रस्तावनेत कृष्णराव भालेकर म्हणतात--

'आज आमच्या शेतकऱ्यांकडून म्हणून जो रुपयास एक आणा कर घेतात त्यासंबंधाने शेतकरी काय म्हणतात यावर एक गाणे आहे.'

(पृ. १०)

ते गाणे म्हणजेच हा पोवाडा भालेकर एकूण ४ चौकात पूर्ण करतात. हा पोवाडा कृष्णराव भालेकर शेतकऱ्याच्या मनोगताद्वारे उलगडून दाखवतात. पोवाड्याचा नायक शेतकरी म्हणतो--

लोकलफंड देत आलो कानू कायदा सोसून ।।
गुरेढोरे घरेदारे वतन वस्तू विकून ।।धृ।।

वीस लाखावर देत आलो लोकलफंड वर्सास ।।
अव्वलपासून बेरीज करता सहा कोटीचा आजमास ।।१।।

लाखामागे कोण किती विद्यार्थी आमचे पढले ।।
सहा कोटीचे सहा दाखवा कोठे कोण वर चढले ?।।२।।

(पृ. १०)

शेतकरी वरीलप्रमाणे सवाल करून विद्याखात्यात सरकारी दरबारात आमचे कोणीही कैवारी नाही असे म्हणून, प्रस्थापितांविरुद्ध बंड करताना विद्रोह पुकारताना म्हणतो--

शेतकऱ्यांचा सारा फंड ।
उत्पन्नासी झरा अखंड ।
असून कुणबी आडदांड ।
मुकाट्याने देती फंड ।

झाली चिपुटी जिरला कंड ।
काय ठोकुनी सुके दंड ।
कोठे गेले धर्मलंड ।
काढा पाहू कर्मकांड ।

खाऊन आयधी झाले पुंड ।
काय पोकळ वादवितंड ।
चला जाऊ शरण विद्येशी ।
काय होते भटकून ? ।।धृ।।६।।

(पृ. १०)

पोवाड्यातील वरील उताऱ्यात 'ड' या अक्षराचे यमक साधले असून विद्रोही भूमिका घेत पहिल्या चौकाच्या शेवटी कृष्णराव भालेकर शेतकऱ्याच्या तोंडून विद्येचे महत्त्व पटवून देतात.

नंतर तिसऱ्या चौकात हा शेतकरी, आपली अडवणूक कोण करतात तसेच आपणाला कोण कोण लुटतात हे सांगताना म्हणतो--

अंमलदारी सावकारी आळशाचाही जोजार ।
चोहोकडुनि खाती तोडुनी झाले कुणबी बेजार ।।३।।
मोठी काळजी पावसाची दुसरी किडक्या रोगाची ।
पक्षी तिसरे पशू चवथे चोर पाचवे ठगाची ।।४।।
सहा सरकार, सात सावकार, आठ उदमी फसविती ।
नऊ ग्रहांची शनी भटाची पिडा दिशादस पळविती ।।५।।
आकरा आडाणी बाराबलुते तेरा व्यसने पाठीशी ।
चौदा आळशी पंधरा परंपर रोगदुर्गुन गाठीशी ।।६।।

(पृ. ११)

अशाप्रकारे पंधरा काळज्यांनी ग्रस्त असा शेतकरी कृष्णराव भालेकर आपल्या वरील पोवाड्यातून जोशपूर्ण भाषाशैलीत उभा करतात. या पोवाड्याच्या शेवटी भालेकर प्रत्येक तालुक्यासाठी एक बोर्डिंग असावे ! असे सुचवून बहुजन समाजाला उद्देशून म्हणतात--

शेतकरी ही केवळ बकरी ।
लांडग्या ठेविले पहारेकरी ।
कशी धडगत व्हावी तरी
तपास नसता वरचेवरी ।
कळेल कैशी संख्या खरी
काय जाणता सरासरी ।
आता लांडग्या दूर करी
नेमा परके अजून तरी ।
लाखो चावले गिळले जरी
बदली आमची करील हरी ।

नका गड्यांनो हिंमत सोडू
म्हणे भालेकर खडकून ।।धृ।।४।।

(पृ. ११)

'दक्षिणेतील सन १८७७ चा भयंकर दुष्काळ' हा पोवाडा कृष्णराव भालेकरांनी एकूण चार चौकात लिहून पूर्ण केलेला असून प्रत्येक चौकात जवळ जवळ तीन वेळा चाल बदलून लिहिलेला एक उत्कृष्ट पोवाडा आहे.

महात्मा जोतिबा फुले यांनी लिहिलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पोवाड्यानंतर कृष्णराव भालेकरांनी लिहिलेला शेतकऱ्यांच्या जीवनावर आधारित हा पोवाडा म्हणजे करुण रसाने युक्त अशी एक दीर्घ कविताच आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

१८७७ साली दक्षिण भारतात पडलेल्या भयंकर दुष्काळाची पार्श्वभमी या पोवाड्याला लाभलेली आहे. निसर्गनिर्मित संकटात माणूस, पशू आणि पक्षी यांचे हालहाल झाले. अनेक जिवांना प्राणाला मुकावे लागले.

सन अठराशे सत्याहत्तरी भयंकर दुष्काळ पडला ।
सात लक्षावर लोक मेल्याचा झाला पृथ्वीवर गिल्ला ।।धृ।।

आर्ययवन तो भाई मुसलमान फ्रेंच इंग्रज का आले ? ।
हिंदुस्थान सोन्याचा तुकडा म्हणोनिया गोळा झाले ।।१।।

(पृ. ३७)

सगळ्यात अगोदर हिंदुस्थानवर आर्य, नंतर यवन, मुसलमान, फ्रेंच आणि इंग्रज यांनी हल्ले करून भारताला गुलाम बनवले हे ऐतिहासिक सत्य कृष्णराव भालेकर आपल्या पोवाड्यातून परखडपणे मांडतात.

कर्जाखाली गेले बुडोनी शेतकरी झाले ठार ।
भट कुलकर्णी मारवाडी व्याजावरती सरदार ।।१।।

(पृ. ३८)

कुणबी-शेतकरी आणि शेतमजूर लाचार आणि बेजार झाला. त्याला कोणताही आधार नव्हता. भयंकर संहारक दुष्काळाचे वर्णन करणाऱ्या काही काव्यओळी खालीलप्रमाणे--

१) आषाढ गेला श्रावणही गेला ।
अश्विनाचा दसरा आला ।।
दाणादुणाही महाग झाला ।
कुणब्याचा जीव फार भ्याला ।।

(पृ. ३८)

२) औतकाठी विकुनी खाती ।
गुराढोरांची झाली माती ।।
गेला पाऊस दणाणली छाती ।
शेते घरे टाकुनी जाती ।।
(मिळवट)
अन्नावाचून व्याकूळ झाले ।
मिळेल तो खाती पाला ।।धृ.।।

(पृ. ३९)

३) अब्रू लायकी विसरून गेले
कसला तो मऱ्हाटमोळा ।
गोषा विकूनी दोषा मानिना
खरकटे करती गोळा ।।१।।
चिंचोक्यांचा, भुसकोंड्याचा
भाजीपाल्याचा मारी गोळा ।
निवडुंगाच्या फण्या बोंडानी ।
केला साजरा सण पोळा ।।२।।

(पृ. ३९)

४) ठायी ठायी प्रेते पडली ।
किती जशीची तशीच सडली ।।

पशुपक्ष्यांनी कितिक तोडिली ।
रिलीफ फंडाने दया सोडिली ।।

मेल्यामध्ये जिती गाडिली ।
कामगारांनी जोड जोडिली ।।

(पृ. ३९)

अशा भयावह वाताहतीच्या काळातही माणसांमधील माणुसकी शिल्लक होती. हे सांगताना कृष्णराव भालेकर म्हणतात--

भाटे, मारवाडी, गुजर, पार्शी
गोरे लोक, मुसलमान ।

वर्गणीने फंड करोनी
काही वाचविले प्राण ।।४।।

(पृ. ४०)

तरीही त्यांच्यातील व्यापारी वृत्ती, स्वार्थीपणा उफाळून वर आलाच हे सांगताना भालेकर म्हणतात--

हजारो कोसावरून धान्य आणिले
आगगाडीचा बहुमान ।

व्यापाऱ्यांनी व्यापार केला
होऊन बसले श्रीमान ।।३।।

(पृ. ४०)

मदत करण्याच्या नावाखाली श्रीमंत होऊन बसणारीही माणसे होती असे सांगून भालेकर पोवाड्याचा शेवट करताना म्हणतात--

खेड्यापाड्याची दाणादाण ।
कुटुंबाची ताणाताण ।।

लोक पसरले रानोरान ।
नाही पाहिले पुनः ठिकाण ।।

(पृ. ४०)

दुष्काळामुळे परदेशी माणसासारखी भटकंती वाट्याला आली. स्वतःचे गाव, आप्त सोडावे लागले. बहुजनसमाज धन, विद्या तसेच बुद्धीपासून कोसो दूर आहे. शेवटी सर्वहारांचे प्रबोधन करताना कृष्णराव भालेकर म्हणतात--

ही चूक कुणाची सांगा ।
शहाणे नका येऊ रागा ।।

पुढारीपणाने वागा ।
बांधवा नका देऊ दगा ।।

(मिळवट)
म्हणे भालेकर अन्नसत्र नको,
विद्यासत्रे घाला ।।धृ.।।

(पृ. ४०)

शाहीर कृष्णराव भालेकरांनी उमाजी नायकाच्या पोवाड्याच्या चालीवर म्हणता येईल असा 'अनार्यांचे गाऱ्हाणे' या नावाचा देशीवादी कवितेला आदर्श ठरेल असा एकूण ४ चौकात विभागलेला पोवाडा लिहिलेला आहे.

नका टाकू मूळ खंडुनी, पहा धुंडुनी,
वेदा आधी आहे शूद्र ।
तेच अनार्य अतिशूद्र ।।धृ.।।

(पृ. ४०)

मूळ भारतात वेदाआधीही शूद्र, अतिशूद्र आणि अनार्य हे ऐतिहासिक सत्य कृष्णराव भालेकर पोवाड्याच्या सुरुवातीला सांगून बहुजनांमध्ये आत्मविश्वास जागृत करतात. आर्यांच्या टोळ्या वायव्य दिशेकडून भारतात आल्या. त्यांनी अनार्यांना हरवलं- आपला दास, गुलाम बनवले, मूळ भारतीयांवर भयानक अत्याचार केले--

पायांत कि हो दडपुनी, जिव्हा कापुनी
भाजले तव्यावरी जीव ।
नाही आली जरा कीव ।।७।।

सांडसाने मास तोडिले, डोळे फोडिले
गर्भिणीवरी शस्त्र धरले ।
घाण्यामध्ये किती पिळिले ।।८।।

(पृ. ४१)

किंवा

थुंकू नये रस्त्यात, मडके गळ्यात
बांधिले जाताना शहरी ।
पावलांसाठी फास कमरी ।।१०।।

(पृ. ४१)

या पोवाड्याच्या रचनेतून अनार्यांचे मनोगत उलगडत जाते. पोटाच्या आगीपुढे आम्ही हतबल झालो हे सांगताना पोवाड्यातील नायक अनार्य म्हणतो,

पोटाच्या आगीपुढे प्राणी चरफडे,
अभक्षाची नाही चाड ।
पशू प्रेताचा काय पाड ? ।।११।।

(पृ. ४१)

शेवटी परकीय आर्यांना उद्देशून अनार्य आपले गाऱ्हाणे मांडताना म्हणतो--

स्वतांस उंच मानुनी, ग्रंथी लिहुनी
आमुची का करता दशा ।
नाही आधार चहुदिशा ।।३।।

(पृ. ४१)

आर्यांनी मूळनिवासी भारतीय आदिवासी तसेच अनार्यांचा खूप छळ केला. शेवटी आर्यांचे पाप भरले म्हणून इंग्रजांचे फावले असे पोवाड्याचा अनार्य नायक म्हणतो.

कवी कृष्णराव पांडुरंग भालेकर यांनी लिहिलेला 'कलियुगाचे भय' हा पोवाडा कवितासदृश्य पोवाडा आहे. महाराष्ट्राच्या लोककलेतील गोंधळी गीताच्या जवळ जाणाऱ्या लयीत लिहिलेला हा पोवाडा प्राचीन भारतीय संस्कृतीचे परखड मूल्यमापन करताना दिसून येतो,

कलियुगाचे भय म्हणजे धुर्ताचा कावा ।।
इतर युगाचा गुप्त भाग आता ऐकावा ।।धृ.।।

(पृ. ४७)

अशी सुरुवात करून या पोवाड्यात सत्ययुगाचे वर्णन येते. ब्रह्मावतार कल्पनांचे स्तोम-सत्याची बाजू घेत-उघड करत सत्ययुगाची वर्तमान परिस्थिती विषद करत हा पोवाडा ब्रम्हावर हल्ला चढवत देशीवादी भूमिका घेऊन पुढे पुढे जातो.

ब्रह्मा बेटीवरती भुलला जैसा तो कुत्ता ।।
मुळीच घालून जगास देतो पहा की कित्ता ।।१।।

शंखासुराचे चौर्यकर्म वेदा चोरावे ।।
वेद अनादी पाण्यामध्ये का हो बुडावे ।।२।।

(पृ. ४७)

नंतर देव-दानव समुद्रमंथन करतात--

भिऊन देव आला कूर्म घेतली धाव ।।३।।

(डुक्कर) होतो दातावरती पृथ्वी घ्याया ।
नाही ............ गेली असती कवीराया ।।४।।

(पृ. ४७)

या पोवाड्यातील काळाच्या ओघात, काही शब्द नष्ट झालेले आहेत. कूर्म, वराह तसेच नरसिंह अवताराचे बिंग फोडत राम-कृष्णाच्या अवताराची टिंगल करत बौद्धावताराचे वर्णन करताना कवी म्हणतो--

बौद्धावतारी कैसा देव चूप हो बसला ।।
कैसा वृद्धापकाळ कोठूनी आला ।।२।।

(पृ. ४८)

नारदमुनी, पाचपांडव यांचे वर्णन करून मत्स्यकन्येचे वर्णन करताना कृष्णराव भालेकर म्हणतात--

कोळ्याची तरुण कन्या दुर्गंधी मुलगी ।
कामाधीन होऊन तिजला केले सुगंधी ।।५।।

सकल जगाला विष्णू हा कल्पिला पिता ।
त्याच्या उरी ब्राह्मणाने माराव्या लाथा ।।६।।

(पृ. ४८)

शेवटी गर्गमुनी आणि यादवांचा उल्लेख करून या पोवाड्याचा, सत्याचा आधार घेत शेवट करताना कृष्णराव भालेकर म्हणतात,

धूर्त भटांनी केला पहा देवाचा चिवडा
तुम्हापुढे आहे आता सत्य ते निवडा ।।८।।
म्हणे भालेकर उगाच नको तर्काचा धावा ।।धृ.।।

(पृ. ४८)

बोली भाषेतील अनेक अस्सल शब्दांमुळे कृष्णराव भालेकरांनी लिहिलेले वरील सर्वच पोवाडे अस्सल देशी पोवाडे बनलेले आहेत. तसेच 'पोवाडा म्हणजे वीर रसाने परिपूर्ण' या व्याख्येला तडा देत शेतकऱ्यांच्या, बहुजनांच्या दुःखाला वाचा फोडण्यासाठी करुण रसाने परिपूर्ण असे पोवाडे शाहीर कृष्णराव पांडुरंग भालेकरांनी सर्वसामान्यांच्या उद्‍बोधनासाठी, प्रबोधनासाठी लिहिलेले आहेत आणि त्यात ते कमालीचे यशस्वी झालेले आहेत.

**अभंग**

कृष्णराव भालेकरांनी आपली अभंग रचना हितोपदेश या छोटेखानी पुस्तकात एकत्र केली आहे.

'हितोपदेश' म्हणजे हितासाठीचा उपदेश आपल्या अभंगांच्या द्वारे कृष्णराव पांडुरंग भालेकर यांनी सर्वसामान्य सर्वहारा बहुजन समाजाच्या हितासाठी, उपदेश केलेला आहे. दीन-दलित सर्वहारा शेतकरी कामगार बहुजनांच्या हितासाठी त्यांना अज्ञान आणि दारिद्र्याच्या खाईतून वर काढण्यासाठी त्यांचे प्रबोधन तसेच उद्‍बोधन व्हावे; म्हणून कवी कृष्णराव भालेकरांनी जवळजवळ १६ अभंग आणि ५ हिंदी पदे लिहिलेली आहेत. त्यांचे सर्वच अभंग 'हितोपदेश' या विभागात 'कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मय' या ग्रंथाचे संपादक सीताराम रायकर यांनी स्वतंत्र विभागात संपादित केलेले आहेत.

मराठी संतांच्या अभंगात शांत आणि भक्तिरसाचा वापर खूप मोठ्या प्रमाणात आहे. याला अपवाद फक्त संत तुकाराम. समाजहिताची तळमळ आणि रोखठोक भाषा आणि तरल कविमन ही संत तुकारामांच्या अभंगांची वैशिष्ट्ये.

कृष्णराव पांडुरंग भालेकर यांच्या अभंगांचे नाते महात्मा जोतिबा फुले यांच्याशी तर महात्मा फुले यांचे संत तुकारामांच्या अभंगांशी आहे, हे आपणाला साधारणपणे मांडता येईल. बाबा आढाव यांचा आधार घेऊन भालचंद्र फडके महात्मा फुले यांच्या कवितेबद्दल म्हणतात,

'जोतीरावांचे अखंड नवा मूल्यभाव घेऊन येतात. बाबा आढाव म्हणतात त्याप्रमाणे मानवी बुद्धीचे स्वातंत्र्य, प्रेम, समता, बंधुभाव, श्रमप्रतिष्ठा, सारासार विवेक या मूल्यांवर आधारलेल्या नव्या संस्कृतीचे उद्गान फुल्यांनी केले आणि सामाजिक व आर्थिक शोषण व्यवस्थेविरुद्ध, गुलामगिरीविरुद्ध सत्यशोधनाचे आंदोलन सुरू केले. त्यांची कविता सांस्कृतिक बंडखोरी करण्यासाठी जन्मली हे लक्षात घेतले पाहिजे. जोतीरावांच्या कवितेचे घराणेच निराळे आहे. या कवितेमागे जोतीरावांचे व्यक्तित्व आपल्या प्रत्ययासह व अभिप्रायासह उभे आहे. ईश्वर, आत्मा, धर्मभावना, वर्णव्यवस्था इत्यादी पारंपरिक कल्पना व नवा मूल्यविचार यातील संघर्ष व या संघर्षातून सिद्ध झालेला अनुभव हा जोतीरावांच्या कवितेतील आशय होता.'

('म. फुले गौरव ग्रंथ'--पृष्ठ ५१९)

महात्मा जोतिबा फुले यांच्याप्रमाणे आपल्या अभंगांना 'अखंड' असे न म्हणता कवी कृष्णराव भालेकर सरळ अभंग असेच म्हणतात. भालेकरांचे अभंग साध्या तसेच वेगवेगळ्या चालीवर म्हणता येतील असे अभंग आहेत. कवी कृष्णराव भालेकरांनी काही अभंग भूपाळी तर काही गौळणीच्या चालीवर म्हणता येतील असे अभंग लिहिलेले आहेत. यातील काही अभंग चार तर काही दोन चरणी आहेत.

जन्म ज्याशी मृत्यू त्यासी ।
प्रत्ययाशी येईल जाणा ।।४।।

(सीताराम रायकर : पूर्वोक्त, पृ. १२)

अशाप्रकारे चिंतन मनन करत कवी कृष्णराव भालेकर विद्येची महती सांगताना म्हणतात,

सांगतो विद्या शिका
नका टिका करू व्यर्थ ।।६।।

सर्वात श्रेष्ठ विद्याकांत
तोची शांत कृष्ण म्हणे ।।७।।

(पृ. १२)

सगळीकडे अज्ञानाचा अंधार आहे. भट आणि भिक्षुकांनी शूद्रांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन त्यांना ठकविले,

शूद्रा ठकविले । शूद्रा ठकविले
भटा भिक्षुके विचार करून ग्रंथ लिहिले ।

संधी साधुनी केले पहिले शूद्र अज्ञानी,
म्हणून घडले, शूद्रा ठकविले शूद्रा ।।धृ.।।१।।

(पृ. १५)

याला जबाबदार असणाऱ्या भटजी बाबाबद्दल कृष्णराव भालेकर म्हणतात :--

संपवी तुमचे भटजी बाबा ।
कळला आम्हा बककावा ।
ठसला असे शूद्र हेवा ।
अज्ञान जिवा शूद्रा ठकविले ।धृ. ।शूद्रा.।।३।।

(पृ. १६)

'भूपाळी' चालीवर म्हटल्या जाणाऱ्या ११ व्या क्रमांकाच्या अभंगात कृष्णराव भालेकर शूद्रांच्या सत्यपरिस्थितीचे वर्णन करतात,

अज्ञानाचे आगर । शूद्र दुःखाचे सागर ।
दारिद्र्यांचे नगर । शूद्र कष्टी सर्वस्वी ।।१।।

नांगरापाठी पळे । शूद्र अंगा वस्त्र न मिळे ।
उन्हामध्ये तळमळे । शूद्र क० ।।२।।

(पृ. १६)

१२ व्या क्रमांकाचाही संपूर्ण अभंग शूद्रांबद्दलच आहे.

सदोदित अतिश्रमुनी शूद्र दुःखा सुख मानुनी ।
मनच्या मनी वर्मोनी। शूद्र शोकानली जळती ।।१।।

समान गहू नाचनी शूद्रासमान तूप गुळवणी ।
समान गादी जमिनी । शूद्र शो० ।।३।।

(पृ. १६)

शुद्रांच्या परिस्थितीच्या एकदम विरोधी अवस्था भट-भिक्षुकांची आहे हे सांगताना भालेकर म्हणतात,

किती एक भट वर्तती, मद्य प्राशीती,
मांस भक्षिती, नित्य काळी हो। किती एक।।धृ. ।।१।।

व्यभिचारी घातकी मोठे, चोऱ्या कागद खोटे,
चोऱ्या करूनी पोटे, भरिती लोटे
सोडुनी भीती हो ।।धृ. ।।२।।

(पृ. १३)

शूद्र आणि भटजीबाबा यांच्यातील नाते शोषित-शोषक असे आहे. १४ व्या आणि १५ व्या अभंगात कवी कृष्णराव भालेकर म्हणतात :--

१) पशुतुल्य विद्याहीन। बहुअंशी शूद्र जन ।।१।।
भटजीचा भट कावा। काय जाणे शूद्रबाबा ।।२।।
शूद्र करी भट सेवा दुःख देऊनिया जिवा ।।३।।
वस्त्र भांडी ठेवी गहाण। राखी भटजीचा मान ।।४।।

(पृ. १७)

२) भटजीबाबा ऐका एक। मनी करावा विवेक ।।१।।
तुमचे तुम्हा विचारितो। शूद्र प्रश्न मी करितो ।।२।।

तुम्हापेक्षा आम्हा उणे। काय सांगा आहे गुणे ।।३।।
पोक्त विचाराने सांगा। कृष्ण म्हणे नये रागा ।।४।।

(पृ. १७)

शूद्र-दीनदलितांबद्दल शेतकरी कामगारांबद्दल कणव आणि याचे शोषक भट-ब्राह्मणांबद्दल सौम्य उपरोध-उपहास, या अंगाने कृष्णराव भालेकरांनी आपल्या अभंगांची निर्मिती केलेली आहे. शेवटी अंतिम सत्य सर्वांवर रामबाण उपाय विद्या आहे. त्या विद्येची महती गाताना कवी भालेकर म्हणतात :--

विद्या सर्व सुखाचे वस्त्र । विद्या महातेजाचे शस्त्र ।
विद्या शक्ती करवी शास्त्र । विद्येची विद्येची ।।१।।

विद्या जगाचे कल्याण । विद्यायोगे योगी ध्यान ।
विद्या शक्ती करवी ज्ञान । विद्येची ........... ।।२।।

विद्या पापाचे मारण । विद्या पुण्याचे कारण ।
विद्या शक्ती पिडाहरण । विद्येची ............ ।।३।।

विद्याज्ञाने साधुपण । विद्याज्ञाने सर्व गुण ।
विद्या शक्ती संरक्षण । विद्येची ........... ।।४।।

विद्या जाणे निर्गुणा । विद्या जाणे सगुणा ।
विद्या त्यजी अवगुणा । विद्येची ............ ।।५।।

विद्यारत्न हिऱ्याची खाणी । विद्या सत्यासत्य प्राणी ।
विद्या शक्ती कृष्णमानी । विद्येची ............ ।।६।।

(पृ. १७)

कृष्णराव भालेकरांनी विद्येचे गायलेले हे स्तोत्र सर्व बहुजनांना प्रेरणादायक आणि मार्गदर्शक आहे.

महात्मा जोतिबा फुले यांनी ईश्वराऐवजी निर्मिक असे संबोधन वापरले. त्या निर्मिकाचा थोडासा उल्लेख भालेकरांच्या चार चरणी एका अभंगात येतो. आम्ही सगळे शूद्र अज्ञानी विद्याहीन तसेच मतिमंद आहोत.

तेणे गेलो तुज विसरून, नाही स्मरण केले देवा ।
नाही केले तुझे ध्यान नाही केले कधी स्तवन
कैसे पडुनी विस्मरण, केले भजन मूर्तीचे ।

(पृ. १९)

मानवाला निर्मिकाचा विसर पडला आणि माणूस दगडाच्या मूर्तीच्या भजनी लागला,

तुज सर्वस्वी त्यजून, देव झाले हे ब्राह्मण
तुज ऐसे लेख दाऊन, घेतला मान आम्हाकरवी ।

(पृ. १९)

अज्ञानी सर्वहारा भोळ्या शेतकरी-बहुजनांकडून आम्हीच देव आहोत असे सांगून ब्राह्मणांनी स्वतःकडे स्वयंघोषित देवत्वाचा मान घेतला. तसेच बहुजनांना नीच आणि शूद्र म्हटले गेले,

नीच मानुनी आम्हासी, शूद्र नाव दिले सर्वांशी
ऐसे केले का आम्हासी, पाही त्याशी विचारूनी ।

आम्हा कैसे ते नाही सुख । अज्ञान क्लेश दारिद्र्य दुःख
ऐशा असंख्य पिढ्या झाल्या खाक, न हा शोक आवरे ।

(पृ. १९)

आम्हाला अपाय आणि धोका कोणाकडूनही नाही. तो फक्त भटांकडूनच आहे. हे सांगताना कृष्णराव भालेकर म्हणतात :--

आम्हा नाही राजाश्रय, नाही विद्वज्जन साह्य
आम्हा नाही द्रव संचय, मात्र अपाय धुर्तीचा ।

शेवटी कृष्णराव भालेकर देवाकडे-ईश्वराकडे एक मागणे मागतात,

शेवटी एक मागतो मागणे,
दु:खाचे मूळ अज्ञान असणे,
करिता विद्येचा प्रसार करणे
कृष्ण म्हणे नलगे दुसरे ।।७।।

(पृ. १९)

हितोपदेश मधील अभंग लिहण्यामागे कृष्णराव भालेकरांचा सर्वसामान्य, सर्वहारा, शूद्र, मजूर, शेतकऱ्यांचे प्रबोधन आणि उद्‌बोधन करणे हाच हेतू आणि उद्देश होता.

बारा मास कष्टती लोक रानीवनी ।
परी न मिळे पोटाशी अन्नपाणी ।
दारिद्र्ये बरे पीडिले घोर ध्यानीमानी ।
नाही जिवा विश्रांती ।
निर्जीव कांती नित्य चित्ती, कष्ट फार ।
धूर्तांनी मांडिला कहर । ठकविले भोळ्या फार ।।१।।

(पृ. १५)

असे बहुजन सर्वहारा-शूद्र, शेतकरी तसेच यांना नाडणाऱ्या धूर्त भटांचे वर्णन करून कृष्णराव भालेकर सर्वसामान्यांनी ‘विद्या शिका’ ! असा सल्ला देताना म्हणतात:--

द्वेषेबुद्धीने जातीनाम दिधले,
अज्ञान्यांवर ज्ञानीयांनी डाव साधले ।।३।।

त्यांचे झाले हित गेला घरी जीव येथे,
अज्ञानाने कष्टे झालो पशूहून जेथे ।।४।।

म्हणूनी बापहो का विद्या शिकाना,
नका जाऊ फसून त्या दुष्ट ठकांना ।।५।।

(पृ. १४)

**हिंदी गाणे--पदे**

कृष्णराव भालेकरांचे मराठी भाषेबरोबर हिंदी भाषेवरही प्रभुत्व होते. त्यांनी 'शेतकऱ्यांची थोरवी' या नावाचे एक हिंदी गाणे तसेच ५ पदे हिंदीतून लिहिलेली आहेत. तत्कालीन महाराष्ट्रातील बहुजन समाज मराठी तसेच हिंदी (दख्खनी हिंदी) भाषिक प्रदेशात विभागलेला होता आणि सर्वांपर्यंत आपले म्हणणे पोहचावे म्हणून भालेकरांनी हिंदी भाषेतूनही काव्याच्या रूपात आपले म्हणणे मांडले.

हम तो जमेदार लडके । नाम है अमीरोंसे बढके ।।धृ.।।

खेती खेती क्या तू जाने पाचो तत्त्व कसते है ।
मट्टी पाणी पवन तेजसे बादल घटमे घसते है ।।१।।

(सीताराम रायकर ; कित्ता, पृ. २१)

आम्ही शेतकरी पंचमहाभुतांच्या सान्निध्यात राहतो. आम्ही कष्ट करतो. शेती सगळ्यांची माता-पिता आहे हे सांगताना कवी कृष्णराव भालेकर म्हणतात :--

खेती धंदा अव्वल पैया सब प्राणियोंका पिता है ।
पिछे निकले कैयक हुन्नर खेती सबकी माता है ।।३।।

(पृ. २१)

कृष्णराव भालेकरांच्या हिंदी गाण्यात तसेच पदांमध्ये दख्खनी हिंदी खडी बोलीतील अनेक शब्द आलेले आहेत. त्यांनी लिहिलेली हिंदीतील पदे म्हणजे हिंदी वळणाचे अभंगच आहेत असे म्हटले तरी चालेल,

बडे नामके गुरू होकर क्यौं किई ठकबाजी,
विद्याबंदी शूद्रकू येही है इतराजी ।।धृ.।।१।।

गरीब होकर शूद्र बिचारे बहोत दीन उदासी,
विद्या नही करके तुमारे लेत ग्रंथोनसे फांसी ।।२।।

(पृ. १७)

अशाप्रकारे वरीलप्रमाणे कृष्णराव भालेकर गरीब आणि शूद्रांची हलाखीची परिस्थिती विशद करतात.

कृष्णराव भालेकरांनी लिहिलेल्या पाचीही पदांमधून आपला प्रबोधनाचा वसा नेटाने चालवलेला आहे. 'पंचकरण सिद्धांत देखकर,' 'जोगी निर्बानी निर्बानी,' 'रमता जोगी-रमता जो' आणि 'राज करो मछिंदर नाथजी' अशा वेगवेगळ्या लोकप्रिय आणि साध्यासोप्या चालीवर भालेकरांनी आपली हिंदी पदे लिहिलेली आहेत. ही पदे गाणाऱ्याला सोपी तसेच ऐकणाऱ्याचेही मनोरंजन करत प्रबोधन करणारी आहेत.

उदा.

१) भली मची थी धूम, आयधी आब सपडे हो तुम ।।धृ.।।

(पृ. १७)

२) राजे बे फामी बे फामी, क्या धूम मची बिकामी राजे बेफामी ।।धृ.।।

(पृ. १८)

३) मैं जानत ओबी मैं जानत ओबी,
छुपया बे तोबी छुपया बे तोबी, मैं ।।धृ.।।

(पृ. १८)

४) ख्याल करो रखो दिलमोजी,
भलाजी ख्याल करो रखो दिलमोजी ।।धृ.।।

(पृ. १८)

वरील सर्वच पदांमधून सर्वसामान्य दीन-दलित, भटके, आदिवासी शेतकरी तसेच बहुजनांची बाजू भालेकरांनी हिरिरीने मांडलेली आहे. वरील पदांना लोकगीताच्या जवळ जाणाऱ्या चाली सुचवल्यामुळे ती सर्वांना आवडतील, गुणगुणता येतील अशीच आहेत.

शिवाय ती दख्खनी हिंदी (खडी) बोलीतून लिहिल्यामुळे सर्वांना समजतील अशी सोपी आहेत.

**लावण्या**

शाहीर कृष्णराव भालेकरांनी काही उपदेशपर लावण्याही लिहिलेल्या आहेत. १८८९ च्या 'दीनमित्र' मासिकात कृष्णराव भालेकरांच्या पाटील कुळकर्णी, कष्टकरी, राजाचा दरबार, दारूबाज, कुळकर्णी पठ्ठा, दुकानदार शेटजी या शीर्षकाच्या तसेच काही उपदेशपर लावण्या प्रकाशित झालेल्या आहेत. या लावण्यांना भालेकरांनी वेगवेगळ्या चाली सुचवलेल्या आहेत. उदा. 'कुळकर्णी पठ्ठा' ही लावणी 'मुखडापर मुखडा' तर 'दुकानदार शेटजी' ही लावणी 'कोकणी वस्ती जी जी' या चालीवर म्हणाव्यात असे भालेकर सुचवतात तर काही उपदेशपर लावण्या नको येऊ माझ्यामागे, 'श्रीरंग गोपीको', 'दो दिवसाची तनू ही साची', अनुक्रमे या चालींवर म्हणण्यात याव्यात असे भालेकर म्हणतात. अडाणी पाटील आणि धूर्त कुळकर्णी तसेच शिपाई आणि मामलतदाराची व्यक्तिचित्रे शाहीर कृष्णराव भालेकर आपल्या पाटील कुळकर्णी या लावणीत रेखाटतात,

पाटील कुळकर्णी पहा मजेने कसे बसले चावडीत ।
सरकारचा येता शिपाई मग सापडे तावडीत ।।१।।

पाटीलदादा पाटीलदादा घ्या तुमचा हा लखोटा ।
कारकून तुमचा कुळकर्णी वाचून पहा खरा खोटा ।।२।।

पाटीलबुवा बैल वशींड्या बोलण्यामध्ये पोपट ।
लिहिण्याचे नावाने पूज ती रेघ निशाणी धोपट।।३।।

कानी पगडी डावी भाळ गळा जानवे दोरखंड ।
धोतराचा सोगा फट फट वाजे जोडा अखंड ।।४।।

कुळकर्णी शिपाई मिळाले काही कळेना या दादा
सही करूनी भोळा फसला कसा जाणतो कायदा ।।५।।

(सिताराम रायकर कित्ता, पृ. ३२)

कृष्णराव भालेकरांनी ही लावणी चाल बदलून दोन भागात लिहिलेली आहे. तर कुणब्याचे करुण असे चित्र 'कष्टकरी' या लावणीत येते,

सारा दिवस कष्ट करकरून ।
मेले माळी कुणबी झुरझुरून ।
नाही वस्त्र, अन्न पोट भरून ।
हो किती रहावे तरी जीव धरून ।।१।।

(पृष्ठ ३३)

'राजाचा दरबार' या लावणीत शेतकऱ्याला कष्टकऱ्याला न्याय मिळवण्यासाठी अनंत अडचणींना तोंड द्यावे लागते. त्याच्या वाटेत अनंत अडथळे असतात,

दरबारीचे लहान मोठे कामदार बाके ।
अधिकाराने फुगती जैसे सावकार लाखे ।।८।।

रेड्यापरी गुरकून बोले सांगेना काही ।
पानसुपारी घेण्याकरिता कुऱ्यातच राही ।।९।।

लाच खाण्याचा मोठा सपाटा कामदारात ।
पगाराच्या दसपट जिनगी कैसी घरात ।।११।।

(पृष्ठ ३३)

वरीलप्रमाणे भ्रष्ट अधिकाऱ्यांविरुद्ध सर्वसामान्यांना लढण्याचा सल्ला देऊन यावर उपाय म्हणून गावोगावी पंच नेमावेत असे भालेकर सांगतात.

गावोगावी नेमा पंच न्याय अपसात ।
म्हणे भालेकर मिळेल सुख थोड्या दिवसात ।।१५।।

(पृष्ठ ३३)

'दारूबाज' या लावणीत दारूबाजाचे तसेच दारूमुळे निर्माण झालेल्या त्याच्या संसाराच्या दयनीय परिस्थितीचे आणि त्याच्या दुर्दशेचे भालेकर वर्णन करतात

नाही ठेविले घरामध्ये काही दारूचे पायी ।
दु:ख ते साही । बायका-मुले फार अन्नवस्त्राने बेजार ।।३।।
घरदार विकले पार । झाला ऋणदार । सोडी रोजगार ।
तोंड ते करी काळे । मग शिकला चोरचाळे ।।४।।

(पृ. ३४)

दारूबाजाच्या बायकोमुलांची आबाळ होते. पण तो आपली जिम्मेदारी जबाबदारी विसरून पिण्यातच मश्गूल असतो हे सांगताना भालेकर म्हणतात :--

बायको मोलमजुरी करी । मीठभाकरी
नसे पोटभरी । मुलांचे कोण ते हाल
निशामध्ये हा रंगलाल ।।५।।

हा पितो गुंगतो सदा । पडे बदबदा
हसे गदगदा बोंब रड वाद्याची
मजा पहा या गध्याची ।।६।।

(पृ. ३४)

आणि मग शेवटी कृष्णराव भालेकर---

'दारूचा नाद हा खोटा सर्वदा तोटा'

(पृ. ३४)

-असा निष्कर्ष काढून वरील लावणीचा शेवट करतात. आपल्या एका उपदेशपर लावणीत शाहीर कृष्णराव भालेकर धूर्त **कुळकर्णी** आणि अज्ञानी पाटलाचे वर्णन करताना म्हणतात :--

कुळकर्णी हा म्हणे पाटला नकोरे कुरकुरू
पाटला नकोरे कुरकुरू ।।
तुम्ही लोक हे माहीत अवघ्या तोंडाचे गबरू ।।धृ।।

सरकाराशी मारून टक्कर आम्हीच दमधरू ।।पा.आ।।
खोट्याचे ते खरे, खऱ्याचे खोटे ही करू ।।१।।

(पृ. ३५)

कृष्णराव भालेकरांनी कुळकर्ण्याच्या तोंडून वदवलेली ही लावणी, कुळकर्ण्याच्या दृष्टीने पाटील म्हणजे---

अक्षरशत्रू पाटील लोक गर्वाची आबरू ।।पा.ग.।।
प्रसंग येता भिऊन पळता घाबरू घाबरू ।।२।।

(पृ. ३५)

अशा प्रकारे एकदम अडाणी आणि भोळसट माणूस. सत्यशोधक कृष्णराव भालेकर भट कावा पुरेपूर ओळखून आहेत. एका लावणीत भटजीला अद्देशून ते म्हणतात :--

घरभरणीची तूप पोळी खाता नाही अडला ।।भ।।
का शनवारवाडा पडला ।। की नाही ? ।।२।।

राज्यावरती बसतेवेळी लाखो पैसा खाई ।।भ।।

का गेली बाजीराई ।। की नाही ? ।।३।।

(पृ. ३५)

तुम्ही गरिबांशी गोचिडाप्रमाणे लागलेले आहात. अडाणी तसेच काबाडकष्ट करणाऱ्यांना तुम्ही भिती घालता या हिंदुस्थानात गोरे लोक आले तेव्हा त्यांनी काळवेळ मुहूर्त पाहिलेला नव्हता पण भटजीबुवा तुम्ही मुहूर्ताचे स्तोम माजवता. शेवटी बुवाला उद्देशून कृष्णराव भालेकर म्हणतात:--

कृ० पां० भा० म्हणतो वेळ सांगा खाशी ।।भ।।
कुभांड्या द्याया फाशी ।। की ।।९।।

(पृ. ३६)

शुद्र-शेतकरी कुणबी सर्वहारा कामगार बहुजनांच्या विरोधात कुभांड रचणाऱ्या सावकार भटभिक्षुकांना फाशी देण्यासाठी वेळ अर्थात मुहूर्त कोणता ? असे भालेकर सडेतोडपणे म्हणतात. तेव्हा ग्रामीण-दलित-भटके आणि देशी साहित्यातील विद्रोहाची सुरुवात आधुनिक मराठी देशी कवितेच्या सुरुवातीलाच झाली होती, हे आपणाला महात्मा फुले आणि कृष्णराव भालेकर यांच्या कवितेवरून सांगता येईल.

'दो दिवसाची तनू ही साची' या चालीवर कृष्णराव भालेकरांनी लिहिलेल्या लावणीत कुळकर्णी बहुजनांना कशा थापा मारतो लोकांना नाडतो त्यांच्यात विघ्ने पसरवतो याचे वर्णन आलेले आहे,

कुळकर्ण्याची, मने भरण्याची, भेद करण्याची, पहा मजा ।।
याचे त्याला, सांगे भलत्याला, म्हणे कर्त्याला, मला भजा ।।१।।

करी वटवट, बोले सटफट सारी लटपट खासी ।।
लोक अज्ञान, देती मान, मोताद अन्नपाण्याशी ।।४।।

कुणबी मेले, बडून गेले, काहूर आले दुःखाचे ।।
जाईल विसरून, विघ्ने पसरून, घेऊ पांघरूण सुखाचे ।।५।।

(पृ. ३६)

शेवटी कुळकर्णी ऐशआरामातच सुखाचे पांघरूण घेऊन जगतो. लावणीच्या शेवटी कृष्णराव भालेकर----

थांबा थोडे, गाडीघोडे उडवू भाडे करीजे ।।
भालेकर मागे अधिकार घरे सरकार भरीजे ।।७।।

(पृ. ३७)

असे म्हणतात तर दुकानदारावरील एका लावणीत, 'नका लावू बट्टा अबरूला' असे दुकानदाराला ठणकावून बजावतात.

७. पृष्ठ ३७.

'शेतकऱ्याचे मधूर गायन' या विभागात सीताराम रायकर यांनी कृष्णराव भालेकर यांच्या दोन लावण्या संपादित केलेल्या आहेत. पैकी 'भोळया ताक मिळेना धूर्ता तूप गिळेना' या लावणीत भालेकरांनी शेटजी सावकार आणि भोळया माणसाचे शब्दचित्र रेखाटलेले आहे.

शेटजीच्या पहा स्त्रिया सोन्या मोत्यात ।
भोळयाच्या बायकोपाशी काटा नाकात ।।५।।
अज्ञानाने भोळा बनला काही न कामाचा ।
स्वार्थ ना परमार्थ जैसा जन्म हेल्याचा ।।६।।

(पृ. ३०, ३१)

या लावणीच्या शेवटी शाहीर कृष्णराव भालेकर बहुजनांना विनंती करत विद्यादेवीची महती सांगताना म्हणतात,

भालेकराची हीच विनंती विद्या शिकावी ।
तिसरा डोळा देईल तुम्हा हीच हो देवी ।।७।।

(पृ. ३१)

'आपण पाहू' या लावणीत भालेकर शेतकरी जीवनाची तत्कालीन परिस्थिती विशद करत त्याच्या दुःखाच्या मुळांचा शोध घेताना दिसून येतात,

पहा शेतकरी किती  कष्टकरी जरी श्रेष्ठ तरी त्या काय कळते ।
म्हणून जाऊ या शोध करू या पुरे पाहू या काय छळते ।।१।।

(पृ. २५)

या लावणीच्या शेवटी कृष्णराव भालेकर खालीलप्रमाणे इशारा देऊन (बहुजनांना) लावणीचा शेवट करताना म्हणतात :--

म्हणे भालेकर बघुनि दुरवर शोधा दृढतर दुःखमुळा ।
म्हणूच नका लहान चुका होतो त्यांचा पुढे खिळा ।।५।।

(पृ. २५)

हा इशारा सावध होण्यासंबंधीचा आहे. शाहीर कृष्णराव भालेकरांनी लिहिलेल्या लावण्या आणि पारंपरिक लावण्या यात अनेक बाबतीत वेगळेपण आहे. शृंगार आणि प्रेम हा पारंपरिक लावणी वाङ्मयाचा मूळ आशय बाजूला ठेवून सर्वहारा शेतकरी कामगार बहुजनांच्या उन्नतीसाठी, प्रगतीसाठी कृष्णराव भालेकर येथे लावणी हा काव्यप्रकार हाताळतात. त्या काळातील सर्वहारांच्या बहुजनांच्या सामाजिक परिस्थितीचे चित्रण करण्यासाठी भालेकरांनी आपल्या लावणीसाठी करुण रसाचा आधार घेतलेला आहे. या लावण्या उपदेश व उद्बोधनपर आहेत. सर्वसामान्यांचे प्रबोधन करणे हा या लावण्यांचा मूळ हेतू आणि उद्देश आहे. आणि यात सत्यशोधक कृष्णराव पांडुरंग भालेकर यशस्वी झालेले आहेत असे आपणाला निर्विवादपणे म्हणता येईल.

**गाणी--फटका**

या विभागात कृष्णराव पांडुरंग भालेकर यांनी लिहिलेली जवळ जवळ ३० गाणी आलेली आहेत. ही गाणी गळ्यावर म्हणता येतील, साध्या सोप्या चालीवर गाता येतील अशी आहेत. सुरुवातीला ‘ईशस्तवन’ आणि ‘नृपवंदन’ या दोन गाण्यांमधून क्रमशः भगवंताचे स्तवन तसेच महाराजाला वंदन केले गेले आहे. या विभागातील सगळी गाणी गाण्यासाठीच लिहिल्यामुळे लय आणि तालाची बंधने पाळून लिहिलेली आहेत. तसेच यातून तत्कालीन शेतकरी शेतमजूर दीन-दलित-शुद्र-अतिशूद्र बहुजनांची परिस्थिती तसेच यांना लुटणाऱ्या लुबाडणाऱ्या धूर्त सावकार भटभिक्षुकांचे वर्णन या गाण्यांमधून आलेले आहे. आणि चांगली गीते ही चांगल्या कविताच असतात. म्हणून या गीतांमधून कृष्णराव भालेकरांमधील सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या कवीचे दर्शन घडते,

पाटील आमुचे मालक मूळचे गावाच्याही बहू आधीचे।
आरंभाशी धैर्यबळाशी साह्यमिळावे पहा ज्यांचे ।।धृ।।

(सीताराम रायकर : कित्ता पृ. २१)

‘पाटीलकी’ या कवितेत कवी कृष्णराव भालेकर मानवाची आदिम अवस्था रेखाटताना सर्वाआधी शेतकरी होता हे सांगताना म्हणतात :--

जंगलामाजी जंगली प्राणी मानव जंगली असताना ।
हिंसकानी बहू भक्षिले अपराध काही नसताना ।।१।।

तेव्हापासुनी टोळ्या करूनि फिरू लागले चोहीकडे।
जाळी कपारी लपत फिरले दरी डोंगरी उंच कडे ।।२।।

नव्हती शस्त्रे नव्हती वस्त्रे नव्हती गोत्रे सांगाया ।
नवरा बायको नाती नव्हती, नव्हती बोली बोलाया ।।३।।

(पृ. २१)

सुरुवातीला माणूस कंदमुळे आणि फळे खाऊन जगला नंतर धान्याची पेर झाली मानवी वस्ती वसली, नंतर --

'स्वसंपादित शेतकऱ्यांची अद्याप वतने वस्तीशी ।
राज्ये हजारो लोटत आली खडे शिपाई दस्तीशी ।।६।।

म्हणे भालेकर शेतकऱ्यांची सर्वाआधी मूळ झोपडी ।
नंतर नगरे राजवाडे मूर्ती देवळे गाडी घोडी' ।।७।।

(पृ. २१)

सर्वाआधी शेतकऱ्याची  मूळ झोपडी होती. नंतर मग सर्व काही होत गेले हे अंतिम सत्य कृष्णराव भालेकर वरील गीतात निर्भिडपणे सांगतात,

मुले पाठीशी बांधूनि  पहा त्या स्त्रियांसह राबतो।।८।।
तूप लोणी गहू तांदूळ विकूनी खाणे निकस खातो ।।९।।
आळशी ठोंब्या भटाभिक्षुका कष्ट करूनी पोशितो ।।१०।।
म्हणे भालेकर धूर्तची आळशी कष्टकऱ्या लुटतो ।।११।।

(पृ. २२)

शेतकऱ्याला धूर्त लोक लुटतात तो सर्वांना पोसणारा पोषक आहे तरीही त्याला लुटले जाते. त्याची लुबाडणूक होते,

शेतकरी पोषक देशाचे बळीरायाचे वंशाचे।
संख्या मोठी सत्ता मोठी तसेच मूळधन पैशाचे ।।धृ।।
शेतकऱ्यांना बहु दु:ख कष्ट करूनी नाही सुख ।
नीचपणाने धूर्तपणाने लुटती धूर्त महामूर्ख ।।१।।

(पृ. २२)

कवी कृष्णराव भालेकरांनी भिक्षुक आणि यजमान या कवितेत बहुजनशेतकरी आणि भिक्षुक या दोघांची तुलना केलेली आहे. दोघांमध्ये जमीन अस्मानाचा फरक आहे. हे सांगताना भालेकर म्हणतात,

यजमानाला धडुतरकटे तेही नाही पुरते ।
भिक्षुकाचे लांब धोतर ढेरीखाली सरते ।।१।।

(पृ. २२)

यजमानाच्या (शेतकरी) मुंडाशाला सतरा गाठी मारलेल्या असतात तर भिक्षुकाच्या बांधीव पगडीला मजेचे शोभिवंत टाके मारलेले असतात. यजमानाच्या गरिबीचे आणि भिक्षुकाच्या श्रीमंतीचे वर्णन करताना त्यांच्या सांसारिक वस्तूचा निर्देश करताना कवी कृष्णराव भालेकर म्हणतात :--

यजमानाचा फुटका थाळा । परळ मडकी तीन ।
भिक्षुकाची कळशीगडवा ताटेवाट्या छान ।।५।।

(पृ. २२)

शेतकरी बहुजनांना अनेक त्रासाला तोड द्यावे लागते त्याच्यामागे अनेक विघ्ने लागतात, त्यांना गुरांच्या मागे पळावे लागते. जंगलझाडीत व अंधारात चालावे लागते.

कोल्हे, तरस, लांडगे, विंचू । दंश करिती तरी न हू चूं ।।६।।

(पृ. २३)

कवी आणि समाजसुधारक 'कृष्णराव भालेकरांनी आपली लेखणी समाज सुधारणे-साठीच झिजवली'. त्यांच्या प्रत्येक शब्दातून आणि कृतीतून तळमळीच्या कार्यकर्त्याचे दर्शन घडते. जोतिषशास्त्रातील मुहूर्ताचे फोलपण सांगाताना भालेकर म्हणतात :--

मुहूर्त पाहुनी राजा शिवाजी गादीवर बसला ।
वंश त्याचा पेशव्याशी का पुढे फसला ।।३।।

भीकमागे राजे झाले यजमाना फसवूनी ।
गादी स्थापिली सुमुहूर्ते परी गेली लोपोनी ।।४।।

जरी सुमुहूर्ते विघ्ने पुढची सहज टळती ।
शास्त्री पंडित यांच्या पोरी विधवा का होती ।।५।।

(पृ. २३)

शेवटी मुहूर्त पाहणे म्हणजे अंधश्रद्धेला खतपाणी, असेच येथे भालेकरांना सुचवावयाचे आहे. 'मुहूर्त' या कवितेच्या शेवटी सार काढताना,

मुहूर्त गप्पा भरण्यासाठी पोटाची खाई ।।६।।

(पृ. २३)

असे म्हणून भालेकर कवितेचा शेवट करतात.

'कुळकर्णी व तगाई' या गीतात भालेकर,

कुळकर्ण्यांचा पोऱ्या हो बाळपणीचा मोऱ्या हो ।
आता झाला मोरोपंत करितो मोठ्या चोऱ्या हो ।।धृ।।

(पृ. २४)

अशी मार्मिक सुरुवात करून कुळकर्णी कारकून आणि शेतकऱ्याचे शब्दचित्र रेखाटतात,

कुळकर्णी मग रागावला । शिव्याच देऊ लागला ।
बाकी रुपये मेल्यावरती मिळतील स्वर्गी खायाला ।।४।।

(पृ. २४)

या गीतात नंतर मारवाडी, कलेक्टरसाहेब या व्यक्तिरेखा हजेरी लावून जातात,

गावचा पाटील कसा असावा ? हे सांगताना 'खरा पाटील' या गीतात कृष्णराव भालेकर म्हणतात,

पाटील कैसा गावी असावा ।
मायबाप तो रयतेला।
शुद्धाचरण सत्य भाषण
मोठे भूषण गावाला ।।धृ।।

गावात नाही कोठे दुही
समान पाही सर्वाला ।
साधे राहणे सभ्यतेने
जागा नाही गर्वाला ।।१।।

(पृ. २५)

पाटील हा असा सर्वांना बरोबर घेऊन जाणारा, सर्वांना समतेने वागवणारा असावा असे कृष्णराव भालेकर म्हणतात.

'मारवाडी' या गीतात मारवाड्याच्या दुकानाचे आणि शेटजीचे वर्णन आलेले आहे. या कवितेत कृष्णराव भालेकरांनी मारवाड्याच्या तोंडून मारवाडी बोलीभाषाही वापरल्याने कव्याला जिवंतपणा येतो,

दुकानाचे पहिले ग्राहक साध्याभोळ्या बाया।
पायली अधोली दाणे देऊनी गरममसाला घ्याया।।५।।

गुडानो पैसो पैसारो गुड हिशोब होतो पुढती ।
फाग, होळी शिमगा ऐसे महिने मग जुळती ।।६।।

(पृ. २५)

शाहीर कृष्णराव पांडुरंग भालेकर यांनी 'खोट्या नादी लागू नका' हा फटका लिहिलेला आहे,

खोटा गुरू हा लटका भटजी नादी अशांच्या लागू नका ।
छंदी अशांच्या लागू नका हो नादी अशांच्या लागू नका...।।धृ।।

(पृ. २३)

लोकांना बहुजनांना उपदेश करणे शहाणे करून सोडणे हे आपले व्रत आहे. असे भालेकरांना सतत वाटते,

डौलासाठी लोकासाठी खर्चामध्ये बुडू नका।
सत्य इच्छा सत्य बोला सत्याचरणा सोडू नका ।।१।।

खोटा धर्म खोटा पक्ष खोटा पंथ जोडू नका ।
खोट्या गुरूची खरीच सेवा उगाच तुम्ही करू नका ।।२।।

(पृ. २४)

या फटक्याची चाल शाहीर अनंत फंदीच्या गाजलेल्या फटक्याशी मिळतीजुळती असली तरी आशय मात्र वेगळा आहे. फटक्याची ही चाल लोककलेला जवळची असल्यामुळे लोकांमध्ये बहुजनांमध्ये लोकप्रिय झाली आणि लोकांचे उद्‌बोधन-प्रबोधन करणे हा कृष्णराव भालेकरांचा हेतू सफल झाला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. शेवटी या फटक्यातून शाहीर कृष्णराव भालेकर सर्वांना सत्यशोधक होण्याबद्दल सुचवतात,

म्हणे भालेकर सत्यशोधक व्हा बाबांनो भिऊ नका।
धर्मगुरूंचे फेका जोखड मान खाली घालू नका ।।६।।

(पृ. २४)

धर्मगुरूंचे जोखड फेकून टाका असा रास्त सल्ला कवी आणि सत्यशोधक कृष्णराव भालेकर सर्वांना देतात. अशा प्रकारे शाहीर आणि कवी कृष्णराव भालेकरांनी पाटीलकी, शेतकऱ्याची थोरवी, धूर्तांचे म्हणणे, शेतकऱ्यांच्या उपदेशासाठी आम्ही वाहिलो आहो, भिक्षुक आणि यजमान शेतकऱ्याचे जिणे, मुहूर्त, खोट्या नादी लागू नका, कुळकर्णी व तगाई, खरा पाटील, मारवाडी, भटजी, शेतकरी उठा, शेतकऱ्यांची मुले, नवीन पूजा, हेच

सांगणे शेतकरी आणि कारागीर हेच देशाचे खांब खंबीर, शेतकरी, यजमान, शेतकरी वीर- अंगना, मोठे शेठ सावकार पुजाऱ्या दुकानकी तीर्थ ? उपदेशाचा फंद, सोवळे, शेतकरणी, भट हाच शनि, शेतकऱ्यांवर दंग, शंकराचार्य आणि शेतकऱ्याची स्थिती या नावांची गाणी अर्थात गीते लिहिलेली आहेत. गीतांच्या वरील नावावरूनच त्यातील विषयाची कल्पना येते. इतकी ती पारदर्शी आहेत. सर्वहारा बहुजनांचे करुण चित्रण या काव्यातून घडते तर प्रत्येक गाण्याच्या शेवटी शाहीर कृष्णराव भालेकर सर्वसामान्य लोकांना उपदेश करून त्यांचे प्रबोधन करताना दिसून येतात. समाज प्रबोधनाच्या चळवळीसाठी गाण्यांची निकड असते. ती गरज शाहीर कृष्णराव भालेकरांच्या गाण्यांनी भागविली असे म्हटले तरी चालेल.

●●●

# ३

# पंचखेळ

सत्यशोधक कृष्णराव पांडुरंग भालेकर हे कल्पक बुद्धीचे होते. हे त्यांनी काढलेल्या 'पंचखेळ' या नवीन खेळावरून म्हणता येईल. या खेळाबद्दल सीताराम रायकर म्हणतात,

"१८८१ ते १८८३ पर्यंत त्यांनी निरा कॅनॉल बिरवाडी येथे हेडवर्कवर सबओव्हरसिअरचे काम केले. या कामाबद्दल त्यांना सर्टिफिकेटही मिळाले होते. या काळात त्यांनी 'पंचखेळ' नावाचा गंजिफाचा खेळ प्रसिद्ध केला. हा खेळ म्हणजे भालेकरांच्या कल्पकतेचा आणि त्यांच्यातील अव्वल दर्जाच्या प्रचारकाचा उत्कृष्ट पुरावा आहे. या खेळामध्ये नेहमीप्रमाणे बावनपानी पत्ते, दशावतारी गंजिफा हे खेळ खेळता येत पण त्याच बरोबर राजकीय सामाजिक मतांचा खेळही खेळता येत असे. या खेळामध्ये काळा, पांढरा, हिरवा, तांबडा आणि पिवळा असे पाच रंग भरले होते. हा खेळ कसा खेळावा याबद्दल सविस्तर सूचनाही एका पुस्तिकेच्या द्वारा देण्यात आल्या होत्या."

(सीताराम रायकरः पूर्वोक्त, पृ. ११ प्रस्तावना)

सन १८८२ मध्ये कृष्णराव भालेकरांचे मोठे बंधू रामचंद्र पांडुरंग भालेकर यांनी प्रकाशित केलेल्या' 'पंचखेळ' या छोट्या ग्रंथासाठी कृणराव भालेकरांनी एक छोटी प्रस्तावनाही लिहिलेली आहे. प्रस्तावनेत रा. रा. कृष्णराव भालेकर जेव्हा--

"मनोरंजनार्थ स्त्रिया, पुरुष व मुख्यत्वेकरून मुले पुष्कळ प्रकारचे खेळ खेळत असतात. यासाठी शोधकांनीही अनेक रीतीचे खेळ प्रचारात आणून सोडले आहेत. परंतु त्यातील एखादा खेळ साधारण मनुष्यासदेखील खेळता येऊन त्यापासून त्यांचे मनावर चांगले गोष्टीचा ठसा उमटतोच असे दिसून येत नाही. देशबांधवांची सुधारणा व्हावी

म्हणून शक्तिनुसार प्रयत्न करणे व त्यास मदत होणे हे प्रत्येक मानवी प्राण्याचे कर्तव्य होय. मोठमोठाले विद्वान व मेहनती लोकांचे प्रयत्न चालले आहेतच. त्यास मदत व्हावी म्हणून मी १२० पानांच्या गंजिफांचा हा एक नवीन प्रकारचा खेळ तयार केला आहे. याची योग्यता काय आहे हे खेळ पाहिल्यावर सुज्ञ लोकांस कळून येईल. अज्ञान वर्गातील लोकांचे होतकरू मुलास याचा विशेष उपयोग होणार.....''

(पृ. ११३, ११४)

असे म्हणतात तेव्हा हा खेळ तयार करण्यामागील त्यांची भूमिका आणि उद्देश स्पष्टपणे आपल्या लक्षात येतो. ह्या खेळाची पुस्तिका रा. रा. कृष्णरावांच्या बंधूंनी 'लोकहितार्थ', प्रसिद्ध केलेली आहे. हेही येथे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. हा खेळ कसा खेळावा याबद्दल माहिती देऊन कृष्णराव भालेकर खेळकर्त्यांना काही सूचना देतात. त्या सूचना आणि माहिती खालीलप्रमाणे,

''या खेळाचे नाव पंच असे ठेवले आहे. हा खेळ मुख्यत्वेकरून पानांनी खेळण्याचा असून ह्याची १२० पाने आहेत. २४ पानांचा वर्ग असे पाच वर्ग केले आहेत. प्रत्येक वर्गाचे चित्रास भोवती निरनिराळ्या रंगाची हद्द आहे व तोच त्या पानाचा रंग समजावा. पहिला काळा, दुसरा पांढरा, तिसरा हिरवा, चौथा तांबडा आणि पाचवा पिवळा. वर्गानुक्रमे त्यांची योग्यता अधिकाधिक जाणावी, जसे निरनिराळ्या रंगांची परंतु एकाच प्रतीची पाने असली तर पिवळ्यास तांबडा मारील. तांबड्यास हिरवा, हिरव्यास पांढरा व पांढऱ्यास काळा मारील काळ्या रंगाचा पुढारी (१) ज्याकडेस येईल, त्यास त्या खेळापुरता राज्याधिकार दिला आहे असे समजून त्याने; ज्याकडेस येईल त्यास त्या खेळापुरता राज्याधिकार दिला आहे. असे समजून त्याने, ज्या कडेस पिवळ्याचा चोविसावा येईल; त्याचपासून पाच व इतरांपासून एक अशी खंडणीदाखल पाने घ्यावीत ते आणि त्याजकडेसच पिवळ्याचा चोविसावा आल्यास सर्वांपासून एकेकच घ्यावे व हवी ती परत करावीत. काळ्यांचा पुढारी (१) व पिवळ्यांचा पुढारी (१) असे दोन्ही ज्याच्याकडे येतील तो त्या खेळापुरता जणो काय प्रजा व राजा यावरही अधिकार चालविणारा नेमला आहे असे समजून खंडणी दाखल त्याने सर्वांपासून पाच पाच पाने घ्यावीत व हवी ती तितकीच परत करावीत परंतु पिवळ्याची चोवीसही आल्यास दोनदोनच घ्यावीत. जूट एकी म्हणजे १-२-३-४

किंवा २-३-४-५-६ किंवा १७-१८-१९ अशी मध्ये खंड न पडता एकाच रंगाची कोठूनही आरंभ झालेली पाने आल्यास तेवढ्या एक्या आपणापाशी आहेत म्हणून समजावे. फूट एकी म्हणजे निरनिराळे रंगाची परंतु एकाच प्रतीची. जसे काळयाच्या ३ पिवळयाच्या ३ तांबड्याच्या ३ याप्रमाणे ४-४ ची किंवा ८-८ ची किंवा १६-१६ ची अशी दोन तीन चार अगर पाच पाने आल्यास त्या फूट एक्या समजाव्या. जर एकीचे मुख्य पानापेक्षा अधिक प्रतीची व तितक्याच पानाची फूट एकी आपणापाशी असल्यास ती जूट एकीस मारू शकेल तसेच त्या फूट एकीस मारणे झाल्यास आपणापाशी जूट एकीचे मुख्य पान निदान फूट एकीचे बरोबरीचे असावे. कोणी तांबडा, हिरवा आणि पांढरा अशाची फूट एकी उतरल्यास तीस काळा व पिवळा याची जरी दोन पानाची आपणापाशी फूट एकी असली तरी ती मारू शकेल''

(पृ. ११४, ११५)

अशा प्रकारे अत्यंत बारीकसारीक सूचना करत कृष्णराव भालेकर खेळाचे नियम सांगून आणखी माहिती सांगताना खेळण्याची मुख्य रीत सांगत खेळाडूंना विनंती करताना म्हणतात,

''पान उतरल्यास त्यास त्याच रंगाचे पानाने मारू नये. इतर रंगाचे श्रेष्ठ पानाने मारावे. भरती देणे झाल्यास मात्र रंगास रंग यावा. खेळास आरंभ करणे तो ज्या कडेस काळयाचा पुढारी (१) आला असेल त्याचे त्याबरोबर त्याच रंगाचे अगर पिवळयाचे फालतुक पान घेऊन उतरावे व ह्यास कोणीच मारू शकणार नाही. जूट एकीस अगर फूट एकीस भरती देणे झाल्यास उतरलेल्या एकीतील मुख्य पानाचे रंगास रंग देऊन बाकीच्यास हवी त्या रंगाची भरती द्यावी. शेवटचा हात जो मारील त्याने आपले डावे बाजूकडील खेळणारापासून तो मागे राहिला म्हणून पुढील डावी पाच पाने घ्यावी, येणेप्रमाणे खेळण्याची मुख्य रिती होय. आता या खेळावर लोक पुष्कळ प्रकारच्या पद्धती बसवितील परंतु त्यांना माझी इतकीच विनंती आहे की यातील खेळण्याचा मुद्दा सोडू नये.''

(पृ. ११५)

कवी कृष्णराव पांडुरंग भालेकर यांनी तयार केलेल्या या खेळाबद्दल प्रस्तावनेत सीताराम रायकर म्हणतात,

"हा खेळ अतिशय लोकप्रिय झाला होता. या खेळामध्ये प्रत्येक पानासाठी एक म्हण असे. ही म्हण म्हणजे एक स्वयंपूर्ण पद्यपंक्ती असे. अशा २४ पद्यपंक्ती एकत्र करून झालेल्या कवनास भालेकर श्रीखंड म्हणत. असे पाच रंगाकरिता ५ श्रीखंड त्यांनी तयार केले व पुढे ते 'श्रीखंड' या शीर्षकाखाली दीनमित्रच्या पहिल्या वर्षाच्या पहिल्या पाच अंकात छापले."

(सीताराम रायकरः पूर्वोक्त पृ. ११ प्रस्तावना)

थोडक्यात कृष्णराव भालेकरांनी काळा, पांढरा, हिरवा, तांबडा आणि पिवळा या पाच रंगाचे पाच वर्ग सांगून प्रत्येक वर्गात २४ पाने असे एकूण १२० पानांचा अर्थात पाच रंगाचा हा पंचखेळ आहे असे म्हटले आहे.

प्रत्येक वर्गात २४ पाने असून प्रत्येक पानासाठी कृष्णराव भालेकरांनी एखाद्या प्राण्याचे किंवा पक्षाचे चित्र छापण्यास सांगून त्याला विशेष नाव देऊन त्या विशेष नावावरून त्या पानावर एक म्हण अशा एकूण १२० म्हणीसुद्धा दिलेल्या आहेत.

उदा.-

रंग पांढरा (वर्ग) २ रा

| नावे | नंबर | प्राणी | म्हणी |
|---|---|---|---|
| विद्वान | १ | हत्ती | विद्वानाचा मान मोठा, नाही सुखाशीही तोटा |
| अभ्यासी | २ | मधमाशी | वसे अभ्यासाचे मनी, असो विद्या नवी जुनी |
| सदोपदेशक | ३ | रात्रकिडा | सदोपदेशाचे बळे, लोका नाही ते ते कळे |
| बुद्धिवान | ४ | काकाकव्वा | बुद्धिवान करी बोले, ना ते श्रीमंताशी तोले |
| नियमिस्ट | ५ | कोंबडा | नियम नेमिष्टाचा खरा, काय साधेल त्या खरा |

येथे हत्तीसाठी विद्वान, मधमाशीसाठी अभ्यासी तर कोंबड्यासाठी नियमिष्ट असे त्या त्या पानासाठी नाव देऊन तो प्राणी किंवा पक्षी तसेच त्यांच्या विशेष स्वभाव-नावावरून तशी म्हण कृष्णराव भालेकरांनी लिहिलेली आहे. पंचखेळ किंवा श्रीखंडातील प्रत्येक म्हण यमक साधून लिहिल्यामुळे भालेकरांमधील कवित्वाची जाणीव होते.

कृष्णराव भालेकरांची निरीक्षणशक्ती अतिशय सूक्ष्म अशी आहे. अनेक प्राणी-पक्ष्यांना त्यांनी दिलेली सुचवलेली विशेष नावे आणि त्या नावावरून म्हणींची रचना, तिही काव्यमय आणि त्यातून बहुजनांचे प्रबोधन असा हा सर्वांगसुंदर योग 'पंचखेळ' मध्ये जुळून आला आहे.

उदा., रंग पिवळा (वर्ग) ५ मध्ये १९ व्या क्रमांकाच्या पानासाठी भालेकर उद हा प्राणी सांगून त्याला मृत्यू असे विशेषनाव देतात आणि 'काळ सोडीना कोणाशी, राव रंक श्रीमानाशी' अशी म्हण लिहून जातात.

सत्यशोधक तसेच कवी कृष्णराव भालेकर जेव्हा पांडव, मोर, घार, खवले मांजर, वाघूळ, मांडूळ, सर्प, कोकिळा, मासा, नारायण किडा, तास, पुंगळ, टर्की कोंबडी, रूई, कसर, मोतद्दार, कोविस्थ चिंदळ, नीळ ऊ, न्हानाटी अशा अनेक दुर्मीळ-दुर्लक्षित प्राणी-पक्षी-किड्यांची जेव्हा वेगवेगळ्या पानांसाठी चित्रे सुचवतात तेव्हा आपणाला त्यांच्यातील अभ्यासू वृत्तीचे दर्शन घडते.

## श्रीखंड

कवी कृष्णराव भालेकरांनी पंचखेळमध्ये एका रंगाच्या २४ पानांसाठी ज्या चोवीस म्हणी तयार केलेल्या आहेत. त्या २४ म्हणी एकत्रित करून तयार झालेल्या कवितेसच भालेकर श्रीखंड म्हणतात. श्रीखंडातील या काव्याला सुविचार तसेच उक्तीचा दर्जा मिळालेला आहे.

उदा.

गोळा विजेचा तो चाले।। काय करिता **बंदुकवाले**।।
**बंदुकीचे** गोळीपुढे।। काय **गोफणे** बापुडे

फिरविता **गोफणीला**।। काय करील तो **भाला**।।
भारी **भाल्याचा** तो मार।। काय करील **तलवार**।।
घेता हाती **तलवारी** ।। **पैलवान** पळे दुरी ।।
**पैलवान** होता धीट।। काय करील **रागीट**।।
राग **रागिटा** नाशक।। परी नको **नपुंसक**।।
**नपुंसक** हो का जरी ।। नको **स्वार्थी** दुराचारी।।
बरा **स्वार्थी** सरासरी ।। नको दुर्जन **मत्सरी** ।।
घरी **मत्सरी** तो ठरे ।। **चहाड** दारोदार फिरे ।।
**चहाड्याची** चळवळ ।। **घरकुंड्या** तो निर्बळ।।
घर घरकुंड्या मालकी ।। खोटा **विश्वासघातकी** ।।
**घात विश्वासी** ओंगळ ।। असे त्याहूनी **चांडाळ** ।।
काही **चांडाळ** तो बरा ।। ऐसा वाईट **घाबरा** ।।
भित्र्या **घाबऱ्यांचे** जिणे ।। पशुहूनी दैन्यवाणे ।।१।।

पंचखेळ तसेच श्रीखंडातील प्रत्येक म्हणींचा एकमेकींशी अंतर्गत संबंध आहे. हे वरील ठळक शब्दांवरून दाखवता येईल. एखाद्या ओळीतून भरपूर आशय सांगण्याची किमया प्रत्येक म्हणींमधून कृष्णराव भालेकरांना साध्य झालेली आहे. तात्पर्य म्हणून इसापनीतितील कथांच्या शेवटी संपूर्ण कथेचा मथितार्थ एका ओळीत सांगितला जातो तसा प्रकार या म्हणीसदृश्य श्रीखंडामधील काव्यमय ओळींमधून साधला गेला आहे.

उदा.

अफू, गांजा, दारू घोटी । त्याची संगत ती खोटी ।।
शिंदळ शिंदळकी करी । कुत्री गाढवे ती बरी ।।

अशाप्रकारे नैतिकतेचे धडे देणाऱ्या अनेक ओळी श्रीखंडात काव्यरूपातून भेटतात. आणि कृष्णराव भालेकरांचा, बहुजनांचे साहित्याद्वारे उद्बोधन आणि प्रबोधन करणे हा हेतू आपोआप सफल होतो.

'पंचखेळ' या खेळाच्या निर्मितीतून कृष्णराव भालेकरांमधील बुद्धीकौशल्य आणि रचनकौशल्याचा प्रत्यय येतो. काळाच्या ओघात आज हा खेळ मागे पडलेला आहे पण या खेळाचा भाग म्हणून भालेकरांनी लिहिलेल्या काव्यात्म ओळी या बोधात्मक आहेत आणि त्या काव्यपंक्ती म्हणजेच 'श्रीखंड'. कृष्णराव भालेकर यांच्या श्रीखंडमधील प्रत्येक काव्यपंक्तीतून एखादा नैतिक उपदेश आलेला आहे.

उदा.

नाही उपकार ठावे। त्यासी कृतघ्न म्हणावे।।
अफू, गांजा, दारू घोटी । त्याची संगत ती खोटी ।।

(पृ. ४५)

श्रीखंडातील प्रत्येक ओळीला आज म्हणीचे स्वरूप प्राप्त झालेले आहे. सुविचाराचे रूप मिळालेले आहे. असे म्हणता येईल.

उदा.

"मेहनती असे पुरा, सर्व सुखे येती घरा.

नाव असे इनामदार कर्जाखाली झाले ठार.

शेतकरी मोठेपण, पराधीन ते उत्पन्न."

(सीताराम रायकर : पूर्वोक्त, पृ. ४५)

कृष्णराव भालेकरांनी लिहिलेल्या या श्रीखंडातून सत्यशोधक चळवळीला नैतिक अधिष्ठान मिळाले. कृष्णराव भालेकरांची एकूण कविता तसेच श्रीखंडाबद्दल सत्यशोधक चळवळीचे अभ्यासक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात,

"कृष्णराव भालेकर हे ललित लेखकही आहेत. त्यांनी काही पोवाडे, लावण्या, अंभग पदे आणि श्रीखंड (अखंडाप्रमाणे) लिहिले आहेत. या सर्व काव्यरचनेचा हेतू बहुजन समाजाला जागृत करणे आणि त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाचे चित्रण करणे हाच आहे. त्यामुळे या त्यांच्या कवितेमधून शेतकऱ्यांची, कष्टकऱ्यांची दु:खे मुखर झाली

आहेत. हे सर्व करीत असताना बहुजनांच्या दु:खाला ब्राह्मणी धर्म आणि ब्राह्मण कर्मचारी कसे कारण आहेत हे सांगतात.''

(डॉ. नागनाथ कोत्तापल्ले 'ज्योतिपर्व' पृ. १३५)

अर्थात कृष्णराव भालेकरांच्या श्रीखंडातून बहुजन समाजाच्या प्रबोधनाला, उद्‌बोधनाला चालना मिळाली. एकप्रकारचे नैतिक पाठबळ मिळाले. श्रीखंडातील काव्यपंक्तींना म्हणींचे आणि सुविचाराचे स्वरूप प्राप्त झाले.

●●●

# ४

# कादंबऱ्या

कृष्णराव पांडुरंग भालेकर यांनी १) 'बळीबा पाटील आणि १८७७ चा दुष्काळ' तसेच २) 'बळीबा पाटील' अशा दोन कादंबऱ्या लिहिल्या.

महाराष्ट्रात १८७७ साली दुष्काळ पडला होता. याचा फटका तत्कालीन महाराष्ट्रीयन जनतेला बसला. संवेदनशील मनाच्या कृष्णराव भालेकरांनी 'बळीबा पाटील' आणि '१८७७ चा दुष्काळ' ही कादंबरी लिहिली पण ही कादंबरी वाचकांच्या पुढे यायला जवळजवळ दहा वर्षांचा कालावधी लागला. 'दीनमित्र' च्या पहिल्या वर्षी क्रमशः चार अंकात म्हणजेच १८८८ एप्रिल ते जुलै या चार महिन्याच्या काळात ही कांदबरी कृष्णरावांचे भाचे गणपत सखाराम पाटील यांनी प्रकाशित केली.

या कादंबरीबद्दल 'दीनमित्र' चे संपादक गणपत सखाराम पाटील म्हणतात :--

"रा. रा. कृष्णराव पांडुरंग भालेकर यांनी 'बळीबा पाटील आणि १८७७ चा दुष्काळ' या नावाची कादंबरी १८७७ सालाचे अखेरीस लिहून तयार केली. हे सुबोधकारक व मनोरंजक पुस्तक खेड्यापाड्यातील पाटील व गावकरी यांच्या लक्षपूर्वक पाहण्यात आले असता त्यांच्या मनावर इतका ठसा उमटणार आहे की, आजपर्यंत ह्या लोकांसाठी तोंडी अथवा लेखी अशा तऱ्हेचा मार्मिक प्रयत्न कोणी केलेला आम्हास आठवत नाही."

(सीताराम रायकर : पूर्वोक्त पृ. ५२)

सरुवातीला कृष्णराव भालेकरांनी स्वतः या कादंबरीसाठी प्रस्तावना लिहिलेली आहे. भालेकर प्रस्तावनेत, हिंदुस्थान म्हणजे शेतकरी असे विधान करतात आणि आपल्या या पुस्तकाची (कादंबरी) भूमिका, उद्देश स्पष्ट करताना म्हणतात,

"शेतकऱ्यांस सहजरीत्या मार्ग सुचून आपली सुधारणा करून घेता यावी, हाच उद्देश बाळगून या पुस्तकाची रचना करण्यात आली आहे. खेड्यातील लोक व त्यांचे पुढारी (पाटील) ह्यांनी आपले गावची व्यवस्था सर्वानुमते कशी ठेवावी हे ह्यांत चांगले दाखविले आहे. ऐकण्यापेक्षा पाहण्याने विशेष ठसते; म्हणून हिंदुस्थानातील इंग्रज सरकारच्या हद्दीतील एकेगावचा बळीबा पाटील याने आपले पाटीलकीचे काम कोणत्या तऱ्हेने चालविले होते हे दाखविले आहे."

(कित्ता, पृ. ५३)

या प्रस्तावनेत नंतर कृष्णराव भालेकर भारतीय शेतकरी अडाणी आहेत आणि त्यांना पशुवत जिणे जगावे लागत आहे अशी खंत व्यक्त करतात. तसेच भारतीय संस्थानिकसुद्धा शेतकऱ्यांना लुटणारेच आहेत असा निर्वाळा देतात. प्रस्तावना वगैरे हा भाग या कादंबरीच्या पहिल्या भागात आलेला आहे.

कृष्णराव भालेकरांनी 'बळीबा पाटील आणि १८७७ चा दुष्काळ' या कादंबरीच्या दुसऱ्या भागात बळीबाच्या पाटीलकीचा प्राचीन इतिहास लिहिलेला आहे. बळीबाचे चरित्र लिहिताना तो कपिलापूर येथे जन्मला असे म्हणतात. कपिलापूर, येथे भारत देशाचे प्रतीक म्हणून येते. या कादंबरीचा नायक बळीबा आपणालाच आपल्या बांधवांची व्यवस्था लावावी लागेल, असे म्हणून लोकवस्तीत जातो, त्यांना भाषा आणि लिपी शिकवतो यामुळे लोकांमध्ये सुधारणा होऊ लागते.

'बळीबाच्या पाटीलकीचा प्राचीन इतिहास' सांगताना कृष्णराव भालेकर रूपकाचा वापर करताना दिसून येतात. कादंबरीतील रूपक कथा आणि अर्थ या संदर्भात डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात,

"या कादंबरीला एकप्रकारे रूपक कथेची चौकट आहे. यातील प्रत्येक घटक आणि व्यक्ती प्रतीकात्मक स्वरूपाची असून, त्या सर्वांना-प्रत्येक घटक व व्यक्तीला विशिष्ट असा अर्थ आहे."

(वासुदेव मुलाटे : पूर्वोक्त, पृ. २१ प्रस्तावना)

१) वायव्येकडून अरनगावचे अरनेकर (आर्य) आले.

२) उत्तरेकडून यवनाजी (यवन) येऊन बळीबाच्या गावास कपिलापूर असे नाव देतात.

३) मियाजी (मुस्लीम) कपिलापूरवर हल्ला करतात. जाळपोळ, लूट, जूलूम, आणि खून करून दहशत बसवतात.

४) बळीबाच्या घराण्यातील शिवाब (शिवाजीराजे भोसले) नावाच्या तरुणाने मियाजीस हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला आणि आपल्या वतनाची पाटीलकी आपल्या घरात परत आणली.

५) अरनेकरांपैकी बाळकोबा (पेशवे) नावाचा गृहस्थ पाटीलकीचे वळण नसतानाही पाटीलकी हाकू लागला.

६) इंग्लाजपूरचे (इंग्लड) पंचोबा कपिलापूरला रोजगाराच्या निमित्ताने येऊन पाटीलकीच्या तंट्यात पडून न्यायाधीश होऊन बसले.

७) इंग्लाजपूरचे राणुजीने (व्हिक्टोरिया राणी) पंचोबाचा कारभार बंद करून स्वतःकडे घेतला.

नंतर बळीबा राणुजीस दाद मागतो. राणुजी दया दाखवतात. बळीबाला राणुजीचे बोलणे नाटक वाटते. शेवटी बळीबा विचार करतो,

“आपण आपली व्यवस्था लावल्याशिवाय उपाय नाही. दुसऱ्यावर अवलंबून काय होत नसते, जो तो आपल्या हिताकडे पाहत असतो. हा प्राणिमात्राचा स्वाभाविक गुण आहे.’’

(सीताराम रायकर : पूर्वोक्त, पृ. ५६)

कादंबरीच्या तिसऱ्या भागात कृष्णराव भालेकर कपिलापूरच्या शिवाराचे वर्णन करतात. इंग्लिशांनी सर्व मुलूख काबीज केला तेव्हा कपिलापूरचे तालुक्याच्या ठाण्यात रूपांतर झाले. इंग्लिशांनी मनुष्यगणती केली.

'बळीबा पाटील आणि १८७७ चा दुष्काळ' या कादंबरीच्या चौथ्या भागात कादंबरी मूळ विषयाला सोडून निबंधाच्या पातळीवर जाते. आणि ही कादंबरी इथेच संपते. या कादंबरीच्या संदर्भात आपले परखड मत मांडताना 'कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मयांचे संपादक सीताराम रायकर म्हणतात :--

"१८८८ मध्ये दीनमित्रमधून क्रमशः प्रसिद्ध झालेल्या मजकुरास कादंबरी म्हणता येणार नाही. कारण तिचा ऐवज तेवढा नाही. पात्रे, प्रसंग इ., गोष्टींचा विचार करताही 'बळीबा पाटील आणि १८७७ चा दुष्काळ' ही कादंबरी आहे असे म्हणता येणार नाही."

(पृ. ५२)

कृष्णराव भालेकरांची लेखन प्रकृती, प्रतीके तसेच लेखन सामर्थ्याबद्दल डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात :--

"कोणत्याही गोष्टीचे तपशीलवार व सूक्ष्म निरीक्षणाचा प्रत्यय देणारे वर्णन करणे ही भालेकरांची लेखन प्रकृती दिसते. बळीबाच्या पाटीलकीचा प्राचीन इतिहास सांगताना ते ज्या कपिलापूरचा उल्लेख करतात ते किती बारकाईने वर्णन करतात पाहा :--

'.....इंग्लिशांनी जमीन, पाणी, डोंगर वगैरेची जशी बारकाईने मोजणी केली त्याचप्रमाणे मनुष्यांची गणतीही केली. याप्रमाणे सर्व प्रकारचा शोध लावून ठेविला त्यावेळी गावाची मनुष्यगणती झाली ती येणेप्रमाणे एकंदर लोकसंख्या २५,१७० यात १६,००० वतनदार आजूबाजूच्या गावचे उपरे येऊन राहिलेले ९,१७० पैकी ४,००० अरनेकर, ७० यवनाजी, ५,००० मियाजी आणि १०० राणुजी, पैकी कपिलापूरच्या आठ पेठा होत्या. आळया व गल्ल्या मिळून २२४ होत्या, ४,४९० घरे होती' इ. चे वर्णन ते करतात. अर्थातच हा सगळा इतिहास आणि इतिहासाचा तपशील हाच मुळी प्रतीकात्मक स्वरूपाचा आहे. म्हणून यातील सर्व प्रतीकेही समजून घ्यावी लागतात. इतिहासकालीन आपला देश, या देशावर झालेली परकीयांची आक्रमणे, त्यांनी बळकावलेली राजसत्ता, केलेली लूटमार आणि या साऱ्यांतून काळया गरीब गाईप्रमाणे सोशिक राहिलेला देश याचे हे वर्णन प्रतीकात्मक स्वरूपात येते. आपल्या देशाची रचना, त्याचा आकार, विस्तार, येथील निसर्ग, वरचेवर बाहेरच्या देशातून येऊन राहिलेले विविध परकीय आणि दबून राहणारे

मूळचे वतनदार रहिवासी; येथील विविध प्रांत आणि प्रदेश यांचेच हे प्रतीकात्मक वर्णन आहे हे समजून घेतले म्हणजे त्यांच्या कल्पकतेची, त्यांच्या लेखनसामर्थ्याची कल्पना येते.''

(डॉ. वासुदेव मुलाटे : पूर्वोक्त, पृ. २७, २८)

कादंबरीची तांत्रिक अंगे मराठी वाङ्मयात रूजलेली नसतानाच्या काळातील बळीबा पाटील आणि १८७७ चा दुष्काळ ही कादंबरी आहे. आणि ती वास्तवाच्या अंगाने विकसित होते हे इथे महत्त्वाचे आहे.

कृष्णराव भालेकरांनी 'दक्षिणेतील सन १८७७ चा भयंकर दुष्काळ' या नावाचा अत्यंत उत्कृष्ट असा पोवाडा लिहिलेला आहे. पण भालेकरांनी लिहिलेल्या 'बळीबा पाटील आणि १८७७ चा दुष्काळ' या कादंबरीत मात्र दुष्काळाचे गद्य स्वरूपात कुठेही वर्णन आलेले नाही. या कादंबरीचे मूल्यमापन करताना डॉ. श्रीराम गुंदेकर म्हणतात :--

''कादंबरीचे शीर्षक 'बळीबा पाटील आणि १८७७ चा दुष्काळ' असे आहे. पण या कादंबरीत प्रत्यक्ष दुष्काळाविषयी काहीच माहिती नाही. उपलब्ध कादंबरीत खूप भाग गाळलेला आहे. कादंबरीच्या शेवटी दुष्काळाचे वर्णन किंवा तसे सूचनही केलेले नाही. मग ती भालेकरांकडूनच अपूर्ण राहिली की अपूर्ण स्वरूपात उपलब्ध झाली, हे कळण्यास सध्या तरी काही मार्ग नाही. मात्र १८७७ चा दुष्काळ हा अभूतपूर्व होता. त्याची वर्णने उपलब्ध आहेत. ते वाचताना आजही अंगावर शहारे येतात. या दुष्काळात शेतकऱ्यांचे कसे हाल झाले. उच्चवर्णीयांसाठी मात्र इच्छाभोजनांच्या पंक्ती उठविल्या जात होत्या असे काही तरी लिहावे, दुष्काळाचे बंदोबस्त करण्याचे काही उपाय सुचवावेत असे कृष्णराव भालेकर यांच्या मनात असावे पण उपलब्ध कादंबरीत त्याविषयी काहीच उल्लेख नाही.''

(डॉ. श्रीराम गुंदेकर (संपा) 'बळीबा पाटील' पृ. २५)

शेवटी कादंबरी म्हणून 'बळीबा पाटील आणि १८७७' चा दुष्काळ ही कादंबरी यशस्वी झालेली नसली तरी कृष्णराव भालेकरांचा ही कादंबरी लिहिण्यामागे जो उद्देश होता, तो मात्र बहुतांशी सफल झालेला आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. तसेच

वर्णनशैली, देशी संदर्भामुळे ही कादंबरी भाषिकदृष्ट्या सरस ठरलेली आहे. आणि 'मेंढरात लांडगा असे होऊन जाते.' 'चोरास चांदण्याचा कंटाळा' या सारखे वाक्प्रचार आणि म्हणींमुळे कादंबरी आपले वेगळेपण जाणवून देते.

कृष्णराव भालेकर यांची पहिली कांदबरी फसलेली असली तरी त्यांचा कादंबरी लेखनाचा प्रयोग मात्र चालूच होता. हे त्यांच्या 'बळीबा पाटील' या दुसऱ्या कादंबरीवरून स्पष्ट होते. ही कादंबरी सत्याशोधक समाजाचे संशोधक सीताराम रायकर यांना डॉ. रामचंद्र पाटील यांच्याकडे हस्तलिखित स्वरूपात सापडली या संदर्भात सीताराम रायकर म्हणतात,

"परंतु भालेकरांचे नातू डॉ. रामचंद्र मुकुंदराव पाटील यांच्या संग्रहात 'बळीबा पाटील' या कादंबरीचे एक हस्तलिखित आहे. ह्या कादंबरीचा नायक बळीबा पाटीलच आहे. पण इतर सर्व बाबतीत ही कादंबरी निराळी आहे. मूळ हस्तलिखितावरून (बहुतेक मुकुंदराव पाटील यांनी) दोन वह्यांमध्ये हा मजकूर उतरून घेतलेला आहे. मूळ हस्तलिखित खराब अवस्थेत असावे कारण सुरुवातीच्या भागात पुष्कळ शब्द वाक्ये नाहीत पण 'दीनमित्र' मधील 'बळीबा पाटील आणि १८७७ चा दुष्काळ ' प्रमाणेच गावाचे वर्णन आहे."

(सीताराम रायकर : पूर्वोक्त, पृ. ५०)

'बळीबा पाटील' या कादंबरीच्या नायकाचे नाव बळीबा अमृतराव भोसले असून तो कुटाळ, ता. उदास, जि. कष्टपूर, इलाखा-अज्ञान येथील पोलीस पाटील आहे.

डॉ. आनंद यादव १९०३ साली प्रसिद्ध झालेल्या 'पिराजी पाटील' या कादंबरीला पहिल्या ग्रामीण कादंबरीचा मान देतात. या बद्दल तसेच कृष्णराव भालेकरांच्या 'बळीबा पाटील' या कादंबरीबद्दल कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मयाचे संपादक सीताराम रायकर म्हणतात :--

"डॉ. आनंद यादव यांच्या मते १९०३ साली प्रसिद्ध झालेली धनुर्धारी उर्फ रा. वि. टिकेकर यांनी लिहिलेली पिराजी पाटील ही पहिली कादंबरी आहे. 'बळीबा पाटील' ची जी हस्तलिखित प्रत उपलब्ध आहे, तीवरून ही कादंबरी कधी लिहिली हे कळत नाही.

भालेकरांनी आत्मवृत्तपर जे टिपण लिहिले आहे त्यावरूनही ही माहिती मिळत नाही. शेतकऱ्याचे 'मधुर गायन' या पुस्तिकेच्या १९२५ च्या तिसऱ्या आवृत्तीला जी छोटीशी प्रस्तावना जोडली तीत त्यांनी १८७७ मध्ये भालेकर यांनी 'दीनबंधू' पत्र पुण्यास स्वतःच्या हिमतीवर काढले तेच पहिले ब्राह्मणेतर पत्र. या पत्रावरून त्या वेळच्या पत्राचे धोरण कसे होते हे समजून येईल, असे म्हटले आहे. त्यावरून ती पदे १८७७ व त्या आसपास लिहिलेली असावीत असे वाटते. या पदापैकी एक कुळकर्णी व तगाईमध्ये मोरोपंत चोऱ्या करितो असा उल्लेख आहे. असाच मोरोपंत 'बळीबा पाटील' मध्येही आहे तेव्हा हे समकालीन म्हणजे १८८० च्या आसपासचे लिखाण असावे असा तर्क करता येईल.

"....तथापि दुसरे हस्तलिखितही याच सुमारास लिहिले गेले असावे असा तर्क केला तर 'बळीबा पाटील' ही पहिली ग्रामीण कादंबरी ठरेल."

(कित्ता, पृ. ५१, ५२)

आज जवळजवळ सर्वच अभ्यासकांनी ग्रामीण कादंबरीचा पहिला मान 'बळीबा पाटील' (कृष्णराव भालेकर लिखित) या कादंबरीला दिलेला आहे.

कृष्णराव पांडुरंग भालेकर यांना आज पहिल्या ग्रामीण कादंबरीचे लेखक म्हणून समीक्षक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. वासुदेव मुलाटे, डॉ. श्रीराम गुंदेकर या आघाडीच्या संशोधकांनी मान्यता दिलेली आहे. अर्थात या संशोधकांनी सीताराम रायकर यांच्या मताला मान्यता दिलेली आहे असे आपणास म्हणता येईल.

'बळीबा पाटील' या कादंबरीच्या पहिल्या भागात बळीबा भोसले या पोलीसपाटलाच्या कुटाळ या गावाचे जे वर्णन कृष्णराव भालेकर करतात, ते एकूण भारतीय ग्रामीण भागाचे, प्रातिनिधिक स्वरूपाचे आहे. भारतातील ग्रामीण भागातील लोकांचे जगणे विस्ताराने मांडताना कृष्णराव भालेकर वरील कादंबरीच्या पहिल्या भागात म्हणतात,

"हे लोक मोठ्या काळजीकाट्याने, आपली शेते पेरितात त्या दिवसात त्यांना मध्येच एखादा अडथळा आला म्हणजे त्यांची फारच गैरसोय होत असते. कारण त्यांना

पक्के माहीत असते की एकवेळ पेरणीची (घात) वेळ गेली म्हणजे आपल्या पदरात जे पीक पडायचे ते पडणार नाही. त्यामुळे ते हरएक दुःख व त्रास सोसून शेते पेरतात. पुढे धान्य वीतवीत आले म्हणजे त्यात निरर्थक गवत उगवले असेल ते काढून टाकण्या करिता कोलपी धरून कोळपून काढीतात.... दिवसाने (तन) गवत झाले म्हणजे खुरपून काढीतात. पुढे वेळच्या वेळेवर पर्जन्य पडल्यास शेत रच (राखण्यास) दाणा भरीस येतो त्याकरिता ती पाखरे हाकण्याकरिता बुजगावणे उभे करितात आणि माळा करितात. मग त्यावरून हातात गोफणी घेऊन शेतात पाखरावर धोंडे फेकतात आणि हांहू करून शेते राखीतात.''

(कित्ता, पृ. ६०)

अशा प्रकारे देशी साहित्याचे सशक्त गुण आत्मसात करत 'बळीबा पाटील' ही कादंबरी मराठी कादंबरीच्या इतिहासात पाहिल्या ग्रामीण कादंबरीचा मान पटकावते.

ग्रामीण जीवन म्हटले की तेथील माणसांचे कष्ट आलेच. त्यातल्यात्यात स्त्रियांच्या कष्टाला तर शेवट नाहीच, स्त्रियांबरोबरच लहाण मुलांनाही काबाडकष्ट करावे लागतात. याचे वर्णन कादंबरीकार कृष्णराव भालेकर खालीलप्रमाणे करतात,

''तेव्हा स्त्रियास सर्व दिवसभर घरी राहून काय करावयाचे ? एक ठिकाणी मात्र उलटाच प्रकार दृष्टीस पडतो. का बायका मुलावर विशेष.... लागते. तेथे कोठून .... आमक्या चौकशी ? परंतू  त्यासही त्यांना अफू देण्याचा उपाय करून ठेवलाच आहे. तेव्हा  दिवसभर पुरूषाबरोबर शेतमळ्यात काम करावयास वेळ मिळे. कित्येक स्त्रियांस आऊत हाकताना, गाडी हाकताना... विहिरीतून मोटा काढताना.... गुरे सांभाळताना, मोठमोठाली ओझी वाहताना आणि शेतातील पुष्कळ प्रकारची कामे खेड्यातील बायका करीत असताना पाहिले आहे... भाळताना पुष्कळ दुःखे भोगावी लागतात. ही अज्ञान बापडी उन्हातान्हात, भयंकर रानावना, डोंगरकड्यावर, कीर्द झाडीत नदीच्या किनारच्या गर्द कुरणांत तसेच मोठमोठाल्या दरीखोऱ्यात आपल्या जनावरांना चारीत असतात. ही मुले पुष्कळ एक ठिकाणी जमून गुरे चारण्यास नेत असतात. रानातही लेकरे आपल्या गरीब आईबापानी घरातून पाठवून दिलेल्या भाकरी बरोबर नेत असत. ती मुले दम खाण्यास बसतात. (त्यांचे) जेवण हे की, बाजरी, ज्वारी किंवा नाचणीची भाकरी त्यावर

दोनतीन कांदे म्हणजे झाले. या मुलांना दुसरी कामे आहेत. मळ्यात पाणी धरणे, राखण करणे, आऊत धरणे वगैरे लहानसहान कामाचा अभ्यास करण्याची सुरुवात करीत असतात.''

(कित्ता, पृ. ६१)

नंतर कृष्णराव भालेकर खेड्यातील लोकांच्या वेषभूषेविषयी कळकळीने तसेच आत्मीयतेने लिहितात. लोकांच्या जगण्यातील सर्व वस्तू स्वदेशी असतात. हे सांगून भालेकर म्हणतात :--

''अशा स्वदेशीय मालाची यांना आवड का असते ? तर हे लोक मुळी ओबड-धोबड काम करणारे, माती चिखलात बसणे, उठणे, थंडीवाऱ्यात फिरणे, रात्री त्याच वस्त्रावर असणे तेव्हा त्यांना मजबूत कपडे का वापरण्याची गोडी लागणार नाही, त्यांना धुवट, दुपेटी सफाईदार नाजूक उपकरणे, फेटा, निरनिराळी पातळ छीटे काय करावयाची आहेत ! अशी सुताचीच वस्त्रे मिळायची मारामार तर रेशीम नेसायला कोठून ?''

(कित्ता पृ. ६३)

कादंबरीच्या पहिल्या भागाच्या शेवटी कृष्णराव भालेकर खेड्यातील लोक आणि शहरी लोक यांचे तुलनात्मक वर्णन करतात. खेड्यातील अज्ञानी अंधश्रध्द शेतकऱ्यांचे वर्णन करून कुटाळ गावचा पोलीसपाटील (बळीबा पाटील), गावातील मुख्य कुळकर्णी मोरोपंत घरफोडे तसेच बळीबाचा स्नेही दीपचंद्र मारवाडी यांचा उल्लेख करताना कांदबरीकार कृष्णराव भालेकर, ''बळीबा अज्ञान शूद्र वर्गातला आणि कुळकर्णी हुशार व धूर्त ब्राह्मण वर्गातील असल्याकारणाने बळीबा त्यांच्या अंतकाळापर्यंत खूश निभावला.'' असे म्हणतात.

कादंबरीच्या दुसऱ्या भागात बळीबा पाटलाच्या कुटुंबाचे चित्र भालेकर तन्मयतेने तसेच सामग्रॅने रेखाटतात. याबरोबरच बळीबा पाटलाचे समग्र कुटुंब (एक बायको, आठ मुले आणि सात मुली) तसेच एकंदर इस्टेट याची सविस्तर माहिती आलेली आहे.

बळीबा पाटलाचे व्यक्तिचित्र ठसठशीत झालेले आहे. बळीबा पाटलाबद्दल लेखक कृष्णराव भालेकर म्हणतात :--

"बळीबा पाटील स्वभावाने शांत आणि विचारी असे. त्यावर कसाही कोणताही प्रसंग पडला तरी तो कधीही डगत नसे. तो आपल्या मुलामुलींशी आणि गड्या माणसाशी नेहमी आनंदी असे. त्याला सत्याची फार आवड होती आणि कोणी त्याच्यापुढे एखादी चहाडी किंवा लटकेच थोतांड आणले तर तो ते लागलीच ओळखून तेव्हाच त्याची खात्री करीत. बळीबा फार मेहनती असे. तो नित्य पहाटे चार वाजता उठे व आपल्या घोडीवर बसून सर्व शेतमळ्याची चांगली देखभाल करून घरी येत असे. बळीबा शरीराने उंच सुदृढ पण थकत चालला होता. त्याचे वय ९५ वर्षाचे होते. याला नित्य शिकार करण्याची फार सवय लागली होती. बळीबा बंदूक मरण्यात मोठा हुशार होता. तो मांसाशिवाय जेवत नसे आणि तो नित्य अरण्यातून काहीतरी शिकार आणी. पण बळीला दारू पिण्याचा बिलकूल नाद नव्हता. दारू पिणाराचा बळीबास फार राग येत असे. त्याचप्रमाणे बळीबा तंबाकूही ओढीत नव्हता व खात नव्हता. मात्र पान खात असे. त्या कारणाने मोठमोठाले लोकात त्याच्या गुणाची वाखाणणी होत असे. त्याला कोणत्याही देवाची उपासना नव्हती. फक्त गावातील भैरवाची मोठी भक्ती लागली होती. भैरवाचे नित्य दर्शन घेत असे त्या शिवाय अन्न ग्रहण करीत नव्हता."

(कित्ता, पृ. ६६)

अशा प्रकारे बळीबाचे व्यक्तिचित्र भालेकर सर्वांगांनी परिपूर्ण रेखाटतात. बळीबा ही व्यक्तिरेखा सत्यशोधक समाजाचे विचार अंगी बाणवणारी प्रातिनिधिक स्वरूपाची व्यक्तिरेखा आहे. याबद्दल समीक्षक आणि संशोधक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात :–

'बळीबा हा कुटाळ गावचा पंच्चाण्णव वर्षाचा पाटील. हा पाटील निर्व्यसनी आणि समंजस आहे. जातधर्माच्या पलीकडे गेलेला हा माणूस सगळ्यांना सांभाळून घेतो. त्याने बोलाविलेल्या सभेत मारवाडी, ब्राह्मण जसे आहेत त्याप्रमाणे महारही आहेत. मुस्लिमांनाही त्याने बोलविले आहे. सत्यशोधक समाजाने जो मानवी आदर्श सांगितलेला आहे त्याचा मूर्तिमंत आविष्कार म्हणजे बळीबा पाटील होय.'

बळीबा कुटाळ गावच्या पोलीस पाटीलकीचे काम पाहत असे. हे काम बळीबाकडे येताना त्याचे वडील अमृतराव पाटील बळीबास म्हणाले होते की, 'बाबा आपल्याला ही

विकत खटराक नको' बापाच्या ईशाऱ्याकडे दुर्लक्ष करून बळीबाने पोलीस पाटीलकीचे आव्हान पेलले. कारण तो मुळातूनच सामाजिक कार्यकर्ता आहे. बळीबाने कुटाळ गावातील 'बहुतेक कुटाळ लोकांचा व चोरटे लोकांचा चोरटाळा मोडून टाकला होता. कारण बळीबाने सरकारी हुकुमाप्रमाणे पाटीलकीचे काम चांगले चालविले होते.' असे कृष्णराव भालेकर लिहितात.

बळीबाचे चारित्र्य निष्कलंक होते. याबद्दल कादंबरीत वर्णन येते.

"बळीबाने कधी कोणापासून कोणत्याही प्रकरणात लाच खाल्ली नाही, कोणाचा पक्षपात केला नाही. कोणास विनाकारण दुःख दिले नाही, कोणाच्या भीडेस्तव कोण्या एखाद्याच नुकसान किंवा कोणास सजा दिली नाही. बळीबाने आपल्या पाटीलकीचे काम उत्तम चालविले म्हणून साहेब लोकांनी त्याची फार फार शिफारस केली."

(सीताराम रायकर, कित्ता, पृ. ६९)

बळीबाच्या मुलांपैकी खंडुजीबुवा, म्हसाजी, अनाजीबुवा, कुसाजी आणि धारराव ही पाच मुले विचित्र स्वभावाची अर्थात बळीबाचा मनस्ताप वाढवणारी होती. उदा. कुसाजीचे वर्णन करताना लेखक भालेकर म्हणतातः--

"याचे वय ३८ वर्षाचे होते यास लिहिता वाचता येत नसे. यास फार वाईट व्यसने लागली होती. दारू पिणे, गांजा ओढणे, अफू खाणे, पानसुपारी असे दररोज असल्या शिवाय चैन पडत नव्हते याने घरातून चोरून दागदागिने नेऊन विकावेत, शेतमळ्यातील उदीम परस्पर लोकास देऊन त्याचे पैसे आले की, दारू गांजात घालवावे. त्याप्रमाणे याने कित्येक वेळा बळीबास बाहेरील सावकाराचे देणे देण्यास लाविले होते. याजकरिता अशा दारूबाजाकडे बळीबाने कोणत्याच प्रकारचे काम सोपवले नव्हते. याच्या वर्तनापासून बळीबास मोठी शरम वाटत होती. यास एकच बायको होती. तिला दोन मुलगे आणि एक मुलगी अशी तीन मुले झाली होती. पुढे जी होत असत ती मरत होती. याचा स्वभाव धारिष्टवान, बोलण्यात गडबड्या, कामात आळशी, लिहिण्याच्या नावाने पूज्य पण दारू, गांजा रोज लागत असे तरी बळीबासमोर अंमल करून येत नव्हता व हा बहुतकरून घरात न राहता रांडेच्या येथेच पडून असे. याला रांडबाजीचा बराच नाद होता."

(पृ. ७१)

उरलेली तीन मुले म्हणजे दौलतराव, रावसाहेब आणि बाळासाहेब ही फारच चांगल्या स्वभावाची आणि विद्वान निपजली असे भालेकर म्हणतात. तसेच बळीबास म्हाळसाबाई, पारूबाई, धोंडूबाई, मैनाबाई, चिमणाबाई, मोहोनाबाई, गोजराबाई या सात मुली आणि सईबाई या नावाची सुमारे पंच्याऐंशी वर्षाची एकच बायको होती.

सईबाईच्या स्वभावाबद्दल कृष्णराव भालेकर म्हणतात :--

"ही स्वभावाने साधारण भोळीच होती. पण घरातील संसार व्यवस्थेत मोठी दक्ष असे. हिला पुराण पोथी ऐकण्याची फार गोडी भटांनी लाविली होती. ही मैनाबाईच्या दुःखास स्मरून (मैनाबाई बाल विधवा असून पाचव्या इयत्तेपर्यंत शिकलेली होती) दुःख करीत असे. ही बळीबाच्या प्रकृतीस व घरातील एकंदर सर्व मुलांवर सारखी प्रीती करीत असे. तसेच सर्व सुनांवर आणि नात-नातीवर प्रीती करीत होती. तसेच गड्यामाणसास लेकराप्रमाणे जीव लावी."

(कित्ता पृ. ७६)

बळीबाची इस्टेट जवळजवळ सव्वा लाखाची होती. बळीबास आठ मुले होती. दीड दोन चाहूर जमीन होती. चाळीस बैल, चाळीस खंडी मेंढरे, सहा म्हशी आणि बारा गाई होत्या, आठ नऊ घोड्या, चार घोडे होते. शेतमळ्यात बळीबाने वीस गडी तसेच यांच्यावर देखरेख करणारा, शेतमळ्याचे काम जाणणारा एक कुणबी पगार देऊन, तसेच आठ-दहा मुले जनावरे सांभाळण्यासाठी ठेवलेली होती. तसेच बळीबाने गावच्या पश्चिमेस मोठा वाडा बांधला होता. शिवाय गावात दोन घरे होती. आणि बळीबाने एक पुजारी, एक पुराणिक आणि दोन कारकून असे ब्राह्मण नोकर ठेवले होते. (मुलांच्या आळशी-पणामुळे कारकून, तर बायकोच्या आणि काही मुलांच्या आग्रहावरून पुजारी आणि पुराणिक ठेवलेले होते.) बळीबा पाटलाचे एकंदर चोवीस गडी असतानाही बळीबाच्या कामाची फार ओढाताण होई असे कृष्णराव भालेकर म्हणतात.

बळीबाच्या मनात आपण आपल्या संसाराबद्दलच नित्य वाटाघाट करत असतो हे काही बरोबर नाही तर आपण आपल्या धर्माविषयी थोडासा विचार करावा असे म्हणून

बळीबाने एके दिवसी सर्व भाऊबंद सोबती आणि सगळ्या कुटुंबाची सभा बोलावली, सभेसाठी पुण्याला पत्र पाठवून रावसाहेबासही बोलावण्यात आले.

कांदबरीच्या तिसऱ्या भागात बळीबा पाटलाने सर्वांची सभा घेऊन सभेत "आपण कोण आहोत आणि आपल्याला ईश्वराने कशाकरिता उत्पन्न केले व ईश्वर कसा आहे याविषयी विचार सांगितले."

(पृष्ठ ७९)

सभेत बळीबा पाटलाची मुले, मुलगी मैनाबाई तसेच महंमदभाई रूपचंद मारवाडी, राम्या गडी तसेच दत्तू महार असे सर्वजण आपआपले विचार मांडतात. मध्येच पुराणिकबुवास सभेत बोलण्यास विरोध होऊनही पुराणिकबुवा आपले म्हणणे मांडण्याचा प्रयत्न करतात.

सभेत दत्तू महार तत्कालीन दलित समाजाच्या व्यथेला अभिव्यक्त करताना म्हणतो,

"ईश्वराने जेव्हा तुम्हा आम्हास उत्पन्न केले तेव्हा त्याने किती जाती उत्पन्न केल्या व ह्या सर्व जाती ज्या निरनिराळ्या आहेत त्या सर्व ईश्वराने केल्या आहेत किंवा मनुष्याने केल्या आहेत व ह्या कशा झाल्या हे सर्व मला कळवा. सरकार, आम्हा महार लोकास सर्वांनी दूर दूर केले आहे. त्या कारणाने आम्हास सभा म्हणजे काय ? धर्म म्हणजे काय? ईश्वर म्हणजे काय? जातिभेद म्हणजे काय ? हे काहीच कळत नाही. याजकरिता ह्याविषयी जर कृपा करून मायबाप तुम्ही कळवाल तर मज गरिबावर मोठे उपकार होतील. त्याचप्रमाणे मला दुसरा एक संशय विचारावयाचा आहे की, ईश्वर कशास म्हणावे व तो कोठे आणि कसा असतो? या दोन गोष्टींची माहिती करून दिल्यास माझ्या अज्ञान्यावर मोठे उपकार होतील."

(सीताराम रायकर; कित्ता, ८२)

सभेतील गावकरी महंमदभाई हा मुस्लीम समाजातला माणूस आहे. बोलताना तो आपल्या बोली भाषेतूनच बोलतो. तो म्हणतो,

"खुदाने आदमी बनाया तो कुछ पाक नही है, वो तो नापाक हय. इस  वास्ते आप सब आदमीने हमेशा निमाज पडके जो हयसो खुदाकू सुनाना और खुदावंत बहोत नही. हम तुम्हारे हिंदुमे तो जिदर देखे सब खुदाच खुदा फक्त खुदा. पाणी खुदा, झाड खुदा, जनावर खुदा, परिंदा खुदा, सुरज खुदा, अंगार खुदा और तुम्हारे ब्राह्मणही तुमारे खुदा है. ये तो बडी मजा है ये ब्राह्मणकू कोण खुदा बनाया. तुम लोक तर ब्राम्हणको खूदाच बनाया. तुम लोक तर ब्राम्हणको खुदाच समजते. इदर ये वामनराव पुराणिक बुवा बैठे है. वो बोलिंगेकी महंमदभाई हमारी मस्करी करता तो पुराणिक बुवा ये कुच मस्करी नही, तुमकु खुदाने खुदा बनाया तो दुनियामेके सब आदमीको तुमने क्युंब खुदा बनाया नही?"

(पृष्ठ ८१)

महंमदभाईचे वरील प्रश्न सनातन पुराणमतवादी लोकांच्या वर्मावर बोट ठेवणारे आहेत.

सभेत राम्या गडी आपल्या अज्ञानातून जेव्हा "ईश्वराने मनुष्य म्हणून एकच जात केली आहे व त्यानंतर मनुष्याने आपल्या वर्चस्वाकरिता व आपला स्वार्थ साधण्याकरिता पुष्कळ जाती केल्या आहेत असे तुमचे म्हणणे आहे ते माझ्याने कबूल करवत नाही" असे विरोधी मत मांडतो तेव्हा रावसाहेब त्याला व्यवस्थित समजावून सांगतो.

जन्माचे सार्थक कसे करावे याविषयी भरवण्यात आलेल्या या सभेत मनुष्याच्या जाती कोणी केल्या आणि त्या कशा झाल्या याबद्दलही सविस्तर चर्चा झाली. या सभेत स्त्री-पुरुष समानतेबद्दल मैनाबाई अत्यंत मूलगामी बोलते. ती म्हणते,

"आम्हा स्त्रियांविषयी आजच्या सभेत काहीतरी विचार व्हावयाचा होता. कारण ज्याप्रमाणे तुम्ही ब्राह्मणाच्या दास्यत्वापासून मुक्त होऊ इच्छिता त्याप्रमाणे पुरुषांच्या जुवापासून स्त्रियांनी आपली सुटका करण्यास का न झटावे ? तर ज्याप्रमाणे पुरुष घरात वागतो त्याचप्रमाणे स्त्रियांस मोकळीक असावी व स्त्रियास पुरुषाप्रमाणे लिहिता वाचता आले पाहिजे. जेथे नवरा बायको दोघेही अज्ञान असतात तेथे तर आम्हा स्त्रियास

अतिशय दु:ख सोसावे लागते. स्त्रीच त्या अबला असल्याकारणाने पुरुषाने क्षुल्लक गोष्टीवरून अपराध नसता स्त्रीस काठ्याने हातपाय मोडेपर्यंत धोपटावे. हवे तसे वाईट व मनास जाळणारे शब्द बोलावेत, नेहमी गुलामाप्रमाणे वागवावे तेव्हा ते कोठून स्त्रियास सोसणार? वास्तविक म्हटले असता स्त्री पुरुषाने सारखे आनंदाने घरात वागत जावे. दोघांच्या मसलतीशिवाय कोणतीही गोष्ट कोणी करू नये. आता भटांनी लिहून ठेविले आहे की स्त्रियास गुप्त गोष्ट सांगू नये. तर हा नियम केव्हा केला की, जेव्हा स्त्रियास विद्या बंद केली तेव्हाच केला आहे. मग गुह्य सांगू नये, बरोबर आहे हे ज्या मनुष्यास किंवा प्राण्यास ज्ञानच नाही त्यास कोणतीही गोष्ट सांगून काय उपयोग तर शिकलेल्या व ज्ञानी स्त्रियास कोणतीही गोष्ट पुरुषाने सांगणे अवश्य आहे, एवढेच नाहीतर स्त्री-पुरुषाने घरात नेहमी एकजिवाप्रमाणे वागावे.''

(सीताराम रायकर; कित्ता, पृष्ठ ९३)

'बळीबा पाटील' या कादंबरीतील रावसाहेब ही व्यक्तिरेखा सत्यशोधक समाजाच्या तळमळीच्या कार्यकर्त्याच्या रूपात लेखक कृष्णराव भालेकर अत्यंत समर्थपणे उभी करतात. बळीबाचा तो अत्यंत हुशार, समंजस आणि ज्ञानी मुलगा आहे. वडिलांनी बोलावलेल्या सभेत तो जातींचा निर्माता कोण ? आणि अस्पृश्यता विरोधी विचार मांडतो. आर्य आणि हिंदू यांच्यातील संघर्षाचा इतिहास सांगून जाती कशा निमार्ण झाल्या हे सांगताना रावसाहेब आपल्या भाषणात म्हणतो,

"तरी आर्य लोकास भीती वाटत असल्याकारणाने त्यांनी हिंदू लोकांची फाडफोड केली व त्यांच्या त्या मोठ्या जमावात आपसात कलह उत्पन्न करून निरनिराळे त्यांचे वर्ग केले तेव्हापासूनच जाती होण्याचा व करण्याचा प्रघात पडला असे माझे मत आहे.''

(कित्ता; ९०)

रात्र फार होत आल्याने ही सभा शेवटी मैनाबाई बोलल्यानंतर विसर्जित करण्यात येते.

वरील सभेनंतर काही दिवसांनी बळीबा पाटील आपल्या आयुष्याचे सार्थक करण्याकरिता, मला काय केले पाहिजे व ते केव्हापासून लागावे आणि ते कोणते ? असे आपल्या कुटुंबातील सर्वांना कादंबरीच्या चवथ्या भागात प्रश्न करतो तेव्हा खंडुजीबुवा,

म्हसाजीबुवा, अनाजीबुवा आपली वेगवेगळी मते व्यक्त करतात. बळीबा पाटील पुण्याला रावसाहेबास पत्र पाठवून त्याचेही मत मागवतात. नंतर सात-आठ दिवसानंतर त्याचे पत्र आल्यावर पुन्हा सभा बोलावण्यात येऊन बळीबाच्या सांगण्यावरून मैनाबाई रावसाहेबाच्या पत्राचे सभेत वाचन करते.

पत्रात रावसाहेब ईश्वर तसेच सर्वमानवांमधील समानता, धर्म आणि आर्यांच्या कावेबाजपणाबद्दल लिहून शेवटी, म्हणतो,

"जेणेकरून शूद्र लोकास ज्ञान होईल अशी तजवीज तुम्ही करा. म्हणजे त्यात सर्व आले आणि जेणेकरून शुद्र लोकांच्या ज्ञानप्राप्तीत अडथळे येतील त्याच्यासारखे नाशकारक शूद्र लोकांस दुसरे काही नाही. हे मात्र पक्के अंतःकरणात ठसवून घ्यावयाचा चांगला विचार करून अर्थ समजून घ्या, ही बहुत विचाराची गोष्ट आहे. तर तुम्ही विद्यावृद्धीकडे जेवढे द्रव्य खर्च कराल त्याच्या कोटपट जास्त नफा होणार आहे व ही तुमची कीर्ती शुद्र बांधव अज्ञानपणाच्या दास्यत्वापासून मुक्त झाल्यावर मोठ्या आनंदाने गात बसतील हे काम ते ध्यानी धरून करणे ते करावे व याप्रीत्यर्थ तुम्ही काही खर्च करणार नाही की मनावर घेणार नाही तर तुमच्या अष्टपुत्रांपैकी एक रावसाहेब नामे मुलगा जगात तुम्हास नाहीच हे समजावे."

(पृ. १००)

असे आपल्या वडीलास निर्वाणीचे सांगून रावसाहेब आपले पत्र संपवतो.

पत्रातील मजकूर ऐकून बळीबा चकित होतो. नंतर कुसाजी धारराव, दौलतराव, बाळासाहेब, म्हाळसाबाई, धोंडाबाई, मैनाबाई या मुला-मुलींची तसेच बायको सईबाई या सर्वांची वेगवेगळी मते ऐकून घेतो.

बराच उशीर झालेला असतानाही बळीबाच्या परवानगीने मैनाबाई या सभेत विस्ताराने व्यक्तिस्वातंत्र्य, स्त्री-स्वातंत्र्य या विषयांवर तळमळीने बोलते. तिच्या बोलण्यातून स्त्रीमुक्तीचा ध्यास आणि पुरुषी अत्याचाराचा निषेध जाणवतो. ती म्हणते,

"स्त्रियांविषयी पुरुषांनी आम्हा स्त्रियांची संमती घेतल्याशिवाय मन मानेल तसे नियम करून ठेविले आहेत."

(पृ. १०५)

मैनाबाई ही सत्यशोधकी विचाराची आहे. वर्तमान काळालाही लागू होतील असे विचार मांडत स्त्री शिक्षणावर भर देत पुनर्विवाहावरील बंदी उठेल यासाठी प्रयत्न करण्यास ती सांगते. तिच्या विचारातून तिच्यातील स्पष्टवक्तेपणा तसेच तिच्यातील समाजसुधारणेची तळमळ या गुणांचे दर्शन घडते. ती म्हणते,

"स्त्रियास शिक्षण व पुनर्विवाह सुरू असे झाले म्हणजे बस. बाबा तुम्ही मनात असे कसे हो आणीत नाही की, तुम्ही सर्व जन्मभर पहात आला आहात, जे पुरुष अज्ञान व ज्यांच्या स्त्रियाही अज्ञान, त्या घरात कोणत्या प्रकारची अविचाराची क्रूरतेची आणि नुकसानीची कामे होत असतात. पुरुषाने थोडासा राग आला की, ज्या स्त्रिया अबला त्यांच्या पाठीवर काठ्या माराव्यात जसे जनावरास धोपटतात त्याप्रमाणे धोपटीत असतात. शिव्यागाळीने त्यांच्या वांच्छा तृप्त करून घेतात. तसेच आपण पुरुष पाहिजे ते कर्म करून पवित्रतेचा झोक आम्हा स्त्रियांपुढे मिरवतात तर ही किती बरे दुःखाची गोष्ट ?"

(कित्ता पृ. १०७)

शेवटी बळीबा पाटलाची बायको, म्हातारी सईबाई या सभेत आपला तिसरा पक्ष मांडताना म्हणते,

"आपण सर्व कुटुंबासह तीर्थयात्रा करीत जाव्यात व आपण आपल्या दरिद्री व अज्ञान जातीस एक-दोन चांगले भोजने घालावीत. काही काही मुलांनी कळविले आहे की, हजार हजार ब्राह्मण भोजने घालून दक्षणा द्यावी, तर ते मला आवडत नाही त्या ब्राम्हण भोजनापेक्षा आपण आपल्या जातीस भोजने घालावीत ते चांगले. कारण आपल्या जातीच्या खांद्यावर जाऊन व आपल्या जिवास बरेवाईट झाले तर तेच थांबतील धुपतील आणि किती केले तरी ते एका रक्तामांसाचे व एका ताटातले, तर त्यांच्या तोंडात मारून दुसऱ्या जातीस भोजन घालणे हे मला बरोबर दिसत नाही. मैनाबाईच्या लग्नापासून माझी खात्रीच झाली आहे. पुराणपोथ्यात पुष्कळ लिहिले आहे की, ब्राह्मणास अमुक करावे, ब्राह्मणास तमुक द्यावे सर्व द्यावे द्यावेच. तसे त्या पोथ्याकाराने कोठेही कुणब्यास कोणी द्यावे याविषयी लिहिले नाही तर येथे मला संशय येतो. मात्र तुम्ही देवधर्म करा व आपल्या जातीस चांगले भजा म्हणजे झाले. त्याप्रमाणे आपल्या मुलांची आपल्या डोळ्यासमोर

लग्ने करा, व त्यांचा संसार आपण आपल्यासमोर चांगला पोटभर पाहू म्हणजे जहाले.... तसेच लेकी जावयास सुखी करा दुसरे करायचे काय ?''

(पृ. १०८)

वरील उताऱ्यातून सईबाई सत्य, परखड आणि प्रगतीचे विचार मांडणारी आहे हे स्पष्ट होते. शेवटी बळीबा नोकरीच्या गड्या माणसांचेही विचार ऐकूण घेतो. आणि मग शेवटी बळीबा पाटलासमोर वेगवेगळ्या मतांचे तीन पक्ष उभे राहतात.

१) रावसाहेबाचा

२) धर्माच्या बाजूचा-तीर्थयात्रेचा

३) सईबाईचा

तेव्हा बळीबा पाटील एकांतात जाऊन स्वतः विचार करावा, असे म्हणून शांत अशा मधल्या मळ्यात जाऊन निवांतपणे विचार करत बसतो.

बळीबा पाटील सगळे कुटुंब घेऊन जाण्यासाठी १००० तर विद्यावृद्धीसाठी २००० रुपये खर्च करण्याचा निश्चय करतो, तेवढ्यात मळ्यातला टिप्या कुत्रा बळीबाच्या पायाजवळ येऊन घुटमळतो. तेव्हा जित्रापांसाठी काहीतरी तजवीज करावी असे वाटून 'कुणबी लोकांनी आपल्या जनावाराची कशी व्यवस्था ठेवावी याविषयी चांगला उत्तम नियम करून त्या नियमाचे लहानसे पुस्तक लिहून त्याच्या प्रत्येक खेड्यात प्रती वाटाव्यात' असे ठरवतो. तसेच माळी आणि कुणब्यांना उद्देशून काही महत्त्वाचे सल्ले देताना बळीबा म्हणतो :-

''माळी कुणबी यांनी आपल्या जनावरास आपल्या मुलाप्रमाणे जीव लावीत जावा. जनावरास नेहमी हुशार ताजे ठेवावे, त्यांचे नित्य वरच्यावर आंग धूऊन साफ ठेवीत जावे. त्यास दररोज खरारा करीत असावा, त्यांच्या अंगावर गोचड्या गोमाशी ठेवू नये. त्यांना रात्रौ बसण्याकरिता चांगली सुकी व सपाट जागा असावी, त्यास चारा-वैरण अती थोड

थोडी पण वरचेवर त्यांची पोटे भरतील इतकी घालावी..... त्यांना दाणा वैरण चारणे..... आपण डोळ्यानी पाहून घालीत जावी.....''

(पृ. १११, ११२)

अशा प्रकारे बळीबा, माळी कुणबी आणि जित्रापांविषयी शेतकऱ्यांच्या अज्ञानपणावर विचार करून घरी परततो. नंतर गावात सगळ्यांना जेवण देऊन तीर्थयात्रेस जाण्याचा निश्चय करतो. येथे बळीबा पाटील ही कादंबरी संपते.

'बळीबा पाटील' या कादंबरीबद्दल लेखक आणि समीक्षक डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात :--

''कादंबरीतील वातावरण आणि एकूण गावाचे त्यांनी केलेले चित्रण यातून ग्रामीण जीवनाचे दर्शन घडते. ग्रामीण परिसराचेही लेखक दर्शन घडवितो. या कादंबरीचा नायक बळीबा पाटील आणि इतर रेखाटलेल्या व्यक्तिरेखा या ग्रामीण माणसाचेच प्रतिनिधित्व करतात यात शंका नाही. गावकामगार आणि गावाचे एकूण व्यवस्थापन, तेथील ताण तणाव यांचेही काहीसे चित्रण या कांदबरीत येते. परंतु कृषिकेंद्रित जीवनातील जिव्हाळ्याचे प्रश्न, महत्त्वाच्या समस्या येथे हाताळल्या आहेत असे दिसत नाही. तसेच कादंबरीच्या प्रारंभी स्वीकारलेली रूपक कथेची चौकटही पुढे फारशी टिकली आहे असे दिसत नाही रावसाहेबाने बळीबाला पाठवलेले चर्चात्मक निबंधासारखे पत्र इत्यादीमुळे कादंबरीचा एकूण घाट विस्कळीत झालेला असून तिच्यातील लालित्य कमी झालेले आहे. कृष्णराव भालेकरांची भाषा ही ललितगद्य लेखनाला फारशी अनुकूल अशी नाही तरी ती गंभीर प्रकृतीच्या एखाद्या विचारवंतासारखी तत्त्वचिंतकासारखी किंवा प्रचारकासारखी वाटते. हे काहीही असले तरी बळीबा पाटील ही तत्त्वप्रधान पहिली ग्रामीण कादंबरी आहे असेच म्हणावे लागेल.'' (वासुदेव मुलाटे, पूर्वोक्त, पृ. ३५)

या कादंबरीबद्दल डॉ. श्रीराम गुंदेकर आपले मत नोंदवताना म्हणतात,

''आत्मबळ आत्मप्रतिष्ठा, अस्मिता, स्वावलंबन आणि स्वातंत्र्य ही या कादंबरीची विचारसूत्रे आहेत. त्या काळातील ही वैचारिक आणि चिंतनात्मक कादंबरी आहे असेच म्हटले पाहिजे.'' (डॉ. श्रीराम गुंदेकर : पूर्वोक्त, पृ १२ [प्रस्तावना])

अशा प्रकारे ‘बळीबा पाटील’ ही पहिली ग्रामीण कादंबरी असून, तिच्यातून तत्कालीन महात्मा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाचे विचार आत्मसात करणारी, ही कादंबरी ग्रामीण परिसर-पात्रे-जित्राप यांना आपल्यात समावून घेत समृध्द होत जाते.

पत्रात्मक तसेच पात्रानुसारी बोली भाषा, अनेक म्हणी आणि वाक्प्रचार यामुळे कादंबरी भाषिकदृष्ट्या वाचनीय होते. नाट्यात्मक शैलीमुळे कादंबरीला प्रायोगिक स्वरूप प्राप्त होताना कांदबरी संपते. थोडक्यात ‘बळीबा पाटील’ ही मराठीतली पहिली ग्रामीण कांदबरी असली तरी अनेक देशी संदर्भ या कादंबरीत सामावून गेलेले आहेत. त्यामुळे सांस्कृतिकदृष्ट्याही 'बळीबा पाटील' या कादंबरीला अत्यंत महत्त्व आहे.

●●●

## ५

# प्रायोगिक नाट्यात्म 'शास्त्राधार'

सत्यशोधक कृष्णराव पांडुरंग भालेकर यांचे 'शास्त्राधार' हे पुस्तक 'दीनमित्र' च्या ७ जून १९०८ च्या अंकात प्रथम प्रकाशित केले गेले. प्रस्तावना लिहिताना पुस्तकाचा हेतू सांगताना भालेकर म्हणतात,

"आणि ब्राह्मण देखील या शास्त्राधाराच्या जाळ्यात बदललेल्या परिस्थितीमुळे थोडेतरी अडकले खास. पण बहुतेक सर्व ग्रंथांचा परिणाम खालच्या वर्गावरच व्हावा असाच त्यांचा हेतू असल्याने खालचे वर्गातील या शास्त्राधाराच्या जाळ्यात अगदीच गुरफटून गेले आहेत. जेथे सारासार पाहण्याचे ज्ञान बरेच झाले आहे, अशा मोठाल्या शहरात शास्त्राधाराचा लहानसा बाऊ असेल परंतु खेड्यापाड्यांनी त्याचा फारच मोठा बाऊ केला आहे. या बाऊचे खरे स्वरूप लोकास स्पष्ट कळावे आणि लोकांनी निर्भय चित्ताने सुधारणेच्या मार्गास लागावे हाच या पुस्तकाचा हेतू आहे."

(सीताराम रायकर, पूर्वोक्त, पृ. १२१, १२२)

कृष्णराव भालेकरांचे सर्वच लिखाण देशीवादाच्या बाजूचे आहे. हे भालेकर सुशिक्षित ब्राह्मणांबद्दल जे उद्‌गार काढतात त्यावरून लक्षात येईल. भालेकर म्हणतात,

"अमेरिकेत जाऊन वेदांत सांगण्यापेक्षा आज याच देशातील खेड्यात व्यवहार-ज्ञान सांगण्याची किती आवश्यकता आहे. आमचे सुशिक्षित ब्राह्मण लोक आता तरी या दिशेकडे पाहतील आणि लेखनास आरंभ करतील अशी अशा आहे."

(पृ. १२२)

या पुस्तकाची रचना कृष्णराव भालेकरांनी नाट्यात्मक शैलीत पात्रानुसारी तसेच संवादरूपात केलेली आहे. येथे महात्मा फुले यांच्या 'तृतीयरत्न' या नाटकाची आपणाला आठवण होते.

यशवंतराव, दगडुजी पाटील आणि बाळंभटजी अशी तीन पात्रे 'शास्त्राधार' या प्रायोगिक नाट्यात्मक पुस्तकात कृष्णराव भालेकरांनी योजिलेली आहेत. पैकी यशवंतराव हे सत्यशोधक समाजाचे तळमळीचे कार्यकर्ते आहेत. खेड्यातील माणसांमध्ये सुधारणा व्हावी, खेड्यातूनसुद्धा सत्यशोधक समाजाचे कार्य जोमाने व्हावे, या उद्देशाने खेड्यातील दगडुजी पाटील यांना उद्देशून यशवंतराव म्हणतात,

"अलीकडे सत्यशोधक समाजाचे काम ठिकठिकाणी चालले आहे. पुष्कळ लोक वेड्यावाकड्या जुन्या चाली टाकीत आहेत, कित्येक मोठ्या नेटाने आणि धैर्याने समाजाच्या पायी त्रास सोशीत आहेत आणि तुम्ही मात्र आपल्या गावी काही एक चळवळ करीत नाहीत हे काही चांगले नाही."

(पृ. १२२, १२३)

तेव्हा "सत्यशोधक समाज हा काही जुना पंथ नाही. वेद, स्मृती पुराणे यांचा या ग्रंथाला आधार नाही. तेव्हा अशा पंथाच्या नादी लागू नये असे आमचे बाळंभटजी म्हणतात !" असे दगडुजी पाटील सांगतात तेव्हा बाळंभटजीसोबत यशवंतराव चर्चा करतात. ही चर्चा संवादरूपात आहे.

"या पुस्तकाचा परिणाम खेड्यातल्या लोकांवर व्हावा हा माझा उद्देश असल्यामुळे विषय संवादरूपाने वर्णन केला आहे."

(पृ. १२२)

असे शास्त्राधारच्या प्रस्तावनेत लेखक कृष्णराव भालेकर पुस्तक संवादरूपात लिहिण्यामागील आपला उद्देश सांगताना म्हणतात.

बाळंभटजी पुराणमतवादी सनातनी तर यशवंतराव पुरोगामी विचारसरणीचे आहेत. शास्त्राधार म्हणजे काय हे सांगताना बाळंभटजी म्हणतात,

"शास्त्राधार म्हणजे धार्मिक गोष्ट करताना आपण शास्त्राला धरून चालणार नाही, तर आपले सर्वच करणे अशास्त्र अर्थात अधर्माचे ठरणार!"

(पृ. १२३)

यावर यशवंतराव बाळंभटजीचे सर्व म्हणणे खोडून काढतो आणि विचारतो "सध्याच्या युगास पूर्वीचा कोणता शास्त्राधार लागू आहे ? सध्या अमुक शास्त्राधार चालू आहे, बाकीचे रद्द झाले असे तुम्ही स्पष्ट सांगा मग त्याला अनुसरुन बोलू" तेव्हा बाळंभटजी निरुत्तर, होत म्हणतो, "मला तसे सांगता येणार नाही तुम्हीच सांगा" यावर यशवंतराव जवळजवळ २९ मुद्यांच्या आधारे ब्राह्मणांनी गरिबांना बहुजन समाजाला लुबाडण्यासाठी शास्त्राधाराचा कसा उपयोग करून घेतला ? हे रोखठोकपणे मांडतो.

ब्राह्मणांनी शास्त्राधाराची ढाल पुढे करून सत्ता मिळवली स्वार्थ साधून घेतला आणि राज्य मिळवले. बाळंभटजीस यशवंतराव म्हणतात,

"शास्त्राधार म्हणजे तुमचाच हात व तुमचीच थुंकी आणि या बोटाच्या त्या बोटावर नेणारेही तुम्हीच. असला शास्त्राधार तिकडे मुसलमान किंवा इंग्रज लोकास दाखवून त्यांच्या मृत वडिलास सामान पुरविण्याचे श्राद्धाचे मक्ते तुम्ही का घेत नाहीत ? तेथे त्यांच्या ठोशास व बुटास तुमचा शास्त्राधार काय म्हणून थरथर कापतो ?"

(पृ. १२४)

अशा प्रकारे यशवंतराव रोखठोक, निर्भिडपणे ब्राह्मणांवर हल्ले चढवतात. आपले स्पष्ट विचार मांडताना ते ब्राह्मणांना लुटणाऱ्या भिल्लांची, शेतकऱ्यांची गोष्ट सांगतात.

सत्यशोधक कृष्णराव भालेकरांच्या भाषेला एक धार आहे. ही भाषाशैली उपहासात्मक आहे. ब्राह्मणांनी ब्राह्मण धर्म आणि हिंदू धर्म वेगवेगळा केलेला आहे हे सांगताना यशवंतराव म्हणतात,

"आमच्यातील शुचिर्भूत पुरुषांपेक्षा त्यांच्या स्त्रिया त्यांना अधिक शुचिर्भूत का म्हणून वाटतात ? तर काय ब्राह्मण आम्हास नीच व दुष्मन समजतात काय ? अथवा त्यांचा धर्म वेगळा असावा व आमचाही धर्म वेगळा असावा. ते म्हणतात आम्ही हिंदूधर्मीय

आहोत पण हिंदू धर्मापासून ते च्युत झालेले आहेत, अर्थात त्यांचा तो ब्राह्मण धर्म असावा आणि म्हणूनच ते आम्हा हिंदुधर्मीयांपासून दोन पावले दूर राहतात. मग आम्ही त्यांच्यापासून का दूर राहू नये. ?''

(पृ. १३०)

शेवटी यशवंतराव बाळंभटजीस ''शास्त्रार्थ म्हणजे असा चुटकीसारखा होत नसतो ! त्याला मोठमोठ्या शास्त्रांचे अध्ययन करावे लागते.'' असे म्हणून पुढे,

''तुम्ही मात्र हवे तसे स्वतंत्रतेने वागावे आणि इतरांनी मात्र रूढीच्या पारतंत्र्यात नेहमी गुंतून पडावे हेच तुम्हा ब्राह्मणांचे शास्त्र आहे. अर्थात अशा शास्त्रात आमच्या लोकांस कसला आधार सापडणार ? धिक्कार असो अशा शास्त्राधारास !'' (पृ. १३६) असा निषेध व्यक्त करत आपले विचार मांडतात.

अशा प्रकारे संवादरूपात नाट्यात्म शैलीत कृष्णराव भालेकरांनी 'शास्त्राधार' या छोट्या ग्रंथाची रचना केलेली आहे.

●●●

# ६

# भाषणे-व्याख्यानातून वैचारिकतेचे दर्शन

कृष्णराव भालेकर हे उत्तम वक्ते होते. त्यांनी वेळोवेळी अनेक विषयांवर अनेक ठिकाणी भाषणे केलेली आहेत. सीताराम रायकर यांनी संपादित केलेल्या 'कृष्णराव भालेकर' समग्र वाङ्‌मय या ग्रंथात काही भाषणे संग्रहीत करण्यात आलेली आहेत. शेतकरी आणि उद्योग, करजगाव येथे केलेली भाषणे तसेच अकोला येथे भालेकरांनी दीर्घ असे व्याख्यान दिलेले होते. त्या व्याख्यानाचा सारांश 'शेतकऱ्यांनो डोळे उघडा' या शीर्षकाखाली आज उपलब्ध आहे.

वरील भाषणे तसेच व्याख्यानातून कृष्णराव भालेकरांमधील वैचारिक व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते. वऱ्हाडातील करजगाव येथे शेतकरी आणि उद्योग या विषयावर १९०२ मध्ये भालेकरांनी व्याख्यान दिलेले होते.

"जसे इतर लोक उद्योगात उद्योग करून राहिले आहेत, त्याप्रमाणे आपणही उद्योगात उद्योग करण्याची खटपट केली पाहिजे. आज जे आपले उद्योग परकीयांच्या हातात दिवसेंदिवस चालले आहेत, ते राखून धरण्यासाठी आपणही त्यांच्यासारखेच नवीन प्रकारचे उद्योग बनले पाहिजे. आणि ती उद्योग करण्याची शिस्त परस्थ लोकांप्रमाणे आपण स्वीकारली पाहिजे. निरनिराळ्या व्यक्तीने उद्योग करण्यापेक्षा लहानलहान का होत नाही, कंपन्या करून उद्योग करणे अधिक हिताचे आहे."

(सीताराम रायकर, पूर्वोक्त, पृ. १४७)

शेतकरी-कामगार तसेच बहुजन समाजाला उद्देशून उपदेश करताना भालेकर वेळ-प्रसंगी कडकही बोलतात. त्यांच्या या बोलण्यातून समाज सुधारणेची तळमळच दिसून येते. ते म्हणतात,

"ब्राह्मण वर्गाकडे पहा त्यांनी आपल्या वडिलांचे धंदे सोडून दिले. मुलखी खाते, लष्कर खाते, पोलीस खाते, यात ते शिरले आहेत. सावकारी-शेतकरी यातही ते आहेत. तेव्हा शेतकऱ्यानो ही उदाहरणे डोळ्यापुढे असून तुमचे डोळे उघडत नाहीत काय ? उद्योगास लागा तरच तुमचा तरणोपाय आहे."

(कित्ता, पृ. १४०)

कसबे करजगाव जि. इलिचपूर येथे 'कारखाने आणि व्यापार चालविणारे शेतकरी मंडळ' स्थापन व्हावे म्हणून १८ आणि २८ सप्टेंबर १९०२ रोजी भरलेल्या जाहीर सभेत कृष्णराव भालेकरांनी भाषणे दिली. तसेच मंडळाच्या वेळोवेळी भरलेल्या बैठकांमध्ये तसेच दिनांक १ जानेवारी १९०३ रोजी भाषण केले.

शेतकऱ्यांमधील वाईट परिस्थिती, त्यांची हलाखीची स्थिती व त्यावरील उपाय यावर कृष्णराव भालेकर आपल्या व्याख्यानातून भर देतात. त्यांच्यामते 'शेतकरी' ही संकल्पना खूप व्यापक आहे. ते म्हणतात,

"शेतकरी लोक म्हणजे त्यांचे साह्यकारी बलुते व कारागीर मंडळीसह महाराष्ट्रातील लोक असे आपण समजावे."

(पृ. १४२)

आर्यांनी मूळच्या भारतीय लोकास अनार्य मानून त्यांच्यावर सतत अन्याय केला भारतात इंग्रज आले, भारतीय शेतकरी आणि कारागीर अज्ञानातून बाहेर पडायला हवेत सोबत दारिद्र्य आहेच. यावर उपाय सुचवताना कृष्णराव भालेकर म्हणतात,

"अज्ञान व दारिद्र्य या दुष्ट काळांचे एक मोठे सैन्य या देशातील शेतकऱ्यात व कारागीर लोकात पसरले आहे. त्यांनी त्यास चोहोकडून व्यापून सोडिले आहे. आता त्यांनी विद्या आणि उद्योग ही शस्त्रे धारण करून त्या दुष्ट काळाशी लढले पाहिजे."

(पृ. १५४)

'शेतकऱ्यांनो डोळे उघडा' हे भालेकरांचे अत्यंत महत्त्वाचे भाषण. महात्मा फुले यांच्यानंतर, अत्यंत मूलगामी असा शेतकऱ्यांसाठी विचार मांडणारा विचारवंत म्हणजे भालेकर असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. भाषणात भालेकर इंग्रज सरकारबद्दल

विस्ताराने बोलतात. कोल्होपंत आणि मेंढरू यांची रूपककथा ऐकवून शेतकऱ्यांना नशिबावर अवलंबून राहू नका असा उपदेश करतात.

"ज्यांना रोजच्या जेवणातील मीठ कोठे होते व कसे पिकते याची माहिती नाही, त्यांनी नशीब, दैव, संचित वगैरे गूढ गोष्टीच्या खोल पाण्यात कशाला पडावे ? म्हणून मी म्हणतो, तुम्ही कशाचाही विचार न करता आपापली मुले शिकविण्यास एकदम लागा. तुमची तरुण पिढी शिकेल तरच टिकेल. नाहीतर भिकेला लागेल हे अगदी ठरून चुकले आहे."

(पृ. १७१)

असे सांगून 'विद्या लिहिता वाचता येणे हे सर्व सुखाचे बीज आहे.' असे भालेकर ठासून सांगतात. प्रत्येक गावात रात्रीची शाळा असावी, सर्वांनी शिक्षण घेणाऱ्या गरीब मुलांसाठी मूठमूठ धान्य द्यावे ! हे सांगून कृष्णराव भालेकर म्हणतात,

"मी तुम्हा सर्वांस हात जोडून विनंती करितो की, आपापल्या गावी विद्येचे एकेक देऊळ (शाळा) बांधा, एकेक चांगला पुजारी (मास्तर) ठेवा व आपली सर्व मुले त्या देवळात बसवून देवीची भक्ती एकनिष्ठपणे करून घ्या. मग हीच ती अष्टभुजा नव्हे अनंतभुजा अज्ञानमर्दिनी भगवती विद्यांबा प्रसन्न होऊन, तुमचा उद्धार करील.'

(पृ. १८०)

अशा प्रकारे सत्यशोधक कृष्णराव भालेकर सर्व बहुजनांचे प्रबोधन होईल अशी भाषणे देतात. सोपेपणा श्रोत्यांना आपल्या कळकळीने आपलेसे करून घेणे, त्यांना मधूनमधून साद घालणे, त्यांना पटतील अशी समर्पक उदाहरणे मधून मधून देणे या सर्व गोष्टींमुळे भालेकरांचे वक्तव्य सर्वांनाच प्रभावी वाटत असले पाहिजे असे म्हणून सीताराम रायकर भालेकरांच्या भाषणाबद्दल म्हणतात,

"भालेकरांच्या प्रभावी वक्तृत्वशक्तीबद्दलही त्यांच्या सहकाऱ्यांनी लिहून ठेवले आहे. तारकुंडे म्हणतात, 'रा. भालेकर यांच्या अंगी उत्तम प्रकारची वक्तृत्वशक्ती होती. त्यांचा आवाज मोठा खणखणीत होता व ते बोलू लागले म्हणजे विषयाला धरून बोलत असत. त्यांचे भाषण अर्धातास-पाऊणतास चालू असले तरी श्रोते कंटाळत नसत."

हरिश्चंद्र नवलकरांनी भालेकरांच्या भाषणाच्या हातोटीबद्दल गौरवाने लिहिले आहे, भालेकरांना भाषणाची हातोटी फार उत्तम साधली होती. ते कोणत्याही समाजात जावोत तेथे त्यांच्या भाषणाची छाप पडल्याखेरीज राहावयाची नाही.''

(पृ. २८. सीताराम रायकर, पूर्वोक्त : प्रस्तावना)

कृष्णराव भालेकरांची जी भाषणे आज उपलब्ध आहेत. ती साधारणतः उत्तर आयुष्यातील आणि तीही वऱ्हाड प्रांतातील आहेत. ती भाषणे शेती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांना कंद्रीभूत ठेवून असली तरी अंधश्रद्धा, बहुजनांचे अज्ञान आणि ब्राह्मणांचे कपट अशा सत्यशोधक समाजाच्या विचारांचा मागोवा घेणारी आहेत.

त्या काळात शेतकऱ्यांना लुबाडणारे आणि शेतकऱ्यांच्या जमिनी हडप करणारे यापासून भालेकर शेतकऱ्यांना सावध करण्याचा प्रयत्न करतात. इतर लोक वेगवेगळा धंदा करून शेतीही करतात. मग शेतकऱ्यांना शेतकीचा धंदा करून इतर धंदा करता आला पाहिजे, हे भालेकर कळकळीने सांगतात.

''शेतकीचा धंदा शेतकऱ्यांशिवाय दुसऱ्या जातीचे लोकांस करिता येणार नाही, म्हणून आपले शेतकऱ्यांतील भोळे शेतकरी म्हणत असतात. परंतु जमीन वसुलाचे रजिस्टर पाहिले म्हणजे खातेदारांच्या नावात इतर जातीच्या लोकांचा किती शिरकाव होत चालला आहे हे कळून येणार आहे. गेल्या पन्नास वर्षात ब्राह्मण, कुळकर्णी, गुजराथी, मारवाडी वगैरे लोकांच्या हातात शेतकऱ्यांच्या अस्सल जमिनी व अस्सल मळे ज्यात वडिलांची हाडे परंपरेने पडत आली त्या आवडीच्या मिराशी केवळ त्यांच्या लेखन चतुराईने म्हणजे विश्वासघाताने आणि पैशाच्या वशिल्याने गेलेल्या, प्रत्येक खेड्यात दृष्टीस पडतात. याप्रमाणे इतर धंद्याचे लोक स्वतःचे धंदे चालवून शिवाय कित्येक शेतकीचाही धंदा चालवीत आहेत. तर आपणासही आपला शेतकीचा धंदा चालवीत इतर धंदा करिता येणार नाही असे नाही.''

(पृ. १४८)

येथे कृष्णराव भालेकर शेतकऱ्यांच्या जमिनी त्यांच्याकडून समाजातील धनिक आणि ब्राह्मणादी वरिष्ठ जातींकडून बळकावल्या जात आहेत, याकडे निर्देश करतात.

यातून कृष्णराव भालेकरांमधील दूरदृष्टीचे दर्शन होते. याचा प्रत्यय आज आपणाला ११३ वर्षानंतर भालेकरांचा इशारा तंतोतंत खरा ठरत असल्याचे जाणवून देतो. कारण आज महानगरे, शहरे, महामार्ग तसेच राज्यमार्गाच्या बाजूच्या जमिनी बिल्डर्स आणि धनदांडगे लोक यांच्यांकडून गिळंकृत केल्या जात आहेत.

थोडक्यात कृष्णराव भालेकर पारंपरिक पद्धतीने शेती करणारे शेतकरी शेती-बाहेर ढकलले जातील, तसेच खोट्या डामडौलात राहणाऱ्या अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी इतर व्यावसायिकांनी गिळंकृत केल्या आहेत हे ठासून सांगतात.

●●●

७

# भालेकर लिखाण आणि अग्रलेख

सीताराम रायकर यांनी संपादित केलेल्या 'कृष्णराव भालेकर समग्र वाङमय' या ग्रंथात काही भाग 'भालेकर लिखाण' या प्रकरणात समाविष्ट केलेला आहे. यात पुणे सुशिक्षण गृहाबद्दलचे कृष्णराव भालेकरांचे निवेदन तसेच या सुशिक्षण गृहावरून महात्मा जोतिबा फुले, कृष्णराव भालेकर आणि रा. रा. नारायण मेघाजी लोखंडे यांच्यातील वाद तसेच 'शेतकऱ्याचा कैवारी' मधील काही अग्रलेख संपादित रूपात आलेले आहेत.

पुणे येथील पेठ कसबा येथे १८ नोव्हेंबर, १८८४ रोजी भालेकरांनी 'पुणे सुशिक्षण गृह' सुरू केले. विद्यार्थ्यांसाठीच सुरू करण्यात आलेल्या या वसतिगृहात त्यांची राहण्याची आणि जेवण्याची व्यवस्था करण्यात आलेली होती. विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार व्हावेत त्यांनी जास्तीत जास्त अभ्यास करावा या उद्देशाने सुशिक्षण गृह (बोर्डिंग स्कूल) सुरू करण्यात आले. स्वतः कृष्णराव भालेकरांनी या वसतिगृहासाठी जवळजवळ २९ नियम तयार केले. वसतिगृहातून चांगले विद्यार्थी घडावेत ही भालेकरांची आंतरिक तळमळ होती. हे या नियमांवरून स्पष्टपणे सांगता येईल.

उदा : "प्रत्येक रविवारी कित्येक विद्वान संभावित अशा थोर गृहस्थांकडून मुलांस सुबोध होत असतो. मुलांकडूनही पाळीने निबंध किंवा भाषणे करविण्यात येतात. त्यातील मुख्य विषय येणेप्रमाणे--

१) विद्येपासून लाभ
२) आईबापांचे उपकार
३) तारुण्याचे योग्य रक्षण
४) ईश्वराचे गुणानुवाद
५) वेळेचे महत्त्व
६) दुर्व्यसनापासून हानी
७) थट्टेचा परिणाम
८) सुकीर्तीचा महिमा

या वेळी येथे इतर ठिकाणच्या विद्यार्थ्यांस व लोकांस येण्याची मोकळीक असते.''

( पृ. १८४)

सतराव्या क्रमांकाच्या या नियमावरून भालेकरांचा हेतू अत्यंत उदात्त आणि सर्व-समावेशक होता हे स्पष्ट होते.

'भालेकर लिखाण' या विभागात सीताराम रायकरांनी 'दिवाळीचा सण आणि शेतकरी' या नावाचा एक छोटा लेख तसेच एक अग्रलेख संपादित केलेला आहे. अग्रलेखात सुरुवातीला 'दीनबधूच्या' मालकीवरून रा. रा. लोखंडे आणि रा. रा. भालेकर यांच्यातील वादाचा स्वतः भालेकर उल्लेख करतात तसचे रा. रा. कृष्णराव आणि रा. रा. रामचंद्रराव भालेकर या बंधूंनी जानेवारी १८७७ मध्ये 'दीनबंधू' प्रसिद्ध केल्याचा उल्लेख अग्रलेखात आलेला आहे. अग्रलेखाची सुरुवात 'भालेकरांनी मुंबईतील रा. रा. रामजी संतजी आवटी, रा. रा. राणुजी रावजी आरू वगैरे काही सद्ग्रहस्थांच्या व हुशार लोकांच्या सूचनेवरून लोखंड्यांच्या नावाने मुंबईस 'दीनबंधू' पत्र सुरू केले,' अशी करून नंतर रा. रा. लोखंडे आणि महात्मा फुले तसेच स्वतः कृष्णराव भालेकर यांच्यातील दोघांनाही अत्यंत क्लेशदायक अशा वादाचा ऊहापोह करण्यात आलेला आहे.

१३ जून, १८८५ च्या 'सत्सार' च्या पहिल्या अंकात महात्मा जोतिबा फुले यांनी कोंडाजी आणि तात्या या पात्रांच्या तोंडी पृष्ठ क्र. ३५७-५८ वर काही संवाद दिलेले आहेत. वादाची सुरुवात पंडिता रमाबाई यांच्यावरून झाली. ('महात्मा फुले समग्र वाङ्मय' संपादक य. दि. फडके, पाचवी आवृत्ती) याच अंकात मलपृष्ठावर छापलेल्या जाहिरातीत म. फुले म्हणतात, ''मौजे वांगणी गावी मी भोळ्या भावीक शुद्र बांधवास आपले पायाचे तीर्थ दिले म्हणून कोणी थोर गृहस्थाने 'दीनबंधू' त मजकूर छापविला आहे तो अजिबात खोटा आहे.'' (य. दि. फडके 'म. फुले समग्र वाङमय, पृ. ३६२)

'सत्सार' या दुसऱ्या अंकातही म. फुले यांनी पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे वगैरे स्त्रियांवर कडक टीका करणाऱ्या ब्राह्मण तसेच शूद्र पत्रकारांचा समाचार घेतला आहे. या अंकातील महात्मा फुले यांच्या खरमरीत टीकेचा रोख कृष्णराव भालेकर तसेच नारायण मेघाजी लोखंडे या सहकाऱ्यांवर आहे. या अंकात भालेकरांचा उल्लेख

महात्मा फुले 'सर्वगुणसंपन्न आमचे भालेकर जर तूर्त व्यवहार सुधारीत मंडळीत' असा खोचक उल्लेख केलेला आहे, असे महात्मा फुले समग्र वाङ्मयाचे तत्कालीन संपादक म्हणतात.

सत्सारच्या दुसऱ्या अंकात तात्या आणि यशवंत जोतीराव फुले यांच्यातील संवाद आहे. यात तात्या :

"अरे बाळा पंडिता रमाबाई पुण्यात येण्याचे पूर्वी सौ. ताराबाई शिंदे मुक्काम **बुलढाणे**, प्रांत वऱ्हाड यांनी स्त्री-पुरुष तुलना या नावाच्या पुस्तकात बहुतेक आपल्या स्त्रियांसमक्ष पाहिजेत त्या चावचेष्टा करून नीच कर्मे आचरू लागल्यामुळे असे म्हणून शेवटी 'परंतु तो बोध एक आडमुठ वर्तमानकर्त्यास रुचला नाही. सबब अथवा सौ. ताराबाईचे पुस्तक खंडन करू लागल्याने उलट आपल्याच गळयात त्यातील सर्व दोषांचे घोंगडे पडेल या भयास्तव राजश्रीनी त्या पुस्तकातील एकंदर सर्व बोधाचा धिक्कार करून त्यास कचऱ्याचे पेटीत झोकून आपले नाक मुठीत धरून उलटी ताराबाईचीच निंदा करून तिचे उपकार फेडले" असे सांगतात.

या अंकाच्या शेवटी 'पुणे सुशिक्षणगृहीवर' टीका करणाऱ्या एका मुबंईकराचे २६ सप्टेंबर, १८८५ चे पत्र छापून शेवटी महात्मा फुले म्हणतात,

"सर्वगुणसंपन्न आमचे भालेकर, जर तूर्त व्यवहार सुधारक मंडळीत काय आहे? काय पाहिजे? असे पुकारून सर्व गावभर गवगवा करण्याचे एके बाजूला ठेवतील आणि आपल्या मुंबईकर यजमानास वंगक्षेत्री ताबडतोब नेऊन त्याजपासून आपल्या कलमी सुशिक्षणास प्रायश्चित देतील तर बरे होईल, नाहीतर Jack of all and master of none या म्हणीप्रमाणे त्यांचे सर्वच आंधळे गारूड उघडकीस येणार आहे."

(कित्ता, पृ. ३८०)

महात्मा फुले यांच्या वरील वक्तव्यावर कृष्णराव भालेकर हल्ला करतात. मुकंदराव पाटील यांच्या संग्रही असलेल्या 'इशारा' ऑक्टोबर, १९०५ च्या अंकात खालील मजकूर छापलेला आहे,

"पुण्यातील भालेकरांचे सुशिक्षणगृहाच्या व्यवस्थेविषयी लोकांचे मनात दुष्टग्रह भरविल्याबद्दल आमचा काही एक त्यांच्याशी संबंध नसता, आम्हावर विनाकारण त्याचे मालकांनी आणलेला आरोप दूर करण्याकरिता हे पुढील एका मुंबईच्या थोर गृहस्थापैकी एक पत्र अक्षरशः वाचकांच्या अवलोकनाकरिता सादर केले आहे. याप्रमाणे जर स्थिती असेल तर तिची सुधारणा होऊन आपले शूद्र जातीचे मुलास खरोखरच सुशिक्षण मिळेल अशाबद्दल योग्य तजवीज ठेवतील अशी आमची त्यास विनयपूर्वक प्रार्थना आहे. पाहिजेल त्याला लिहिता येईल की वर नाव सत्सार आणि आत निंदा व मत्सर, परंतु वर सुशिक्षणगृह आणि आत कुशिक्षण, असे असू नये म्हणजे बस आहे."

(पृ. ३८४)

'सत्सार' मधील लिखाणाबद्दल तसेच जाहिरातीबद्दल कृष्णराव भालेकर १८ ऑक्टोबर, १८८५ ला लिहिलेल्या अग्रलेखातून 'महात्मा फुले यांच्याविषयी श्री. लोखंडे यांनी शेकडो वेळी लेख लिहलेत' असा उल्लेख करून रा. रा. फुले यांच्याबद्दल म्हणतात,

"मे. जोतीराव हे जसे इतर वर्गणीदार आहेत तद्वत हेही आहेत. यांचा आमचे पत्राबरोबर (दीनबंधू) खासगी रीतीने कोणताच संबंध नाही. जास्त कशास ते आमच्या ह्या दीनबंधुचे खरोखरचे हितचिंतकही नाहीत ह्याबद्दल कोणास काही शंका असेल तर ती आम्ही मे. फुले यांच्या काही वर्षामागे झालेल्या त्यांच्याच स्वतःच्या पत्रव्यवहारावरून दाखवून देऊ. त्यांची तर अशी इच्छा होती की हे दीनबंधू पत्र बुडले तर बरे होईल. परंतु आम्ही मोठ्या खटपटीने फुले साहेबास वाटेवर आणून त्यास ह्या मोठमोठ्या जमावात येऊन निबंध वाचण्याचा ओघ आणविला."

(सीताराम रायकर : पूर्वोक्त, पृ. १८८)

"आता फुले हे सुशिक्षणगृहाचा नाश करून आपण निराळे बोर्डिंग काढणार त्यात तरी हा क्रम चालणार नाही काय ? जे याशिवाय दुसरे काही नसता, बहुतेक मुले गेली म्हणून फुले यांनी पुकारा केला आणि सत्साराचा असत्सार करून घेतला हे बरे केले नाही, आपले हातून होईना आणि दुसऱ्याचे केलेले पाहवेना. आता म्हातारपण आले

आहे. म्हणून पूर्वीपेक्षा अधिक शांतता, पोक्तपणा, सहनशीलता व समदृष्टी या सद्‌गुणास पूर्णतेस, आणण्याचे सोडून द्वेषबुध्दीने लोकांची गृहच्छिद्र बाहेर काढणे अशा गोष्टी आम्हा तरुणास शिक्षण देण्यासाठी तर आपला सत्सार निघत नाही ना. कारण आपण पुढारी-सुधारक त्यातून म्हातारे म्हणविता त्या अर्थी आपला कित्ता घेणे पडल्यास पंचाईत आहे.''

(कित्ता, पृ. १९०)

असे कृष्णराव भालेकर १८ ऑक्टोबर, १८८५ च्या सूचनासदृश्य 'सुशिक्षणगृह व रा. रा. जोतिराव फुले यांचा खोडसाळेपणा' या अग्रलेखात शेवटी फुले यांचा 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' असा उल्लेख करतात. थोडक्यात दोन महनीय समाजसुधारकांमधील त्यांच्यासाठीही तसेच सत्यशोधक चळवळीतील कार्यकर्ते आणि अभ्यासकांसाठीही अत्यंत क्लेशकारक आणि मनाला यातना देणारा असा हा वाद आहे. याबद्दल सीताराम रायकर, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. वासुदेव मुलाटे, डॉ. श्रीराम गुंदेकर आणि रा. रा. इंद्रजित भालेराव यांनी आपली मते नोंदविलेली आहेत.

या संदर्भात डॉ. नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात. ''महात्मा फुले यांच्याबरोबर भालेकरांचे मतभेद झाले. महात्मा फुले आणि नारायण मेघाजी लोखंडे यांचेही मतभेद होते. भालेकर आणि लोखंडे यांच्यातही वितुष्ट निर्माण झालेले होते. या साऱ्याच मतभेदाला तात्त्विक कारणांबरोबरच वैयक्तिक कारणेही असू शकतात. असे सगळे असले तरी एकोणिसाव्या शतकातील सामाजिक चळवळींचा विचार करताना या तिघांना भिन्न कल्पून काही हाती लागणार नाही उलट महात्मा फुले, कृष्णराव भालेकर आणि लोखंडे यांच्या कार्याचा एकत्रित विचार केला की, महाराष्ट्रात सर्वसामान्यांच्या आणि शोषितांच्या उद्धाराच्या किती बहुविध चळवळी चालल्या होत्या, याचे दर्शन घडते, आणि या तिघांच्याही विचारांचा कार्याचा केंद्रबिंदू येथील शोषित, पीडित माणूस आहे हेही लक्षात येते. शिवाय ही नवी दृष्टी महात्मा फुले यांनी दिलेली होती हेही अमान्य करण्याचे काही कारण नाही.''

(डॉ. नागनाथ कोत्तापल्ले; 'जोतिपर्व' पृ. १३३, १३४)

कृष्णराव भालेकर म. फुले आणि आपल्यामधील वादावर पडदा टाकताना २३ नोव्हेंबर, १८९३ च्या 'शेतकऱ्यांचा कैवारी' या अंकात 'पुणे सुशिक्षणगृहाची खरी कहाणी' लेखरूपाने मांडतात.

सुशिक्षणगृहाची स्थापना करताना भालेकर स्वत: प्रॉस्पेक्ट तयार करतात. यात सुशिक्षणगृहाचा उद्देश आणि ध्येय स्पष्ट करण्यात आलेले होते. भालेकरांच्या मित्र मंडळींना सुशिक्षणगृहाची माहितीपुस्तिका आवडली होती. विद्यार्थ्यांनी आईबापांपासून दूर राहून त्यांची अभ्यासाची सोय व्हावी असा उदात्त हेतू या सुशिक्षणगृहामागे होता. भालेकरांनी हे गृह काढताना कोणालाही भागीदार करून घेतलेले नव्हते.

या सुशिक्षणगृहात वेगवेगळ्या जातीतील आणि वेगवेगळ्या वयोगटातील मुलांना प्रवेश देण्यात आलेला होता. ही मुले वयाने बारा ते बावीस वर्षापर्यंत अशी होती. यात काही मुले अत्यंत खोडकर होती.

"ती जेवतेवळी आवडले तरी नको म्हणायची, न आवडले तरी तेच पाहिजे म्हणायची," (सीताराम रायकर: पूर्वोक्त, पृ. १९५.)

कृष्णराव भालेकरांच्या या सुशिक्षणगृहास ज्यांनी मदत केली त्यातील सर्व पैसा भालेकरांनी त्यांच्यासाठी खर्च केला. शेवटी या वसतिगृहाच्या जागेचे भाडे आणि नोकरांचा बोजा कृष्णराव भालेकरांना सहन करावा लागला.

मुळात भालेकरांमधील धडपड्या स्वभाव, या गोष्टी करण्यास कारणीभूत होता असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

●●●

# ८

# पत्रव्यवहारातून लेखकमन-तळमळीचा कार्यकर्ता

कृष्णराव पांडुरंग भालेकर यांनी आपल्या आयुष्याच्या शेवटच्या दहा वर्षात वऱ्हाडातील सत्यशोधक समाजाच्या आपल्या रा. रा. यशवंतराव खुशालराव देशमुख, मे. सिदेबादादा, रा. रा. मोतीराम तुकाराम वानवडे व रा. रा. कृष्णराजी कर्काजी चौधरी, रा. रा. तुकाराम नामदेव गिरमे, रा. रा. रामराव परशरामजी पाटील, रा. सा. गणपतराव मराठे, आणि रा. रा. बळीराम विक्रमजी देशमुख या सहकाऱ्यांना वेळोवेळी पत्रे लिहिलेली आहेत. या पत्रांमधून भालेकरांमधील तळमळीचा कार्यकर्ता तसेच समाजसुधारकाचे दर्शन घडते.

यशवंतराव देशमुखांना लिहिलेल्या पत्रात कृष्णराव भालेकर हिंदू राजाच्या राज्यापेक्षा इंग्रजाची राजवट बरी हे सांगताना म्हणतात,

“परकीय इंग्रज लोकांचा राजकीय अंमल हाही येथे चालू आहे. म्हणून काही बरे आहे. नाहीतर धर्मगुरूच्या आज्ञेत राहणाऱ्या हिंदू राजाचे राज्य येथे चालू असता आपणास आपलेच लोकांकरिता काहीएक करवले आसते. आता आपण प्रयत्न करीत आहो. असा हिंदू राज्याच्या अंमलात करतो तर आपणास केव्हाच हत्तीच्या पायास बांधून मारले असते किंवा सुळाच्या पेटीत कोंडून टेकडीवरून लोटले असते ! किंवा कडकडलेल्या तेलांच्या कढईत ढकलले असते. किंवा शिशाचा लाल रस करून तोंडात ओतला असता ! हिंदूधर्म म्हणजे भटभिक्षुकांची केवळ कामधेनू. म्हणजेच अन्य हिंदू म्हणविणाऱ्यांची रक्त शोषणारी जळू !!! म्हणून हिंदूधर्मास ब्राम्हणांनी स्वधर्म म्हणण्यात

टिऱ्या पिटणे साहजिकच आहे. परंतु आमचे रक्त शोषणाऱ्या जळूच्या कर्तव्यास आम्ही स्वधर्म म्हणणे म्हणजे नवल नव्हे काय ?''

(सीताराम रायकर; पूर्वोक्त, पृ. २१०)

याच पत्रात पुढे ब्राह्मणांनी अनार्यांवर केलेल्या अत्याचाराचा सत्यशोधक कृष्णराव भालेकर विस्ताराने उल्लेख करून आपण 'ब्राह्मण म्हणविणाऱ्यास ५०० प्रश्न' आणि 'ख्रिस्ती उपदेशकास सविनय सूचना' ही पुस्तके लिहून पूर्ण केली असे म्हणतात.

सत्यशोधक कृष्णराव भालेकर यांचा ब्राह्मणांना विरोध नसून ब्राह्मण्यवृत्तीला विरोध आहे. तसेच वरील उताऱ्यात हिंदू राजांच्या राज्यापेक्षा इंग्रजी राजवट बरी असे मत व्यक्त करतात. यावरून कृष्णराव भालेकर इंग्रजधार्जिणे होते. इंग्रजांची भलावण करणारे होत, असे त्यांच्यावर आरोप केले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

याबद्दल डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचे विचार आपण लक्षात घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले ताराबाई शिंदे लिखित स्त्री-पुरुष तुलना या ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हणतात,

"ताराबाई शिंदे, लोकहितवादी, म. जोतीबा फुले यांनीही इंग्रजांचे राज्य चांगले असल्यांचा निर्वाळा दिला आहे आणि केवळ एवढ्याच मुद्यावर म. फुले ख्रिस्ताळलेले आहेत, धर्मद्रोही आहेत अशी हाकाटी तत्कालीन धर्ममार्तंडांनी केली. फुल्यांना इंग्रजाळलेले म्हणून बदनाम करण्याचा प्रयत्न केला. अजूनही अधूनमधून हा प्रयत्न होतोच आहे. अगदी अलीकडे असा प्रयत्न बाळ गांगलांनी केला आहे. तो निंद्य प्रकार किती खोटा आहे. हे श्री. हरी नरके यांनी प्रदीर्घ संशोधन करून सिद्ध केले आहे. तेव्हा म. फुले आणि त्यांच्यासारखे विचार करणारे जे कोणी होते, त्यांच्याबद्दल गैरसमज करून घेण्यापूर्वी काही बाबी नीट समजून घेतल्या पाहिजेत.

इंग्रजांच्या आगमनापूर्वी या देशातली समाजव्यवस्था ही धर्माधिष्ठित होती आणि धर्म म्हणजे काय तर पुरोहित जे सांगतील तो धर्म. त्यामुळे समाजव्यवस्था धर्माधिष्ठित होती म्हणण्यापेक्षा पुरोहिताधिष्ठित होती, असेच म्हणावे लागते. न्यायव्यवस्था, अर्थव्यवस्था सारेच मुळी धर्माधिष्ठित. जीवनातल्या कुठल्याही प्रश्नाचे उत्तर धर्मातच शोधले जाई,

आणि धर्म हा जसा नेहमीच प्रस्थापिताच्या बाजूने असतो तसाच तेव्हाही होता. तेव्हा तर अधिकच होता. प्रस्थापितांना सुरक्षित करणाऱ्या भोंगळ कल्पना समाजमनावर वर्चस्व गाजवीत होत्या. अमुक माणसाच्या वाट्याला दु:ख का ? तर त्याचे पूर्वजन्मीचे संचित. म्हणजे पुनर्जन्म आणि कर्मसंचित या कल्पनांनी इथल्या लोकांची विचारशक्ती आणि निर्मितीशक्तीच मारली होती. या देशात शतकानुशतके काहीही नवे संशोधन झाले नाही आणि आजही फार मोठ्या प्रमाणात होत नाही याचे कारणच मुळी इथल्या धर्मप्रभावात आहे. या धर्माने कधीही भोवतीच्या जीवनाचा विचार करू दिला नाही. जो विचार करावयाचा तो मरणोत्तर सृष्टीचा आणि पुढच्या जन्माचा, त्यामुळे प्रस्थापितांविरूद्ध कुणीही लढण्याचे काहीच कारण नव्हते. कारण जे जीवन वाट्याला येईल ते भोगले पाहिजे कारण ते पूर्वजन्मामुळे आले आहे. त्यात पुरोहितांचा अगर समाजातील गबर लोकांचा काय दोष ?

या साऱ्याच धर्मकल्पना भोंगळ आहेत, खऱ्या अर्थाने हा धर्म नव्हेच ही जाणीव या देशात प्रखरतेने जर कधी होऊ लागली असेल तर ती इंग्रजांच्या सार्वत्रिक आणि पाश्चात्त्य शिक्षणामुळे. परिणामी इथला सामान्य माणूस जागा होऊ लागला. ज्या जाती व्यवस्थेत तो बांधला गेला होता, ही व्यवस्था म्हणजे शोषणाची व्यवस्था आहे. याची जाणीव त्याला होऊ लागली. इंग्रजी शिक्षणामुळे तो भोवतीच्या जीवनाचा आपल्या शोषणाचा विचार करू लागला. किंबहुना पारलौकिकापेक्षा लौकिक जीवन महत्त्वाचे असते, असे त्याच्या लक्षात आले ते या शिक्षणामुळेच.

या प्रक्रियेमुळे इथला प्रस्थापित वर्ग आणि पुरोहित वर्ग दुखावला जाऊ लागला. म. फुल्यांवर वाक्ताडन करताना चिपळूणकर सहज म्हणून जातात, ‘शेवटी ज्ञानाच्या किल्ल्या ब्राह्मणांच्याच कमरेला आहेत.’ हे विखारी उद्‌गार म्हणजे प्रस्थापितांचा संताप आहे, असेच म्हणावे लागते. स्वाभाविकच येथील पिचलेला, दुबळा, गोरगरीब, दलित, शोषित असा समाज इंग्रजांबद्दल सहानुभूती बाळगून होता. कारण येथील व्यवस्थेने कधी या माणसाला स्वातंत्र्य दिले नव्हते. शिक्षण दिले नव्हते. समानता आणि बंधुता तर नव्हतीच. म्हणजे स्वकीयांची सत्ता आहे. पण बहुसंख्य समाज प्रस्थापितांचा गुलाम आहे, अशी परिस्थिती होती.

या साऱ्या परिस्थितीच्या संदर्भात आणखी एक मुद्दा समजून घ्यावा लागतो. महाराष्ट्रापुरते बोलायचे तर येथे पूर्वी पेशव्यांची सत्ता होती. ही सत्ता स्वकीयांची होती. परंतु जातींसाठी घालून दिलेले निर्बंध पाळले नाहीत तर कडक शिक्षा दिल्या जात हा इतिहास आहे. सोनारांनी ब्राह्मणांसारखे धोतर घातले म्हणून सोनारांना शिक्षा झाल्याचे संदर्भ कागदपत्रांमध्ये मिळतात याचा अर्थच असा की, समाजात जे प्रस्थापित होते, त्यांची गुलामगिरी सामान्य दुबळ्यांना सहन करावी लागे त्याबद्दल साधा निषेधही नोंदविता येत नव्हता. महाराष्ट्राबाहेरील इतर राजे संस्थानिकही याला अपवाद नव्हते. तेव्हा स्वाभाविकच इंग्रजी राजवट ही किमान माणुसकीच्या नात्याने वागविणारी असल्यामुळे बहुजन समाजाला आपली वाटली. शेवटी स्वातंत्र्य मिळाले आणि सामान्य माणूस गुलामच राहिला. शोषित राहिला तर स्वातंत्र्याचा अर्थ तरी काय ? म्हणून आधी माणसाला माणसाच्या पातळीवर आणणे महत्त्वाचे आहे. या चर्चेचा इत्यर्थ एवढाच की लोकहितवादी, म. जोतीबा फुले, ताराबाई शिंदे यांच्यासारखे विचारवंत इंग्रजाळलेले, ख्रिस्ताळलेले नव्हते, तर त्यांना सत्तेच्याही पलीकडे असणाऱ्या माणुसकीचे आकर्षण होते. समतेचे आणि खऱ्या अर्थाने स्वातंत्र्याचे आकर्षण होते. एकूण सत्तेच्या नकाशाच्या पलीकडे असलेला 'माणूस' हा या साऱ्यांच्या चिंतनाचा विषय होता आणि मला वाटते १९ व्या शतकाची ही सगळ्यात मोठी फलश्रुती होय !''

(नागनाथ कोत्तापल्ले (संपा) 'स्त्री पुरूष तुलना,' प्रस्तावना पृ. १० ते १३)

वरील प्रदीर्घ उताऱ्याच्या शेवटी डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी ज्या विचारवंतांचा उल्लेख केलेला आहे त्या यादीत सत्यशोधक कृष्णराव पांडुरंग भालेकर यांचेही नाव टाकल्यास वावगे ठरणार नाही. पुढे प्रस्तावनेत एका ठिकाणी डॉ. कोत्तापल्ले म्हणतात,

''ताराबाई शिंदे या याच परंपरेत मोडतात. किंबहुना म. फुले यांच्या विचारांचा आणि अन्वेषण पद्धतीचा ज्यांच्यावर सर्वाधिक परिणाम झाला आहे, अशा प्रमुख दोनच, कृष्णराव भालेकर आणि दुसऱ्या ताराबाई शिंदे. म. फुले आणि कृष्णरावांनी एकूण शोषितांच्या शोषणाची मीमांसा केली.''

(कित्ता, पृ. १५)

सत्यशोधक कृष्णराव भालेकर यांनी मे. सिदेबादादा यांना लिहिलेल्या पत्रात ब्राह्मण लोकांनी इतर हिंदू म्हणविणाऱ्या लोकांचे कसे कसे नुकसान केले आहे. या विषयावर आपण व्याख्यान दिल्याचा उल्लेख केलेला आहे.

भालेकरांची भाषणे अत्यंत प्रभावशाली होत असत. एका पत्रात भालेकर लिहितात,

"शेतकऱ्यास पूर्वी व अद्यापही कसकशी दु:खे भोगावी लागत आहेत, तो त्यांच्यापुढे हुबेहूब वर्णन करताच बऱ्याच शेतकऱ्यांच्या नेत्रातून शोकाश्रु वाहू लागले होते."

(सीताराम रायकरः पूर्वोक्त, पृ. २२१.)

सत्यशोधक कृष्णराव भालेकरांनी 'दीनबंधू' हे वर्तमानपत्र काढले. कष्ट सहन करून ते नुकसान सोसून चालवले. हे सांगताना भालेकर म्हणतात,

"१८७७ चे आरंभी पुण्यासारख्या कडकडीत ब्राह्मण वस्तीत 'दीनबंधू' वर्तमान पत्र केवळ परमेश्वराच्या साह्याने स्वतःच्या जोखमीवर सुरू केले. तेव्हा ब्राह्मणेत्तर हिंदू लोकासाठी हिंदूंनी चालविलेले एवढेच पत्र १८७७ ते १८८० च्या मे पर्यंत चालले होते."

"त्यावेळी मजला जी संकटे भोगावी लागली ती कळविल्याने पत्रविस्तार फार होईल. तरी एवढे कळवितो की माझे घर गेले, दागिने गेले, जमीन गेली. सर्व जाऊन शिवाय धर्मढोंगी लोकांकडून अत्यंत दु:खे भोगावी लागली व ती, मी जातो तेथेही त्या लोकांकडून भोगावी लागत आहेत."

(कित्ता, पृ. २२२)

याच पत्रात कृष्णराव भालेकर सत्यशोधक समाजाचे निर्भीड आणि परखडपणे परीक्षण करताना म्हणतात,

"सत्यशोधक समाज म्हणून जोतीराव फुले यांनी पुण्यास एक पंथ काढला होता. त्यातही शिरून मी काही वर्ष राहून पाहिले. परंतु सुतार, लोहार, सोनार, पाथरवट, कासार इत्यादी पांचाळ हिंदू लोकांप्रमाणेच हे सत्यशोधकांनी फक्त ब्राह्मणास बाजूस सारून बाकी हिंदू रिवाज म्हणजे मूर्तिपूजा जातिभेद वगैरे सर्व प्रकारच्या घातक रूढी जशाच्या तशाच चालविल्या आहेत !!! दुसरे असे की ह्या सत्यशोधकास कोठेच मुख्य स्थळे नाहीत.

समाजास अध्यक्ष, उपाध्यक्ष, चिटणीस वगैरे सर्वानुमते निवडलेले नेमलेले नाहीत. वार्षिक रिपोर्ट कधी प्रसिद्ध होत नाही. फंडाचे पैशाचा हिशेब नाही. वगैरे येथून तेथून सर्वच गोंधळ म्हणून मी दीनमित्र मासिक पुस्तकात १८८७ मध्ये सत्यशोधक समाजाच्या एकंदर चालकांची कानउघाडणी केली होती. त्यावरून भटाप्रमाणे तेही माझा द्वेष करवेल तेवढे प्रयत्न आतापर्यंत करीत आले आहेत,''

(कित्ता, पृ. २२२, २२३)

उमरावती येथून १२ फेब्रुवारी, १९०९ ला रा. रा. यशवंतराव देशमुख यांना लिहिलेल्या पत्रात विदर्भातील आपल्या भटकंतीबदल कृष्णराव भालेकर लिहितात तर याच दिवशी रा. रा. मोतीराव वानवडे व रा. रा. कृष्णाजी चौधरी यांना लिहलेल्या पत्रात वऱ्हाडात स्वतंत्र वर्तमानपत्र एप्रिलच्या पहिल्या तारखेस सुरू होणार असल्याचे सांगून डिसेंबरात आपल्या सत्यशोधक मंडळीची पहिली बैठक करण्याचे योजिले आहे असे कळवतात.

रा. रा. तुकाराम गिरमे यांना कृष्णराव भालेकरांनी १४ फेब्रुवारी, १९०९ ला लिहिलेले एक अपूर्ण पत्र आज उपलब्ध आहे. यात भालेकर माळी समाजाच्या मागासलेपणा-संबंधीची आपली परखड मते व्यक्त करताना म्हणतात,

''इतर लोकात शिक्षणाविषयी चळवळ सुरू आहे व त्यासंबंधी फंड जमविण्याची पण व्यवस्था लावणे चालले आहे. तसे आपल्या माळी लोकात नाही. याला अनेक कारणे आहेत. त्यास मुख्य कारण आपले लोकात पहिल्यापासूनच राज्यदरबारात, सैन्यात अगर विद्वानांच्या सभेत प्रवेश झालेले पुरुष कोणी इतिहासात दिसत नाहीत. त्यामुळे आपले लोकास पुढे सरण्यास उत्तेजन मिळाले नाही व अद्याप मिळत नाही. इतर जातीत म्हणजे ब्राह्मण, मराठे, धनगर, कोळी वगैरे जातीत संस्थानिक जहागीरदार, इनामदार जहालेले आहेत. तसे माळी लोकात नाहीत. दुसरे पार्शी, भाटे, जैन, लिंगायत लोकात आपल्या लोकाप्रमाणे जरी कोणी नव्हते तरी त्यांच्यातील धनवान लोकांनी आपापल्या जातीतील होतकरू गरीब विद्यार्थ्यांस सहाय्य करीत गेल्यामुळे त्यांच्यामध्ये ज्ञानाचा प्रसार जहाला व ते व्यापारात व राज्य कारभारात बरेच पुढे सरसावले. या प्रमाणे त्यांनी

इंग्रज राज्यातील शांततेचा व विद्याभ्यासाचा लाभ करून घेतला. कारण त्यांना त्यांच्या धर्मगुरूकडून अडथळे येण्यासारखे उपदेश झाले नाहीत. आपले माळी लोकात धनवान जहाले पण त्यांना विद्येची गोडी नव्हती व कोणी लाविली नाही. त्यामुळे त्यांचे लक्ष जातीत विद्यावृद्धी व्हावी इकडे गेले नाही म्हणूनच आज माळी लोक फारच मागे राहिले आहेत. पुण्यास घायरवर, लडकत, आखाडे, समइवाले तसेच मुंबईस मेहेर, वऱ्हाडी, जंबुकर वगैरे मंडळी झाली पण त्यांच्या बुद्धीचा व धनाचा उपयोग जातीतील, दुफळ्या मोडण्यात व वाढविण्यात होत गेला !!! या पलीकडे त्यांनी काही केले नाही. फुले, भालेकर, लोखंडे यांनी जे काही केले ते मराठ्यातील विद्वान व धनवान यांनी पण केले नाही.''

(पृ. २४३, २४४)

रा. रामराव पाटील कावलीकर यांना उमरावती येथून कृष्णराव भालेकरांनी ०४ मार्च, १९०९ ला सविस्तर असे पत्र लिहिले. पत्राच्या सुरुवातीला ख्रिस्ती लोक वर्तमानपत्र काढण्यासाठी छापखाना देण्यास तयार आहेत. पण ख्रिस्ती धर्म स्वीकारा, अशी अट घालत आहेत. असे भालेकर म्हणतात.

ब्राह्मण तसेच बहुजन समाजाबद्दल भालेकर म्हणतात,

''आमचे तेज ब्राह्मणांनी २१ वेळा हरण केले म्हणून तर आमचे क्षत्रियत्व मंदावले आहे. आमच्या बीजातच ब्राह्मणांनी भेसळ केली असावी. म्हणूनच आम्ही आमचा मनुष्यपणा प्रसंगी विसरतो. नाहीतर आम्हास दुसरे काय झाले म्हणून म्हणावे? ब्राह्मण लोक मूळचे स्वाभाविक नेभळे व बायक्या बांध्याचे पण त्यांच्या अंगातसुद्धा हल्लीच्या सुधारलेल्या काळात केवढा मोठा जोम उत्पन्न जाहला आहे. तो पहा इंग्रज लोकांनी त्यांना इंग्रजी शिकवून भिक्षुकी वर्गातून काढून राजदरबारात चढविले.''

(पृ. २५१)

सत्यशोधक मताचे वर्तमानपत्र काढण्याच्या कामासाठी कृष्णराव भालेकरांनी आपल्या मुलास (रा. मुकुंदराव) लेखक आणि कवी म्हणून घडविले परंतु वर्तमानपत्र ''सुरू होण्याचा रंग दिसत नाही. तसेच मुंबई निराश्रित साहाय्यक मंडळीच्या कामाचाही राजीनामा देण्यात आला. कारण शिंगणापुरी निघताना मला आज्ञा मिळाली होती की, सरकारात अर्ज द्या व वर्तमानपत्रात जाहिरात द्या. या वचनावर मी राजीनामा दिला. आता मी येथे

संकटात सापडलो खरा व मजला माझे गावी जाणे भाग जहाले खरे. जरी गावी गेलो तरी डोळे आणि हात चालू आहे तोपर्यंतपण मुलांच्या हातून लेखण्या चालतील आणि माझ्या समक्ष अगर मागे, सर्व लेख हळूहळू बाहेर पडतील. लिहून ठेवलेले व्यर्थ जाणार नाही'' असा दुर्दम्य आशावाद प्रतिकूल परिस्थितीतही भालेकर निराश न होता व्यक्त करतात.

याच पत्राच्या शेवटी, ''पुन्हा आपल्या भेटी केव्हा होतील त्या होवोत. येत्या डिसेंबरात उमरावतीस मराठा शिक्षण परिषद भरल्यास तेथेच सत्यशोधकांची पहिली बैठक भरविण्याचा मी प्रयत्न करणार आहे. त्यावेळी मी उमरावतीस आल्यास आपणा सर्वांच्या भेटी होतीलच'' असे लिहून आपल्या प्रदीर्घ अशा पत्राचा कृष्णराव भालेकर शेवट करतात. थोडक्यात सत्यशोधक कृष्णराव भालेकर यांच्या पत्रव्यवहारातून त्यांच्यातील लेखक मनाचे व तळमळीच्या कार्यकर्त्याचे दर्शन घडते.

सत्यशोधक कृष्णराव भालेकर आपल्या देशात ब्राह्मण क्षत्रियांचा एक, आणि शूद्रातिशूद्र निराश्रित हिंदूंचा दुसरा असे दोन देश आहेत असे मानतात. अशा वेळी आपल्याला मदत करणाऱ्यांची मदत घेतली तर (इंग्रज वगैरे) त्यात वावगे नाही. असे इतर सत्यशोधकांप्रमाणेच कृष्णराव भालेकरांनाही वाटत होते. यात काहीही आक्षेपार्ह नाही.

●●●

## ९

# लेख, जाहिराती, टिपणे वगैरे संकीर्ण लिखाण

कृष्णराव भालेकरांनी लिहिलेल्या इतर लिखाणात काही लेख, जाहिराती तसेच 'निराश्रित हिंदू आणि ब्राह्मण क्षत्रिय' या अपूर्ण पुस्तकाचा भाग आणि टिपणे यांचा समावेश होतो. या सर्वांचा संकीर्ण विभागात समावेश करून आपणाला काही निष्कर्ष काढता येतील.

'शंकराचार्य काय करून असतात ?' या लेखात कृष्णराव भालेकर ब्राह्मण वर्गास उद्देशून अनेक प्रश्न विचारतात.

उदा :

१) "देवाने तुम्हास देवपणा किती दिवसांचा दिला आहे ?"

२) देवाने तुमची कोणती योग्यता पाहून देवपणा दिला आहे ?

३) ब्राह्मणेतर हिंदू लोकांची या शंभर वर्षात धर्मासंबंधी कोणती सुधारणा केली ?

४) "पहिले शंकराचार्य स्थापन झाल्यापासून आतापर्यंत ब्राह्मणेतर वर्गास काय काय शिकवण्यात आले ?"

(सीताराम रायकर; पूर्वोक्त; पृ. १३८)

असे शेकडो प्रश्न होतील ! असे म्हणून भालेकर सर्व प्रश्नांचा सार म्हणून शंकराचार्य काय करून असतात ? हा प्रश्न विचारताना म्हणतात,

"शंकराचार्य हे जगद्‌गुरू या हुद्याने फक्त ब्राह्मण वर्गात प्रसिद्ध आहेत. सर्व ब्राह्मणांचे गुरू म्हणजे ब्राह्मणेतरांचे आजेगुरू ! नवल आहे ! परंतु हे आजेगुरू काय करून असतात ? पूर्वी प्रजेकडून दापदडप करून धन वसूल करणाऱ्या राजे लोकांमार्फत जगद्‌गुरूस मोठमोठाल्या जहागिऱ्या मिळाल्या व त्याचे उत्पन्न ते एकटेच खात आहेत असे नाही. त्यांच्याबरोबर इतर पुष्कळ ब्राह्मण मंडळी खाऊ लागत असेल. पण ही गुरू मनुष्ये काय करून असतात ?

(कित्ता, पृ. १३६)

'निराश्रित हिंदू' या शीर्षकाच्या जाहिरातीत भालेकर निराश्रित हिंदूमधील सुज्ञ मोठ्या गृहस्थांना नम्रपणे आवाहन करताना म्हणतात,

"निराश्रित हिंदूत जे कोणी मोठे सुज्ञ गृहस्थ असतील त्यास खाली सही करणार अत्यंत नम्रतेने विनंती करितो की, महाराष्ट्रातील निराश्रित हिंदू लोकांसाठी 'निराश्रित हिंदू' नावाचे वर्तमानपत्र महाराष्ट्र भाषेत तुम्हापैकी कोणी सुरू करतील तर त्यात निराश्रित हिंदू लोकांच्या संबंधाने अनेक विषयावर तयार असलेले लेख प्रसिद्ध करण्यासाठी पाठविण्यात येतील. त्या लेखावर कोणी वाद घातल्यास त्यास उत्तरे देण्यासही खाली सही करणार निराश्रित हिंदू लोकांच्या सेवेसाठी म्हणून करवेल इतका प्रयत्न करील"

(कित्ता, पृ. १६४)

असे कृष्णराव भालेकर ०१ जानेवारी, १९०३ मध्ये दिलेल्या जाहिरातीत म्हणतात,

'तेलगू तरुणास उद्देशून' या लेखात भालेकर इंग्रजांमुळे आपल्या देशात शांतता नांदू लागली आणि विद्येचा प्रसार होऊ लागला हे सांगून गरिबी, अंधश्रद्धा आणि दारूसारख्या वाईट व्यसनामुळे तसेच भटभिक्षुकांच्या स्वार्थी उपदेशामुळे बहुजन समाजातील माणूस अनाथ बनला आहे. असे भालेकर सविस्तरपणे सांगून शेवटी उपहासाने म्हणतात,

"असे अज्ञानामुळे व भटभिक्षुकांच्या स्वार्थी उपदेशामुळे गरिबीत येत जावे, अनाथ बनावे आणि तेलगू फंडाने त्यांना दुरुस्त करीत बसावे व पुन्हा धर्मभोळेपणात स्वार्थी धर्मगुरूंच्या नादाने तन-मन-धन गुरूस अर्पण करीत बसावे आणि अनाथ बनावे."

(कित्ता, पृ. २०१)

शिक्षण घेऊन आपण हुशार व्हावे पण बहुजन समाज अज्ञानातच राहावा असे ब्राह्मण्य वृत्तीला वाटते हे सांगताना भालेकर म्हणतात,

“गोब्राह्मण प्रतिपालक यजमान मेल्यावर त्याला आकाशातील इंद्रसभेत पहिल्या नंबरची खुर्ची मिळवून देण्याची हमी भटभिक्षुक घेतात. पण यजमानाने अगर त्यांच्या मुलांनी शिक्षण मिळवून जिवंतपणी सुशिशित व्हावे असा उपदेश करण्यास एकातरी भटभिक्षुकाची दातखीळ उचकटलेली कोणी पाहिली आहे काय ?”

(सीताराम रायकर, कित्ता, पृ. २०२)

‘ब्राह्मणांवर रागावण्याची कारणे’ या लेखात सत्यशोधक कृष्णराव भालेकर एकूण सहा भक्कम कारणांचा ऊहापोह करून शेवटी पेशवाईत ब्राह्मणांकडून बहुजनांचा कसा छळ होत होता. तसेच बहुजनांवरील अत्याचाराचे प्रतीक म्हणून स्मारक उभे राहिले. हे सांगताना भालेकर लेखाच्या शेवटी म्हणतात,

“तुम्हा ब्राह्मणांचे पुण्यास जेव्हा पेशवाई राज्य होते तेव्हा तुम्ही आम्हास ताकीद दिली होती की, सव्वा प्रहर दिवस वर येईपर्यंत शहरामध्ये शिरू नये व तुमची तोंडे आम्हा ब्राह्मणांच्या दृष्टीस पडू देऊ नयेत. तर आम्ही बिनतक्रार आज्ञा मान्य केली. सव्वा प्रहरानंतर शहरात येणे झाल्यास कोठे रस्त्यात आम्ही थुंकू नये अगर कोठे रस्त्यात लघुशंका करू नये. पण प्राण्याचे मलमूत्र विसर्जन करण्याचे धर्मच. त्यासाठी आम्ही बरोबर गळ्यात मडकी वागवीत होतो. हे कशासाठी ? तुम्ही देवाधिदेव, कोपलात तर जाळून भस्म कराल. तसेच तुमचीच राज्यसत्ता मग काय उंदीर, घुसी, पाल, बेडूक या क्षुद्र प्राण्यास कोणी ठार मारले असता त्याचा हिशोब ना पर्वा. त्याचे जोखीम ना जबाब, त्याप्रमाणे पेशवाईत आम्हा लोकांच्या प्राण हत्येची किंमत असे. पुण्यास कुंभार वेशीच्या धरणाजवळ मारुतीचे लहानसे देऊळ जमिनीत आहे. ते कशासाठी आहे. ते स्मारक आहे ते पेशवाईतील राज्यनीतीचे व आम्हा लोकांच्या जिवांच्या किमतीचे मोठे स्मारक आहे.”

(कित्ता, पृ. २०४)

वरील उताऱ्यात भालेकरांची लेखणी भाषिकदृष्ट्या उपरोध आणि उपहासाच्या अंगाने विकसित झाल्याचे स्पष्ट होते.

'अंत:काळचे उद्‌गार' हे स्वत: कृष्णराव भालेकरांचे आत्मचरित्रात्मक टिपण. यात आपण आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या प्रतिकूल परिस्थितीत समाजसेवा केली. स्वकीयांकडूनही त्रास सहन करावा लागला. हे सांगताना सत्यशोधक कृष्णराव भालेकर म्हणतात,

"छापखान्यात जमीन गेली, दागिने गेले, घर गेले होते. शिवाय कर्ज झाले होते.

गणपत सखारामास लहानाचा मोठा करणे व शिक्षण देणे.

फडक्यांच्या बंडाच्यावेळी झगडा.

जोतिबाचे वारंट ५० रूपये देऊन चुकते केले."

(पृ. २०७)

अशा अनेक हृदयविदारक नोंदी-टिपणे कृष्णराव भालेकरांनी लिहिलेली आहेत. यातून त्यांचे चरित्र समजून घेणे सोपे जाते.

मुंबई दंग्याच्या वेळी रावबहादूर या पोलिसाने एकांत खोलीत आपला खूपच अपमान केला. असे भालेकर सांगतात आणि,

'माझ्या शत्रूंनी मुंबईस माझा अनेक मार्गाने छळ केला' असे म्हणतात.

राणीचा जाहीरनामा, निराश्रित हिंदू, शेतकरी विजय या स्फुट लेख टिपणांमधून भालेकरांमधील बहुजनांविषयीची तळमळ दिसून येते. शेतकरी कारागीर, मागासलेले सर्व कामकरी तसेच निराश्रित हिंदू लोकांसाठी जवळजवळ पाच विषय शेती केंद्रबिंदू मानून भालेकर विस्ताराने मांडतात. तसेच जैन आणि महंमदी धर्मासंबंधी बहुजनांना सांगतात,

"जैन धर्मानुयाची लोक पशुपक्षादी प्राण्यांची हिंसा होऊ नये म्हणून इच्छितात आणि तेच लोक मनुष्य प्राण्याचे धन नाना प्रकारच्या लबाड्या करून इतके हैराण करतात की, आज कोट्यवधी लोकास त्यांनी अन्नान्न करून उपासमाराने खिदवू खिदवू मारण्यास लावले आहे !!

महंमदी धर्माचे लोकांप्रमाणे धर्मवेडाने हातात तलवारी घेऊन तुम्हास कोणा मनुष्य प्राण्यांचे जीव घ्यावयाचे नाहीत.''

(पृ. २१७)

शेवटी ख्रिस्ती धर्माच्या उपदेशकांना तसेच बहुजनांना उद्देशून बोलताना कृष्णराव भालेकर जवळजवळ ३१ मुद्यांचा ऊहापोह करतात. क्षत्रिय म्हणविणारे लोक ब्राह्मणांचे निव्वळ अनुकरण करत आहेत हे सांगताना एका स्फुट टिपणात भालेकर म्हणतात,

''क्षत्रिय म्हणविणारे लोक ब्राह्मणांचे जोडीदारच आहेत. हे लोक ब्राह्मणांप्रमाणे जानवी घालतात, स्त्रियांचा पुनर्विवाह करीत नाहीत, स्त्रियास गोषामध्ये ठेवतात, स्त्रियांच्या डोकीवर पाण्याचे भांडे किंवा कसलेही ओझे देत नाहीत. स्त्रियास नेसलेल्या लुगड्याचा कासुटा घालू देत नाहीत.''

(पृ. २२४)

२१ ऑक्टोबर, १९०२ रोजी कृष्णराव भालेकरांनी 'निराश्रित हिंदू आणि ब्राह्मण क्षत्रिय' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत ब्राह्मण आणि क्षत्रिय हे हिंदू लोकांचे पुढारी असून त्यांनी आपल्या वैश्य-शुद्रादी भावांना कसे वागविले हे सांगताना म्हणतात,

''वडिलार्जित मालमत्तेस चौघे भाऊ सारखे वारस असून दोघा मोठ्या भावांनी धाकट्या दोघा भावास मनुष्याधिकाराचा व संपत्तीचा कितवा हिस्सा दिला आहे व त्यांची कितपत काळजी घेतली आहे. किंवा किती हाल केले आहेत, किंवा किती हाल होऊ दिले आहेत हे या पुस्तकात वर्णन केले आहे. पुढे उत्तरार्धात ब्राह्मण क्षत्रियांनी आपल्या निराश्रित हिंदू भावंडास कोणत्या प्रकारे साह्य करून उतराई झाले पाहिजे हे दाखविले आहे.''

(कित्ता, पृ. २२५)

भालेकरांनी पुस्तकासाठी लिहिलेल्या वरील टिपणातून त्यांच्यातील विचारवंताचे दर्शन घडते. त्यांनी घडवलेली भाषा येथे तत्त्वज्ञानाचे रूप घेते.

उदा ; ''जगावरील कोणताही धर्म असो त्यातील तत्त्वे मनुष्यप्राण्यांचा नाश होण्याकरिता रचलेली नसतात. ती श्रेष्ठ मनुष्यांनी मनुष्यांच्या बऱ्याकरिताच रचलेली असतात.''

(कित्ता, पृ. २३१)

नंतर भालेकर 'निराश्रित हिंदू बोर्डिंग स्कूल' ची जाहिरात देतात आणि निराश्रित हिंदूंच्या बाजूने जवळ जवळ १० शीर्षके सूचवून व्याख्यानांचे १२ विषय सुचवतात. शेवटी सत्यशोधक समाजाच्या पुस्तकात येणाऱ्या विषयासंबंधी भटभिक्षुक आणि सेवक वर्गाच्या लोकासंबंधी म्हणतात,

"चोऱ्या करा, रस्ते लुटा, खोटे बोला, खोट्या साक्षी द्या, दस्तऐवज करा, खोटे जमाखर्च करा हे चहाडी सिंदळकी. सर्व दुर्व्यसनात रहा, मरा, वाटेल ते करा पण प्रत्येक पोर्णिमेस सत्यनारायण करा तरी भटभिक्षुकांच्या जातीचे लोक सेवक वर्गाच्या लोकास म्हणतात की, तुम्हास मेल्यानंतर पुण्यच भेटेल."

(पृ. २३९)

पण यातून अधंश्रद्धाच वाढणार आणि शेवटी काय उरणार ? हे सांगतांना कृष्णराव भालेकर म्हणतात,

"सुमुहूर्तावर राजवाडे बांधले, राज्याभिषेक करविले, राजपुत्राची व राजकन्येची लग्ने करविली पण झाले काय ? सर्व ओमफस्स."

(पृ. २३९)

०१ एप्रिल, १९०९ पासून तमाम विद्येत मागासलेल्या लोकांकरिता 'सत्य प्रकाश' नावाचे साप्ताहिक काढणार आहोत. असे भालेकर म्हणतात. या साप्ताहिकात येणाऱ्या विषयासंबंधी चर्चा करून, कसबा पेठ (पुणे) येथील माळी समाजाच्या मिटिंगा, ब्राह्मण पत्रकारिता याबद्दल लिहितात. पण प्रतिकूल परिस्थितीमुळे हे साप्ताहिक निघू शकले नाही.

शेवटी रा. रा. सत्यशोधक कृष्णराव पांडुरंग भालेकर यांच्या लिखाणाबद्दल सीताराम रायकर म्हणतात, "भालेकरांचे सगळेच लिखाण त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवावर, त्यांच्या स्वतःच्या प्रत्ययावर आधारलेले आहे. आणि म्हणून ब्राह्मणेत्तर चळवळीच्या बदलत्या स्वरूपाचे बदलत्या प्रश्नांची चाहूल त्यांच्या लिखाणात लागते, या दृष्टीनेही भालेकरांच्या लिखाणाचे महत्त्व निर्विवाद आहे."

(सीताराराम रायकरः कित्ता, पृ. ३१ प्रस्तावना.)

कृष्णराव भालेकरांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांविषयी जितक्या प्रभावीपणे आणि मूलगामी मांडणी केली. तितक्या प्रभावीपणे 'निराश्रित हिंदू' या संकल्पनेची खास मांडणी केली. त्यांची 'निराश्रित हिंदू' ही संकल्पना आजच्या काळाला प्रस्तुत अशी संकल्पना आहे.

म. फुले आणि कृष्णराव भालेकर यांच्यातील फरक स्पष्ट करून हिंदू धर्मासंबंधी विवेचन करताना डॉ. नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात,

"म. फुले आणि कृष्णराव भालेकर यांच्यातील फरक आणखी एका ठिकाणी अतिशय तीव्रपणे जाणवतो."

म. फुले आपल्या संपूर्ण विवेचनात कुठेही हिंदू हा शब्द आणत नाहीत. 'हिंदू धर्म' हे शब्दही त्यांच्या विवेचनात कोठेच येत नाहीत. परंतु कृष्णराव भालेकरांच्या विवेचनात मात्र पदोपदी हिंदू, हिंदू धर्म हे शब्द येतात. 'निराश्रित हिंदू' हा शब्द तर त्यांच्या विवेचनातील परवलीचा शब्द आहे.

म. फुले सर्वत्र ब्राह्मण, ब्राह्मणी धर्म, आर्य, दस्यू, वेद पुराणे इ. शब्द वापरतात. वेद, पुराणे इ. धार्मिक वाङ्मय शूद्रादी अतिशूद्रांना वाचता येत नाहीत. त्यांना ते वाचण्याचीच बंदी केलेली आहे. तर ते ग्रंथ त्यांचेही आहेत असे कसे म्हणता येईल असा म. फुले यांचा दृष्टिकोन आहे. त्यांच्या शाळेतील मातंग विद्यार्थिनीने जो निबंध लिहिला आहे, त्यातही हीच व्यथा प्रकट झाली आहे. आमचा धर्म कोणता असा प्रश्न तिने केला आहे. परंतु भालेकर मात्र हिंदू शब्द पदोपदी वापरतात. असे का झाले असावे ?

एक तर त्यांच्या काळात हिंदू धर्माची चर्चा फारच जोरात सुरू झालेली असणार पण त्याहीपेक्षा एक महत्त्वाचीच अडचण कृष्णराव भालेकरांपुढे आलेली असणार नव्हे ती अडचण त्यांनी स्वतः होऊन निर्माण केलेली आहे.

"त्यांच्या दृष्टीने हिंदू धर्म म्हणजे न कसता उत्पन्न देणारी ब्राह्मणांची शेती आहे."

(डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, जोतिपर्व पृ. १४३)

कृष्णराव भालेकर हिंदू आणि निराश्रित हिंदू अशी विभागणी करतात. त्यांच्या विवेचनात हिंदू लोकांचे पुढारी म्हणून ब्राह्मण आणि क्षत्रिय हे वर्ग तर वैश्य आणि शुद्र

यांच्यासाठी व इतर बहुजन समाजासाठी 'निराश्रित हिंदू' असे संबोधन आलेले आहे. या संदर्भात 'निराश्रित हिंदू आणि ब्राह्मण क्षत्रिय'च्या प्रस्तावनेत कृष्णराव भालेकर म्हणतात. "हिंदू लोकांचे पुढारी म्हणविणारे लोक म्हटले म्हणजे ब्राह्मण व क्षत्रिय हे दोन वर्ग होत. हिंदू धर्मासंबंधी झालेल्या बहुतेक ग्रंथात त्या लोकांकडेस मोठाले अधिकार चालत आलेले आहेत. इतर वैश्य शूद्रादी वर्गातले म्हणविणारे लोकांस श्रम करण्याची कामे चालत आली आहेत. एकूण जसे काय चार भाऊ एका कुटुंबातील असून त्यांच्याकडेच कामे वाटून दिली होती. वडलार्जित मालमत्तेस चौघे भाऊ सारखे वारस असून दोघा मोठ्या भावांनी धाकट्या दोघा भावास मनुष्याधिकाराचा व संपत्तीचा कितवा हिस्सा दिला आहे, व त्यांची कितपत काळजी घेतली आहे किंवा किती हाल केले आहेत, किंवा हाल होऊ दिले आहेत, हे या पुस्तकात वर्णन केले आहे."

(सीताराम रायकरः पूर्वोक्त, पृ. २२५)

कृष्णराव भालेकरांनी २१ ऑक्टोबर, १९०२ ला लिहिलेल्या वरील प्रस्तावनेतून त्यांची निराश्रित हिंदू ही संकल्पना स्पष्ट होते. निराश्रित म्हणजे ज्यांना कोणाचाही आश्रय नाही असे. यात वैश्य आणि शूद्र यांच्याबरोबर अनेक बहुजन समाजातील लोक. उदा : बलुते मंडळी, सोनार, तमासगीर, नाटकवाले, भेदिक गाणारे, सुतार, लोहार, कासार लोक इत्यादींचा कृष्णराव भालेकर समावेश करतात. यात भटके विमुक्त, मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय या सर्व जाती-जमातींचा समावेश कृष्णरावाना अभिप्रेत आहे. म. फुले यांनी संबोधलेल्या अतिशूद्रांची गणना भालेकर निराश्रित हिंदूमध्ये करतात. गरीब शेतकरी वर्ग वगैरे निराश्रित हिंदूमध्येच येतो. या संदर्भात तसेच निराश्रित हिंदूबद्दल सीताराम रायकर म्हणतात,

"या पार्श्वभूमीवर भालेकरांच्या गरीब शेतकऱ्यांनी एकत्र येऊन कारखाने काढण्याच्या उपदेशाचे त्यांनी आधुनिक पद्धतीने मंडळे स्थापन करून सहकार्याने काम केले पाहिजे या आग्रहाचे महत्त्व लक्षात येते. करजगाव येथील आपल्या भाषणामध्ये, गरीब शेतकऱ्यांना लुबाडणाऱ्यांमध्ये ते शेतकरी वर्गातील ज्या लोकांस; आपला मोठेपणा किंवा गरीब लोकांस लुबाडण्याचा लुटारूपणा सोडावासा वाटणार नाही, अशा धनिक शेतकऱ्यांचाही

समावेश करतात हे ध्यानात घेतले पाहिजे. भालेकरांनी 'निराश्रित हिंदू' या मथळ्याची एक पुस्तकमालिका लिहिण्याचे ठरवले होते. सुरुवातीच्या दोन-तीन पुस्तिकांचे वर्णन करणारी टिपणेही त्यांनी काढलेली दिसतात व नंतर मात्र केवळ मथळेच टिपून ठेवलेले दिसतात. यामध्ये निराश्रित म्हणून ज्यांची त्यांनी यादी केली आहे व त्या सर्व जाती आज अन्य मागासवर्गीय जमाती या संज्ञेने ओळखल्या जातात. इतर जातींच्या मानाने त्या मागास आहेत आणि त्यांना आर्थिक, शैक्षणिक इत्यादी सवलती दिल्या पाहिजेत हेही आज मान्य झाले आहे. भालेकरांनी त्यांचे हे निराश्रितपण पाऊणसे वर्षापूर्वी ओळखले होते हे महत्त्वाचे आहे.''

(कित्ता, पृ. ३१ प्रस्तावना)

वरील विवेचनातून कृष्णराव भालेकरांची दूरदृष्टी अधोरेखित होते.

●●●

# १०

# कृष्णराव भालेकरांची भाषाशैली

शैलीच्या संदर्भात डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी साहित्याची भाषा या ग्रंथात स्वतंत्रपणे विवेचन केले आहे. शैली साहित्यमीमांसा टीकाशास्त्र आणि भाषाशास्त्र या वेगवेगळ्या अंगानी विकसित होते. पैकी या प्रकरणात कृष्णराव भालेकरांची भाषाशैली या अंगाने अभ्यास अभिप्रेत आहे. येथे टीकाकार आणि साहित्यिक भालचंद्र नेमाडे यांची दोन मते अत्यंत महत्त्वाची आहेत.

"१) मानवी व्यवहाराच्या अनेक क्षेत्रात शैली ही संज्ञा रीत, पद्धत, लकब, वळण, ढब, धाटणी, कौशल्य, वैशिष्ट्य, तंत्र किंवा 'स्टाईल' अशा अनेक अर्थांनी वापरली जाते.

२) 'शैली म्हणजे लेखकच' (द स्टाईल इज द मॅन हिमसेल्फ) हे सूत्र मांडून ब्यूफोने साहित्यातल्या शैलीनिरपेक्ष निव्वळ विषयांचा मोठेपणा अमान्य केला (इ. स. १७५३) विचार तोच असतो पण मांडणारा माणूस तोच विचार वेगवेगळ्या पद्धतींनी मांडतो. म्हणून शैली म्हणजे लेखकच."[१]

कृष्णराव भालेकरांच्या भाषाशैलीचा अभ्यास करताना म. फुले यांच्या कार्याची आणि साहित्याची आठवण होणे साहजिक आहे. या संदर्भात फुल्यांच्या गद्यशैलीचा भालचंद्र नेमाडे यांनी अभ्यास केलेला आहे. शैलीच्या संदर्भात पोशाखाचेही महत्त्व पटवून देताना नेमाडे म्हणतात,

---

१. डॉ. भालचंद्र नेमाडे, साहित्याची भाषा, पृ. ३८, ३९, ३७.

"फुल्यांच्या एकूण जगण्याची शैली, पंडिती परंपरेच्या विरोधात आविष्कार करण्याची प्रत्यक्ष कृती करून हिंदुस्थानातल्या पहिल्या लोकचळवळीचा पाया घालणाऱ्या द्रष्टेपणाची आणि समाजकार्य करण्याची शैली त्यांच्या गद्याच्या संदर्भात नेहमी समारे ठेवली पाहिजे. फुल्यांचा काळ व त्या काळातला मराठी समाज फुल्यांची कष्टकरी जात, शिक्षण, वाङ्मयीन परिणाम आणि कार्यक्षेत्र या सर्वांचा त्यांच्या गद्याशी मेळ घातला पाहिजे. फार काय त्यांचा पोशाखही ह्या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो. आपल्या पुढाऱ्यांचे पोशाख आणि त्यांचे व्यक्तिमत्व यांचा अत्यंत जवळचा संबंध वाटतो आणि शैलीच्या दृष्टीने हा संबंध अभ्यासनीय ठरतो. उदाहरणार्थ रानडे-टिळक-गोखले यांच्या पगड्या उपरणी, जीना-आंबेडकर यांचे इंग्रजी टाय-कोट, अलीबंधूची शेरवानी, महात्मा गांधींचा पंचा-काठी वगैरे. शैली ही व्यक्तीच्या सर्व व्यवहारांना छेद देणारे तत्त्व मानले पाहिजे. फुल्यांच्या एकूण पोशाखाचा देशीपणा मातीशी भिडणारा आहे. फुल्यांनी मराठी गद्यात पहिल्यांदाच श्रमिकांची व शूद्रांची भाषा उमटवली त्यांचे हे भाषिक कार्य अत्यंत महत्त्वाचे ठरते."[२]

कृष्णराव भालेकरांच्या राहणीमानासंदर्भात ते स्वच्छ आणि पांढरे शुभ्र कपडे (धोतर-कोट) वापरत असत. अर्थात देशी वस्त्रांमध्ये भालेकर सर्वांमध्ये उठून दिसत. म. फुले यांच्याबरोबर त्यांचे मतभेद झाल्यामुळे आणि नंतर दोघांमध्ये एक प्रकारची सुप्त स्पर्धा असल्यामुळे कृष्णरावांचे व्यक्तिमत्त्व स्वतंत्र आणि वेगळे घडत गेले; यामुळे अर्थात म. फुले यांच्या शैलीपेक्षा वेगळी आणि भिन्न अशी शैली कृष्णराव भालेकरांची घडत गेली. येथे त्यांच्या भाषाशैलीचा अभ्यास पद्य आणि गद्य या अंगांनी अभिप्रेत आहे.

कृष्णराव भालेकरांनी कविता-पोवाडे-अभंग-लावण्या-श्रीखंड तसेच हिंदी पदे आणि गाणीही लिहिलेली आहेत. तसेच कवितेतील फटका हा काव्यप्रकारही भालेकरांनी समर्थपणे हाताळला. भालेकरांचे काव्य या प्रकारातील हितोपदेश संदर्भात त्यांच्या एकूण काव्याबद्दल प्रातिनिधिक स्वरूपात सीताराम रायकर म्हणतात,

"भालेकरांनी दीनबंधू मधून हितोपदेश नावाचे भजनी अभंग प्रसिद्ध केले. यातील काही रचना त्यांनी १८७६ पासून केलेल्या होत्या. या सर्व अभंगांतून शूद्रादी अतिशूद्रांच्या अवनतीचे मुख्य कारण त्यांचे अज्ञान हे होय असे त्यांनी बजावले आहे. ब्राह्मण

शेतकऱ्यांच्या मजुरांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांना लुबाडतो. स्वतः भ्रष्टाचरण करूनही नानाप्रकारचे शास्त्राधार शोधून व निर्माण करून वर तो शेतकऱ्यांना, राबवणाऱ्यांना नाडतो. ब्राह्मणाच्या कसबाला तोंड द्यायचे असेल तर ते विद्या आणि उद्योग या दोन शास्त्रांच्या साहाय्यानेच देता येईल हे भालेकरांनी त्यांच्या हितोपदेशात पुन्हा पुन्हा मांडले आहे.''[३]

लोकवाङ्मयातील ओवी गीते, संत तुकारामाचे अभंग, म. फुले यांचे अखंड यांच्या प्रभावातून कृष्णराव भालेकरांमधील कवी घडत गेला. संतांच्या उक्तीचा आधार भालेकर उपहासात्मक शैली विकसित करण्यासाठी कसा समर्पकपणे करतात हे 'शेतकऱ्यांचा कैवारी' मधील लेखातून स्पष्ट होईल. भालेकर म्हणतात.

"लोकांस एकाद्याविषयी भलतेच भासवावे हाच का सत्य शोधण्याचा क्रम? सत्यशोधक हे नाव अगदी बरोबर व खरोखर चांगले आहे. त्या समाजाचे हेतूही फार फार चांगले आहेत म्हणून सत्य समाजियन म्हणवील तो चांगलाच म्हणावा काय ? अथवा तसा वर्तेल तर चांगला म्हणावा ? जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती देह कष्टविती परोपकारे।। अशानाच लोक पूज्य मानतात नाहीतर जगाच्या विभूती माझ्याच कल्याणाचा डौल मानपाना खर्च हवा. अशा स्वार्थ साधूस कोण साधू म्हणत असतील ते म्हणोत.''[४]

कृष्णराव भालेकरांनी 'पंचखेळ', 'बळीबा पाटील आणि १८७७ चा दुष्काळ' तसेच 'बळीबा पाटील' या कादंबऱ्या, संवादात्मक नाट्यात्म शैलीतील 'शास्त्राधार,' बहुजनांचा कळवळा येऊन केलेली भाषणे, पत्रव्यवहार तसेच विविध वृत्तपत्रांमधील अग्रलेख आणि स्फुट गद्य लेखन तसेच काही अप्रकाशित पुस्तके गद्य शैलीत लिहिलेली आहेत. या सर्व पद्य आणि गद्य लिखाणावरून कृष्णराव भालेकर यांची स्वतंत्र्य शैली विकसित झाली असे आपणास म्हणता येईल.

कृष्णराव भालेकरांनी 'बळीबा पाटील' या कादंबरीतून आपल्या व्यक्तिमत्त्वाशी मिळताजुळता सर्वधर्म समभावी वृत्तीचा नायक निर्माण केला. बळीबा पाटील सभेत भाषण करताना म्हणतो,

---

३. सीताराम रायकर; 'भालेकर समग्र वाङ्मय' पृ. १० (प्रस्तावना).

४. कित्ता, पृ. १९७.

“तर माझ्या बंधूहो, आपण सर्व एका कुटुंबातील भावंडाप्रमाणे आहोत. आता येथे हे महंमदभाईही आहेत तसेच हे एक रूपचंद मारवाडी आहेत. तो पहा दत्तू महार एक माझा स्नेही आहे आणि बाकी तुम्ही सर्व माझे कुटुंबीय आहात.”[५]

कृष्णराव भालेकर हे सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते. ते समाज सुधारक तसेच समाज शिक्षक या भूमिकेत वावरले याचे प्रतिबिंब त्यांनी लिहिलेल्या “बळीबा पाटील आणि १८७७ चा दुष्काळ” या पहिल्या कादंबरीतही उमटल्याचे दिसून येते. या कादंबरीचा नायक बळीबा पाटील समाज सुधारक तसेच शिक्षकाच्या भूमिकेत वावरताना दिसतो तो म्हणतो,

“चला, आपण आपल्या या बांधवांची व्यवस्था लाववेल तेवढी लावू. म्हणून लोकवस्तीत बळीबा जाऊन त्यांनी भाषा आणि लिपी शिकविता झाला व लोकात बरीच सुधारणा करू लागला.”[६]

‘बळीबा पाटील’ या कादंबरीत कृष्णराव भालेकरांनी शैलीचे अनेक प्रयोग केलेले आहेत. ओघवती, सरळ बोलीनुसार-व्याकरणाच्या नियमांना फाटा मारत कृष्णरावांनी येथे निवेदन शैलीचा विकास केलेला आहे.

उदा ;

“बायको बळीबास एकांतात बोलावून विचारते की, पाटील माझ्या मनाला अलिकडे अगदीच समाधान नाही. तेव्हा याला उपाय तरी काय करावा ! समाधान नसण्याचे कारण काय ? कशाची काळजी लागली ? काळजी कशाची नाही पण मैनाबाईचे फार वाईट झाले. त्याला कोणाचाच इलाज नाही. मग तुम्ही आम्ही तरी काय करावे. ईश्वराचा खेळ ईश्वराला माहीत. त्याला बरे दिसले असेल म्हणून माझ्या लाडक्या छकडीस तुरुंगात टाकले, असे म्हणून म्हातारीने डोळे पुसीत थोडासा उसासा टाकला. आणि बळीबास म्हणते की, आम्ही स्त्रियांनी कोणती तुम्हा पुरुषाची चूक केली बरे आणि पुरुषांनीच कोणते पुण्य केले ?”[७]

---

५. कित्ता, पृ. ७९.

६. कित्ता, पृ. ५५.

७. कित्ता, पृ. ७६.

या कादंबरीत भालेकर संवादात्मक, नाट्यात्मक शैलीचा तसेच पत्रात्मक शैलीचाही स्वीकार करतात. तसेच महंमदभाई, दत्तू महार, म्हाळसाबाई, सईबाई, धोंडाबाई आणि इतर पात्रे कृष्णरावांनी बोली भाषेसहीत साकार केल्यामुळे आणि निवेदनात अनेक म्हणी वाक्प्रचार येत गेल्यामुळे कृष्णरावांची गद्यशैली जोरकसपणे विकसित झाली असे आपणास म्हणता येईल.

सभेत बळीबा पाटील आपली मुलगी मैनाबाईस पुण्याहून आलेल्या रावसाहेबाच्या पत्रासंबंधी बोलतात. हा प्रसंग भालेकर नाटकातल्याप्रमाणे संवादात्मक शैलीचा आधार घेऊन साक्षात सादर करतात नंतर पत्राचा मायना कादंबरीत जसाच्या तसा येतो. यामुळे कादंबरी व्यापक आशय कवेत घेत समर्थ बनत जाते.

कृष्णराव भालेकरांनी जी भाषणे दिली त्या भाषणांची शैलीही कारुण्याचा स्पर्श करत तळमळीने व्यक्त होताना जागतिक पातळीवर जात, देशी बहुजनांची बाजू घेत, भविष्याचा वेध घेताना खालीलप्रमाणे अभिव्यक्त होते.

"अमेरिकन ब्राह्मण, युरोपियन क्षत्रिय, चिनी, जपानी, वैश्य आणि इंडियन शूद्र हे नवीन वर्गीकरण जुने भासविण्यासाठी जुन्या मनूतील स्मृतीमध्ये कोणी मंडळीने घुसडून दिले तर आर्य लोकांनी येथील मूळच्या लोकास अनार्य मानून हजारो वर्षे होत आली, त्यांना वर डोके करूच दिले नाही !!! त्याचप्रमाणे या नवीन वर्गीकरणाचा परिणाम कदाचित होऊ लागला तर शूद्रांपलीकडील अतिशूद्रांपलीकडे ते मानिले जाणार नाहीत कशावरून ? तसेच मग त्यांच्या पुढील पिढीस त्या नव्या शेतकऱ्यांच्या येथे उष्ट्याकरिता कंपाऊंडाबाहेर तिष्ठत उभे रहाणे !, अगर छोट्या बंगल्यातील मैला काढणे !, अंगणातील झाडलोट करणे !, मुला बायकांचे कपडे धुणे !, भरलेले बुट साफ करणे !, चुकले की त्याच बुटाच्या ठोकरा खाणे !, अगर ठोसे खाणे !, मार्मिक शिव्या ऐकून घेणे !, स्वैपाक बिघडला की तोंडावर थुंकुन घेणे वगैरे प्रकार पुढे होणार नाहीत कशावरून ?"[८] येथे भालेकर इतिहासाचा अन्वयार्थ लावत संशोधक वृत्ती जोपासताना दिसून येतात.

८. कित्ता, पृ. १४४, ४५.

शेतकऱ्यांना नाडणारे अनेक आहेत. मारवाडी, सावकार, शेटजी वगैरे तसेच ब्राह्मण इतर उद्योगधंद्यात शिरले. शेतकऱ्यासाठी मात्र इतर व्यवसायाची दारे बंद आहेत. या सर्व गोष्टी कृष्णराव भालेकर त्या त्या पात्रांच्या भाषेतून अगदी बोलीसह श्रोत्यांसमोर उभी करतात.

"जेनू काम तेनु धाय, बिजा करे सो गोता खाय, असे म्हणून कित्येक लबाड लोक तुम्हास भुरळ पाडीत असतील मारवाड्यांनी 'कांच बांगडीनू फुटानो' करीत फिरावे मग, हिंगजिरे मांडून का बसावे ? 'पैसानो गूड गुडानो पैसा' करू लागावे मग 'फाग, होली, शिमगा' असे एकाचे तीन का जुळवू लागावे ? द्यावा एक; लिहावे दहा. व्याजाचे व्याज वरचेवर जुळवून सावकारी करीत बसावे ते बसावे ? मग पिढीजात जमीनदारांच्या जमिनी हाताखाली का घालितात ? रंगीत हवेलीत लोडास टेकून त्याच जमीनदारास गडी करून का राबवतात ? जहाल्या बहुतेक जमिनी शेटजीकडे ! जहाला शेपन्नास शेतकऱ्यांचा एकच शेट शेतकरी !!! लागला त्याच जमिनीत हजारो रुपयांचा माल पिकविण्यास ! ब्राह्मणांचा धंदा घरोघर भीक मागून पोटे भरण्याचा. परंतु ते भटकी करून कुळकर्णही करू लागले. भटकी करून महार जागले, भिल्ल, रामोशी यांच्या रखवालीच्या धंद्यात म्हणजे पोलीस खात्यात शिरू लागले ! भटकी करून प्रेते फाडून तपासण्याचे काम म्हणजे डाक्तरी कामातही घुसू लागले ! कातड्याचे कारखाने घालणे, म्हणजे चांभारी कामात पडू लागले ! तसेच ते भटकी करून हव्या त्यांच्या नोकऱ्या करू लागले व हव्या त्या धंद्यात हात घालू लागले. शिवाय शेतकऱ्यांच्या जमिनीही घशात उतरू लागले आहेत. शेतकऱ्यांनी मात्र हिस्सेदारीने येत चाललेल्या अपुऱ्या जमिनीत अपुऱ्या अन्नवस्त्रासह कुचंबतच मरावे ? त्यांनी इतर धंद्यात पडूच नये काय ?"[९]

पात्रानुसारी बोली भाषा कृष्णराव भालेकरांना खास शैलीत जमते. हे आपणास वरील उताऱ्यातून सांगता येईल.

कृष्णराव भालेकरांची भाषाशैली म्हणी, वाक्प्रचार तसेच सुभाषित यांनी युक्त अशी आहे. यामुळे समाजमन, संस्कृती यांना कवेत घेत त्यांची गद्यशैली समृद्ध बनत गेली.

९. कित्ता, पृ. १४७, ४८.

उदा :

"आतासुद्धा एखादा काळा डगल्याचा शिपाई गावात शिरला की 'मेंढरात लांडगा' असे होऊन जाते !

'चोरास चांदण्याचा कंटाळा' या आपल्या शेतकऱ्यांच्या म्हणीप्रमाणे विद्यावृद्धी करणारे काही लोकांची मने भरविणारे अशा कित्येक लोकांचे असे म्हणणे असते की, इंग्रज लोकांनी आमचे फार नुकसान मांडले आहे."[१०]

म्हणी-वाक्प्रचार तसेच सुविचारयुक्त भाषाशैलीमुळे कृष्णराव भालेकरांच्या भाषाशैलीत गोडवा निर्माण झालेला आहे.

म्हणी- १) ज्याच्या हाती सत्ता तोच पारधी ;

२) मेल्या म्हशीस आठशेर दूध ;

३) कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ ;

४) आपले हातून होईना आणि दुसऱ्यानं केलेलं पाहवेना ;

वाक्प्रचार-१) गावचे खाऊन शेटजी चाकरी करणे ;

२) भ्रमाचा भोपळा फुटावा हे चांगले ;

३) सरकारच्या ताटाखालची मांजरे ;

४) सरकारचे शरमिंदे ;

५) नाड्या आखडल्या ;

६) गंगाजमुना कळप ;

७) मांजराच्या गळयात घंटा बांधणे ;

८) पोकळ श्रीमंतीसारखे पोकळ समजले जाणार नाही ;

---

१०. कित्ता, पृ. ५८.

९) दात ओठ खायचेच ;

१०) उफराट्या काळजाचे बनले ;

११) तोंडास पाने पुसून ;

१२) खडामाती खाऊन ;

१३) गळे चेपून मारले ;

१४) आश्रय देण्यास धजत नाहीत ;

१५) नारदशाही चालवत होते ;

१६) मेंढराची कातडी पांघरलेल्या ;

सुभाषिते-

१) सहनशीलतेनेच सत्याचा शोध लागेल व सत्याचा प्रसारही करवेल.

२) आपल्याच तोंडावरून आपण दिवा ओवाळून घेण्याची सुरुवात करू नये.

३) इतर कोणत्याही शक्तीपेक्षा ज्ञानशक्ती ही श्रेष्ठ आहे.

४) तन, मन, धन आणि वेळ यांचा व्यर्थ खर्च करू नये.

५) मोठ्या भयंकर रोगापेक्षा अज्ञान हा रोग अत्यंत भयंकर आहे.

म्हणी-वाक्प्रचार-सुभाषितांबरोबरच बोली भाषेतील अनेक शब्द कृष्णराव भालेकर सहजपणे वापरतात यामुळे त्यांची भाषाशैली देशी वळणाची बनते. भालेकरांच्या गद्यशैलीत बोली भाषेतील शब्द खालीप्रमाणे येतात.

खमाटा, खटराक, बलामत, अज्जी, कसब, चोरटाळा, अदमास, चाहूर, छकडीस, लटके, फिद्या, आवुते, चटसाऱ्या, मुखपाठ, डोल्या, कुर्र, बिलंदर, तरवणी, ऐसाजेच, वहिवाटी, हल्लीचे, विसखळून, छाछू, बडथे, सडकून, झपाटा, डुरकावणीस, चपापून,

निभावला, निपजली, भूषण, बरकत तसेच काही हिंदी आणि इंग्रजी वळणाचे अनेक शब्द (अर्टीकले, ग्याझेटियर, मॅट्रिक्युलेशनची) भालेकरांच्या गद्यलेखनात आलेले आहेत.

आपणास कधी कधी कृष्णराव भालेकरांच्या गद्यलेखनात पद्याचे दर्शन होते. डॉ. भालचंद्र नेमाडे 'शैलीचे गुणधर्म' या लेखात गद्य आणि पद्याच्या शैलीतील भेद स्पष्ट करत आपले मत मांडताना म्हणतात,

"गद्य व काव्य यांच्या शैलीतील भेद काही भाषिक वैशिष्ट्यांनी सांगता येतो. वाक्य, परिच्छेद व त्याहून मोठे रचनेचे तुकडे यांचा गद्यात प्रामुख्याने आढळ असतो. तर ओळी ; आदि, मध्य, अंत, विराम ; कडवी व त्याहून मोठे रचनेचे तुकडे ; छंद यांचा काव्यात प्रामुख्याने विचार करावा लागतो. वस्तुतः गद्य व काव्य हे पारंपरिक मांडणीमुळे व भाषेच्या परिस्थितीजन्य बदलामुळे भिन्न समजले जातात. निव्वळ गद्य व निवळ काव्य प्रत्यक्ष साहित्य व्यवहारात दुर्मीळ आहे. गीतकाव्य वगळता इतर सर्व गद्य-प्रकार व काव्यप्रकार एकमेकांचे गुणधर्म वापरताना दिसतात. गद्याची कित्येक वैशिष्ट्ये काव्यातही आढळतात. तर काव्याची कित्येक वैशिष्ट्ये गद्यातही आढळतात. त्यामुळे शैलीच्या दृष्टीने ह्या दोन्ही प्रकारात अहिनकुलवत भेद नसतो."[११]

वरील उताऱ्यात भालचंद्र नेमाडे गद्द-पद्दातील अभिन्नत्वही स्पष्ट करतात.

कृष्णराव भालेकर आपल्या लेखातून ब्राह्मण क्षत्रियांना निराश्रित हिंदू लोकांची प्रार्थना या विषयावर लेख लिहिण्यासाठी काही मुद्दे सुचवतात. यावेळी त्यांच्या गद्दलेखनात काव्याचा शिरकावे खालीलप्रमाणे होतो.

"पशूंच्या पशूंशी, पक्षांच्या पक्षांशी, पशूंशी पक्षांच्या, पशू मनुष्याशी, पक्षी मनुष्याशी, पशू धर्मगुरूशी, पक्षी धर्मगुरूशी, पशू सावकाराशी, पक्षी सावकाराशी, पशू राजाचे अंमलदाराशी, पक्षी राजाचे अंमलदाराशी, पशू सुधारकांशी, पक्षी सुधारकांशी.

"ख्रिस्ती उपदेशक
आणि
निराश्रित हिंदू
साठी

११. डॉ. भालचंद्र नेमाडे, पूर्वोक्त, पृ. ४५.

ख्रिस्ती उपदेशकास
विनंती

निराश्रित हिंदू
आणि
ख्रिस्ती उपदेशक

निराश्रित हिंदू
आणि
ब्राह्मण क्षत्रिय ''[१२]

कृष्णराव भालेकरांची ही गद्यशैली काव्यमय तसेच प्रायोगिक आहे. तसेच भालेकरांच्या श्रीखंडाला म्हणींचे स्वरूप प्राप्त झालेले आहे. कृष्णराव भालेकरांची भाषाशैली बोलीभाषेच्या स्वीकारामुळे स्वतःचे वेगळेपण जाणवून देणारी ठरली हे इथे महत्त्वाचे आहे.

●●●

११. सीताराम रायकर, पूर्वोक्त, पृ. २१६.

## ११

# रा. रा. कृष्णराव भालेकरांचा जीवनपट

१८५० कृष्णरावांचा पुण्याजवळील भांबुर्डे (आताचे शिवाजीनगर) येथे आई रूक्मीबाई हिच्या पोटी एका पोर्णिमेला जन्म झाला. ते ४ महिन्यांचे असताना आई मरण पावली.

१८६४-६८ पुण्यातील रविवार पेठेत मिशन स्कूलमध्ये शिक्षण.

१८६६ च्या आसपास भांबुर्ड्याचे साधू जंगली महाराजांच्या सान्निध्यात कृष्णराव आले. कृष्णरावांचे वडील पांडुरंगराव यांचे निधन.

१८६८ डिस्ट्रिक्ट जज्ज कोर्टात इंग्रजी ऑफिसात उमेदवारी. आळंदी येथे जंगली महाराजांचा अनुग्रह घेऊन त्यांना गुरू केले. नंतर आपल्या भजनी मेळ्यासह सत्यशोधक समाजास येऊन मिळाले. हुबेहूब सत्य नारायणाच्या पोथीचा घाट घालून फार्स केला.

१८७१ भांबुर्ड्यास विठोबाच्या देवळात गरीबशी लायब्ररी स्थापन केली. भांबुर्ड्यास हितोपदेश भजन समाज ही संस्था काढली.

१८७४ एका कुस्तीत जिंकल्यामुळे कडे मिळाले. डिस्ट्रिक्ट जज्जाचे कोर्टातील कारकुनाची नोकरी सोडून मे. रामचंद्र महादेव यांच्या पोट कंत्राटदाराजवळ कारकुनाचे काम स्वीकारले.

१८७५ म. जोतिबा फुले यांनी कंत्राट घेऊन कंपनीच्या कामात कृष्णरावांना भागीदार करून घेतले. स्वामी दयानंद सरस्वती यांचे भांबुर्डा येथे भाषण घडवून आणले.

१८७६ अभंग लिहिले आणि हितोपदेश नावाचे हे भजनी अभंग दीनबंधू-मधून नंतर प्रकाशित केले.

१८७७ दीनबंधू मासिक जानेवारीपासून सुरू केले. जुलैपासून नंतर ते टाईपावर निघू लागले.

१८७९ पुण्यात स्त्रियांच्या निबंध वाचनाचा समारंभ घडवून आणला.

१८८० स्वामीची चिंचोली ता. बारामती येथे शेतकऱ्यांची एक प्रचंड सभा भरवली.

१८८१-८३ निरा कॅनॉल बिरवाडी येथे हेडवर्कवर सब-ओव्हरसिअरचे काम केले.

१८८३ सुशिक्षण गृह या बोर्डिंगची १ जुनला सुरुवात केली.

१८८४ दीनबंधू सार्वजनिक सभा स्थापन केली.

१८८५ मध्ये पुण्यात गुढीपाडव्याच्या दिवसी सत्यशोधक समाजाच्या झेंड्याची मिरवणूक काढली.

१८८७-८८ मुंबईच्या तान्सा तलावाच्या कामापैकी एका बांधकामाचे पोटकंत्राट घेतले.

१८८८ कृष्णरावांनी दीनबंधू फ्री स्कूलची स्थापना केली. भालेकर आणि त्यांचे भाचे गणपत सखाराम पाटील यांनी 'दीनमित्र' मासिकपत्र सुरू केले.

१८८९ दीनबंधू सार्वजनिक सभेच्यावतीने कृष्णरावांनी पुण्याला प्रचंड सभा घेवून तीन ठराव पास केले. नंतर नारायण अंबाजी यांच्या सहकार्याने 'अंबालहरी' हे इंग्रजी मराठी साप्ताहिक सुरू केले.

१८९२ कृष्णराव यांचा भाचा गणपत सखाराम पाटील यांचे निधन. बहिणीच्या सांत्वनासाठी कृष्णरावांनी आपल्या मुलास तिच्या सुनेच्या (लक्ष्मीबाई) मांडीवर नंतर मुकुंद यास ०७ ऑगस्ट, १८९३ रोजी दत्तक म्हणून दिले. कालांतराने मुकुंदरावाचे ०४ डिसेंबर, १९६७, रविवार रोजी निधन झाले.

१८९३ भालेकरांच्या संपादकत्वाखाली 'शेतकऱ्यांचा कैवारी' हे पाक्षिक सुरू झाले.

मुंबईत हिंदू-मुसलमान मोठा दंगा झाला.

१८९५ कृष्णरावांनी राष्ट्रीय सभेच्या मंडपासमोर शेतकऱ्याचा २२ फूट उंचीचा कापडी पुतळा उभा करून राष्ट्रीय सभेला सवाल केला.

१८९५-९६ शेतकऱ्यांच्या गाड्या कशा धरल्या जातात याचे चित्र छापून, कृष्णरावांनी त्याच्या हजारो प्रती वाटल्या.

१८९६ शेतकरी मीठ, जंगल, व रानटी जनावरे यामुळे कसा टेकीस आला, हे दाखवणारे चित्र छापून भालेकरांनी वाटले.

१८९८-९९ कृष्णरावांनी मनमाड येथे कंत्राट नोकरी केली.

१९०० भालेकर निझाम स्टेट फॅमिन रिलीफच्या कामावर सब ओव्हरसिअरचे काम करतात.

करजगाव वगैरे वऱ्हाडातील केंद्रात २ वर्ष सत्यशोधक समाजाचे कार्य केले.

१९०२ जबलपूर-गोंदिया रेल्वेच्या कामावर गेले. तेथे जंगल घेऊन लाकडाचा धंदा सुरू केला.

१९०४ भालेकरांचे लक्ष पाणी खेचण्याचा पंप तयार करण्याकडे गेले. जुलै, महिन्यात बेसुरा जि. अमरावती येथे यशवंतराव देशमुख यांच्या मदतीने विहिरीतून पाणी काढण्याचा प्रयोग केला.

१९०७ कृष्णराव अहमदनगरला थिएटरमध्ये नोकरी करायला लागले.

१९०८ कृष्णराव विठ्ठल रामजी शिंदे यांच्या सहवासात येऊन त्यांच्या डिप्रेस्ड क्लासेस मिशनचे काम वऱ्हाड प्रांतात सुरू केले.

१९०९ मिशनच्या कामाचा राजीनामा दिला. नंतर चि. मुकुंदराव पाटील यांच्या साहाय्याने 'दिनमित्र' पुन्हा सुरू करण्याचे ठरवले. पण छापखाना उभा राहिलेला पाहण्यापूर्वीच--

१९१० कृष्णराव पांडुरंग भालेकर यांचे ७ मे या तारखेला निधन झाले.

●●●

# संदर्भ ग्रंथ-मासिक-दिवाळी अंक


१. **कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मय**
संपादक : सीताराम रायकर
म. जोतीराव फुले समता प्रतिष्ठान, ७३,
नाना पेठ, पुणे-४११ ००२.

२. **प्रबोधनाच्या दिशा**
संपादक : डॉ. गंगाधर पानतावणे
नंदिता प्रकाशन, जनता चौक, वर्धा,
(१९८४ प्रथमावृत्ती).

३. **ताराबाई शिंदे**
संपादक : इंद्रजित भालेराव
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई-४०० ०१४. (प्रथमावृत्ती २००२).

४. **स्त्री-पुरुष तुलना**
संपादक : डॉ. नागनाथ कोत्तापल्ले
कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद, (प्रथमावृत्ती १९९०).

५. **प्रबोधनातील पाऊलखुणा**
संपादक : डॉ. निर्मलकुमार फडकुले,
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे-३० (प्रथमावृत्ती १९७८).

६. **पाचोळा आणि दहा समीक्षक**
संपादक : डॉ. नागनाथ कोत्तापल्ले,
साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, (प्रथमावृत्ती १९८९).

७. **बळीबा पाटील**
संपादक : डॉ. वासुदेव मुलाटे,
कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, (प्रथमावृत्ती १९९८).

८. **बळीबा पाटील**
(संपा.) डॉ. श्रीराम गुंदेकर, निरामय प्रकाशन,
परभणी, (प्रथमावृत्ती १९९८).

९. **महा-महात्मा जोतीराव फुले व्यक्ती व कार्य**
संपादक : ॲड. राम कांडगे (मा. आमदार)
राजश्री प्रकाशन, मु. पो. चाकण, जि. पुणे,
(प्रथम आवृत्ती), मार्च २००४.

१०. **क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले**
संपादक : डॉ. मा. गो. माळी (निमंत्रक),
महाराष्ट्र राज्य साहित्य अणि संस्कृती मंडळ,
मुंबई-४०० ००१. मार्च, १९९८.

११. **महात्मा जोतीराव फुले : वारसा आणि वसा**
संपादक : गं. बा. सरदार, ग्रंथाली वाचक चळवळ,
मुंबई ४०० ०२८, १९८८.

१२. **महात्मा जोतीराव फुले : वारसा आणि वसा**
संपादक : भा. ल. भोळे
साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९०.

१३. **सत्यशोधक केशवराव विचारे समग्र वाङ्मय**
संपादक : हरी नरके,
पद्‌मगंधा प्रकाशन, पुणे ३८, मार्च २०००.

१४. **'परिवर्तनाचे पाईक'**
संपादक : मधु दंडवते,
साधना प्रकाशन, पुणे-३०, २००१.

१५. **ग्यानोबा कृष्णाजी ससाणे**
प्राचार्य गजमल माळी,
राजमुद्रा प्रकाशन, औरगांबाद, १९९६.

१६. **राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ**
संपादक : डॉ. जयसिंगराव पवार
महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर,
जानेवारी २००१.

१७. **सत्यशोधक समाज अधिवेशने : चिंतन आणि चिंता**
जी. ए. उगले
मराठवाडा सार्वजनिक सभा, दिशा, नभांगण परिसर
१४, रायगड, संत तुकोबा नगर, प्रबोधनकार ठाकरे मार्ग,
सिडको-औरंगाबाद, प्रथमावृत्ती २००६.

१८. **महात्मा फुले : विचारधन**
डॉ. भालबा विभूते
प्रकाशक, सौ. नूतन विभूते
कोल्हापूर, मार्च, १९९१.

१९. **महात्मा फुले आणि धर्म**
डॉ. आ. ह. साळुंखे
लोकवाङ्मय गृह,
मुंबई ४०० ०२५, आवृत्ती एप्रिल, १९९२.

२०. **महात्मा फुले समग्र वाङमय**
संपादक : डॉ. य. दि. फडके
महाराष्ट्र राज्य साहित्य अणि संस्कृती मंडळ,
मुंबई-४०० ०३२. पाचवी आवृत्ती १९९१.

२१. **महात्मा फुले गौरव ग्रंथ**
संपादक : हरी नरके/डॉ. य. दि. फडके
महात्मा जोतीराव फुले चरित्र साधने प्रकाशन समिती,
महाराष्ट्र राज्य, शिक्षण विभाग, मुंबई- ४०० ०३२.
२८ नोहेंबर, १९९१.

२२. **'मराठा मार्ग'** (मासिक)
महात्मा फुले विशेषांक नोव्हेंबर, २००३.

२३. **'मौज'** दिवाळी अंक १९७८-१९७९
भालेकर लोखंडे व सत्यशोधक
समाजातील इतर कार्यकर्ते (हा लेख) डॉ. य. दि. फडके.

२४. **'जोतिपर्व'**
डॉ. नागनाथ कोत्तापल्ले
स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, जुलै २०००.

२५. **'विसाव्या शतकातील महाराष्ट्र'** (खंड पहिला)
संपादक : डॉ. य. दि. फडके
श्रीविद्या प्रकाशन, पुणे ३०.

२६. **'सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील समग्र वाङ्मय'**
महाराष्ट्र राज्य साहित्य अणि संस्कृती मंडळ,
मुंबई-४०० ०३२. जुलै, १९९०.

●●●

वाय ७८०-१००५पु. अ५*-११-२०१६

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर

## वंशावळ

राणोजी भालेकर

पांडूरंग | बाबाजी | विठोबा | सखाराम | गोपाळ

सावित्रीबाई फुले (मुलगी)

भागूबाई भूमकर (पुणे) | काशिबाई (तरवडीच्या सखाराम पाटलास दिली) | रामचंद्र उर्फ भावूसाहेब | पार्वतीबाई (ढोले पाटलास दिली) | कृष्णराव मंजुळाबाई (पत्नी) | गंगुबाई पाषाणकर (पुणे येथे दिली)

विठ्ठल

गणपतराव (मुलगा) | सीता (हडपसर) | लक्ष्मीबाई (हडपसर) | गणपत (१८९२ मृत्यू) | *मुकुंदराव (ज. २०-१२-१८८५) | बाबूराव | अनुसया (भावी निमगाव) | विठाबाई (नगर)

*मुकुंदराव (गणपत सखाराम पाटील यांच्या पत्नीच्या मांडीवर दत्तक म्हणून.)
राधाबाई-१ (पत्नी) + राधाबाई-२ (पत्नी)

२ ३ ४ ५ ६ ७ ८

(१) माधवराव पाटील (२२-०७-१९१४ ते १३-०९-२००२)
यशोदाबाई (पत्नी)

उत्तमराव (ज. ०५-०८-१९३८) मंगलाबाई (पत्नी) | प्रभाकरराव अनुराधाबाई (पत्नी) | बाळासाहेब सुशिलाबाई (पत्नी) | ताराबाई (सोनाई)

यशवंतराव (ज. ११-१०-१९६२) जयश्री (पत्नी) | सुनिता (भोकरगाव) | अनिता (औरंगाबाद) | संगिता (संगमनेर) | साधना (पुणे)

अनिल मोहिनी (पत्नी) | सुवर्णा | शिल्पा | अश्विनी

मुकुंद (ज. ०४-०४-१९९४) | मयुरी (ज. २०-०८-१९८७) | पल्लवी | दर्शना

सौरभ | मेघना | मधुरा

विवेक राधिका (पत्नी) | शुभांगी (श्रीरामपूर) | स्मिता (कोपरगाव)

ओजस (ज. ०१-०२-२०१०) | ओवी (ज. २७-०२-२०१६)

संकेत | साक्षी

(२) सदाशिवराव + मुक्ताबाई (पत्नी)

(३) डॉ. रामचंद्र + सीता (पत्नी)

अजित शैला (पत्नी) | मिलिंद संगीता (पत्नी) | अलका (मुंबई) | अरुणा (कोपरगाव) | भारती (पुणे) | स्वाती (पुणे)

रणजीत | कल्याणी | स्वेतलाना (ज. २०-१०-१९९२)

(४) आबासाहेब + विमलाबाई (पत्नी)

प्रशांत | नलिनी (पुणे) | निर्मला (कोपरगाव)

(५) माणिकराव + शकुंतला (पत्नी)

अशोक + मंदा (पत्नी) | सुमन (खंडाळा)

संदीप + सुर्वणा (पत्नी) | नितीन + सारिका (पत्नी) | मनिषा (खंडाळा-वैजापूर)

निखील | प्रतीक

(६) प्रतापराव + नलिनी (पत्नी) + माधुरी

विलास + माधुरी (पत्नी) | विवेक + सुवर्णा (पत्नी) | रणजित + उर्मिला (पत्नी) | वैशाली (शेवगाव)

रोहीत | परिक्षीत

(७) हेमलता (नाशिक)

(८) हिरा (खंडाळा)



**डॉ. विलास पाटील**

जुलै १९८९ पासून डॉ. विलास पाटील ; ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय जिंतूर, जि. परभणी येथे - सद्या Associate Professor, मराठी विभागप्रमुख - कार्यरत आहेत.

'दुःखाचा आलेख', 'भंगलेले अभंग' (कविता) आणि 'भारत माझा देश' (एकांकिका) हे संग्रह प्रकाशित असून, त्यांना भि. ग. रोहमारे ग्रामीण कवितासंग्रह, अक्षर वैदर्भी एकांकिका, राम गणेश गडकरी नाट्य तसेच इतर ०८ पुरस्कार मिळाले आहेत.

आकाशवाणी औरंगाबाद व परभणी, मराठवाडा साहित्य आणि अ. भा. मराठी साहित्य संमेलनातून कविता वाचन केलेल्या डॉ. पाटील यांची 'कनकन्कुद्री तुनतुन्तारी टप्डाटुप्डा' (दीर्घ कविता), 'भटके लोक' (लेख), 'लगीन एका खुडचीचं' (नाटक), 'ही भोय तळपायाखालची' (कवितासंग्रह), 'आस्टंगः फमुंची कविता' आणि 'देखणीः आणि देशीयता' (टीकाग्रंथ) ही पुस्तकं प्रकाशन मार्गावर आहेत.